BRITISH COUNCIL

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

TATA TRUSTS



# तेजस

## कथा परिवर्तनाच्या

www.britishcouncil.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन** www.maharashtra.gov.in

प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्लभाषा तज्ज्ञ) म्हणजेच रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी (RAA) ही महाराष्ट्र राज्यातील इंग्रजी भाषा प्रशिक्षण व उपक्रम राबविणारी सर्वोच्च संस्था आहे.

संपर्क :
**दूरध्वनी :** +९१ २४० २३३ ४४८
**ईमेल :** anglabhasha@gmail.com

## टाटा ट्रस्टस

www.tatatrusts.org

टाटा ट्रस्टस ही भारतातील सर्वात जुन्या, संप्रदाय निरपेक्ष, लोकोपकारी काम करणारी संस्था असून सामाजिक विकासाशी निगडीत विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे.

संपर्क
**दूरध्वनी :** + ९१ २२ ६६६५ ८२८२
**ईमेल :** talktous@tatatrusts.org
**ट्विटरवर फॉलो करण्यासाठी :**@tatatrusts

**ब्रिटिश कौन्सिल** www.britishcouncil.in

**ब्रिटीश कौन्सिल ही युनायटेड किंग्डमची आंतरराष्ट्रीय संघटना आहे जी सांस्कृतिक संबंध व शैक्षणिक संधी वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत आहे.**

संपर्क
**दूरध्वनी :** +९१ ०१२१० ४५६९०००/०१२० ६६८४३५३
**ईमेल :** IndiaCustomerCare@britishcouncil.org
**ट्विटरवर फॉलो करण्यासाठी :**@in British and # Tejas4ed


**# Tejas4ed** हा हॅश TAG वापरून तुम्ही आमच्या चर्चमध्ये सहभागी होऊ शकता.

**टिप्पणी :** या पुस्तिकेतील छायाचित्रे ही फक्त या प्रकाशनासाठी आहेत आणि ती इतरत्र कोठेही प्रकाशित केली जाणार नाहीत.

**अस्वीकारणीय बाबी :** या पुस्तकामध्ये काही तृतीय पक्षीय संकेतस्थळाच्या लिंक्स आहेत. त्यांची निवड अतिशय काळजीपूर्वक करण्यात आलेली असली तरी त्या वेबसाईट्सवरील मजकूर, माहिती, चित्रे, व्हिडीओ यासाठी ब्रिटीश कौन्सिल जबाबदार असणार नाही आणि त्यांना समर्थनीय जोडपत्र जाऊ नये. या लिंक्स / वेबसाईट्स या पुस्तिकेतील विषयांवर माहितीसाठी संभाव्य संदर्भ मिळावेत म्हणून देण्यात आल्या आहेत.

# अनुक्रमाणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | १ |
| ऋणनिर्देश | ८ |
| प्रस्तावना | ९ |
| परिवर्तनाचा सिद्धांत | १२ |
| 'तेजस'ची आकडेवारी | १४ |
| TAG संरचना | १६ |
| प्रादेशिक विद्या प्राधिकरण (रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी) | १७ |
| स्टेट अकॅडेमिक रिसोर्स पर्सन्स (SARP) | २२ |
| (TAG) को-ऑर्डिनेटर्स (TAGC) | ३२ |
| शिक्षक | ६२ |
| पालक | ७८ |
| परिशिष्ट | ८५ |



# प्रस्तावना



तेजस प्रकल्प आपले नाव सार्थ करत महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांचे जीवन कटिन्यूइंग प्रोफेशनल डेव्हलपमेंट (सीपीडी)च्या माध्यामातून उजळवत आहे. सर्व कामांची जबाबदारी शिक्षक समर्थपणे पेलू शकतात हा दाखवलेला विश्वास आणि त्यातून मिळणाऱ्या यशाचे लाभ विद्यार्थ्यांना मिळणे हे माझ्या दृष्टीने या प्रकल्पाचे वेगळेपण आहे. त्यामुळे यातून निर्माण होणारा प्रभाव दीर्घकाळपर्यंत टिकून राहील. टीचर ऍक्टिव्हिटी ग्रुप-टॅगमधील (TAG) उपक्रमांमुळे शिक्षकांना ऑफलाईन व ऑनलाईन समन्वयामध्ये मदत मिळते. आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पना व मिळालेले यश इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षक उत्सुक असतात. आता त्यांना त्यांचे अनुभव, विचार, प्रश्न मांडण्यासाठी, त्यावर चर्चा करण्यासाठी एक खात्रीलायक प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे.

TAG उपक्रम व रिसोर्स बुकमुळे शिक्षकांना भाषा आत्मसात करण्यात व शैक्षणिक तत्त्वे शिकण्यात मदत होत आहे. मला असे वाटते की दर महिन्याच्या टॅग बैठकांमधील उपक्रम व इतर शिकवण उपयोगात आणण्यासाठी / अंगिकारण्यासाठी आपापल्या कृतियोजना ठेवण्यात शिक्षक स्वतःहून पुढाकार घेत आहेत हे या प्रकल्पाचे मोठे श्रेय आहे. हे सर्व ते आपापल्या इच्छाशक्तिच्या बळावर करत आहेत, त्यांच्यावर कोणीही दबाव आणत नाही किंवा त्यांना काही सांगितलेही जात नाही. यामुळेच ते त्याच्या कृतियोजनांची जबाबदारी घेऊ शकतात आणि एकमेकांना जबाबदाऱ्या देऊ शकतात. टॅग बैठका रिसोर्स बुकवर आधारित असतात आणि विविध विभाग त्यांना या परिवर्तनाचा अनुभव घेण्यात मदत करतात. यशासारखा श्रेष्ठ आनंद नाही या उक्तीप्रमाणे वर्गात मिळणारे यश शिक्षकांना नवनवीन उपक्रम राबवण्यासाठी व नाविन्यपूर्ण दृष्टिकोन बाळगण्यासाठी प्रेरीत करत राहते.

एखाद्या भाषेवर प्रभुत्व मिळवणे हे अनेक बाबींवर अवलंबून असते. त्या भाषेचा वापर करण्यासाठी भरपूर वाव मिळणे आणि सराव होत राहणे गरजेचे असते. टॅग बैठकांमधील वातावरण सहकार्याचे असल्यामुळे शिक्षकांना चुका होण्याची भीती न बाळगता इंग्रजीचा वापर करण्यात मदत मिळते. यामुळे  त्यांचा आत्मविश्वास आणि इंग्रजीवरील प्रभुत्व या दोन्हींमध्ये वाढ होते.

राज्यभरातील इंग्रजीच्या शिक्षकांच्या सीपीडीसाठी (CPD) महाराष्ट्र राज्य सरकारने आखलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये तेजस प्रकल्पाने योगदान दिले आहे. या प्रकल्पाला आर्थिक पाठिंबा दिल्याबद्दल आम्ही टाटा ट्रस्टचे मनःपूर्वक आभार मानतो. मनुष्यबळ आणि शैक्षणिक स्त्रोत उपलब्ध करवून देऊन ब्रिटिश कौन्सिल या तीन संस्थांदरम्यान झालेल्या समझोता करारामध्ये वर्गातील वातावरणात आणि संवादांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आण्याचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे राज्याच्या २७ जिल्ह्यांपर्यंत या प्रकल्पाचा विस्तार करता येणार आहे. तेजसला मिळालेले यश इतर राज्ये व देशांनाही सीपीडीच्या नवीन मॉडेलचा वापर करण्यासाठी प्रोत्साहीत करत आहे.

**डॉ.सुभाष कांबळे, संचालक,**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण
(आंग्लभाषा तज्ञत्व)

# प्रस्तावना

एका TAG शिबिरात सहभागी झालेल्या शिक्षकांपैकी एकाने अतिशय योग्य सांगितले की, तेजस म्हणजे महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शिक्षकांमध्ये इंग्रजी भाषा चळवळीची सुरुवात आहे. या पुस्तकामध्ये शिक्षकांमधील परिवर्तनाच्या कथा वाचत असताना ठामपणे जाणवले की, खरोखर चळवळ सुरू झाली आहे.

आम्ही असे मानतो की, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन करुन ते पुढे जाऊन महाराष्ट्रातील इतर सर्व शिक्षकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन देऊ शकतील अशी प्रचंड मोठी क्षमता मुख्य शिक्षण प्रणालीमध्ये आहे आणि त्यानुसारच तेजसची रचना करण्यात आलेली आहे. शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (Continiuing Professional Development) हे 'तेजस'चे मुख्य ध्येय आहे. 'तेजस'मध्ये शिक्षकांच्या विकासाचा हाच सर्वात प्रमुख दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राच्या नऊ जिल्हयांमधील शिक्षकांनी आपल्या स्वत:च्या शब्दात कथन केलेल्या या अनुभवकथा म्हणजे आमचा विचार अगदी योग्य असल्याचे द्र्योतक आहेत.

प्रत्यक्ष मार्गदर्शन शिबिरांव्यतिरिक्त सातत्यपूर्ण शिक्षण व मदतीसांठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा वापर हा ''तेजस''मधील अजून एक अतिशय सुनियोजित व नीट कार्यान्वित करण्यात आलेला भाग आहे. ट्विटरवर होणाऱ्या चर्चा, वेबिनार्स, मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्सेस (MOOC), व्हर्च्युअल कॉन्फरन्सिंग प्लॅटफॉर्म्सचा वापर करुन करण्यात येणाऱ्या बैठका आणि असेच इतर अनेक मार्ग हे शिक्षकांसाठी माहिती मिळवणे, ज्ञानाची देवाणघेवाण करणे आणि सातत्याने काहीतरी शिकत राहण्यासाठी नेहमीचे स्त्रोत बनले आहेत.

महाराष्ट्राच्या उरलेल्या जिल्हयांना सामावून घेण्यासाठी ''तेजस''ची नुकतीच वाढवली गेलेली व्याप्ती आणि टाटा ट्रस्टस, ब्रिटिश कौन्सिल आणि महाराष्ट्र शासनाचा शिक्षण विभाग यांच्या दरम्यानची सातत्यपूर्ण भागीदारी यामधून शालेय शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी समन्वयात्मक प्रयत्न करणे किती गरजेचे आहे हे दिसून येते. सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (सीपीडी) आणि पद्धतशीर परिवर्तन घडवून आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा अतिशय हुशारीने वापर कारण्याप्रती सर्व प्रमुख हितधारकांची संयुक्त वचनबद्धता देखील यातून अधोरेखित होते.

''तेजस''ची रचना आणि अंमलबजावणी यामध्ये योगदान देता आले ही टाटा ट्रस्टससाठी अभिम ानाची बाब आहे. आम्हाला विश्वास वाटतो की येत्या काळात शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतींमध्ये अनेक सुधारण घडून येतील, त्यामुळे मुलांना अनेक लाभ मिळतील आणि या संपूर्ण प्रक्रियेत 'तेजस' एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

**सत्यजित सेलियन**

एज्युकेशन लीड
टाटा ट्रस्टस

# प्रस्तावना



जग मोठ्या प्रमाणावर आपापसात जोडले जात असल्यामुळे इंग्रजी बोलता येणे खूप जास्त महत्त्वाचे आहे ही बाब आता सर्वत्र मान्य केली जात आहे. एका संशोधनातून असेही निदर्शनास आले आहे की इंग्रजी बोलू शकणाऱ्या व्यक्ती या इतरांपेक्षा किमान २५% जास्त कमाई करु शकतात (ब्रिटिश कौन्सिल, २०१०***). या पार्श्वभूमीवर ब्रिटिश कौन्सिलने संपूर्ण जगभरातील सरकारे, सरकारी संस्था, शाळा आणि शिक्षक यांनी केलेल्या विनंत्यांनुसार सरकारी क्षेत्रातील इंग्रजी भाषा प्रणाली विकासाला मदत प्रदान केली आहे. दरवर्षी आम्ही ६० पेक्षाही जास्त देशांमध्ये, ३३५ सरकारी संस्था, १२,५०० शाळा, १,५०,००० पेक्षा जास्त शिक्षक (प्रत्यक्ष) आणि १२ दशलक्षपेक्षा जास्स शिक्षक (डिजिटल पद्धतीने) यांच्यासोबत काम करुन सरकारी क्षेत्रात इंग्रजी भाषा सुधारणेसाठी प्रयत्न करतो. शिक्षकांसाठी कंटिन्यूइंग प्रोफेशनल डेव्हलपमेंट आणि सरकारी विशेषज्ञांसाठी क्षमता निर्माण यावर आम्ही भर देत असल्यामुळे दीर्घकालीन चिरस्थायी सुव्यवस्थित सुधारणा घडून येण्यास मदत मिळेल.

मला अतिशय अभिमान वाटतो की, महाराष्ट्र शासन आणि टाटा ट्रस्टस यांच्या सहयोगाने चालवण्यात येत असलेल्या तेजस प्रकल्पामुळे महाराष्ट्रात इंग्रजी भाषा शिकवणे आणि शिकणे यावर इतका सकारात्मक प्रभाव झाला आहे आणि सरकारी विशेष सल्लागार, शिक्षक आणि पालकांच्या या परिवर्तन कथांच्या या असामान्य अशा पुस्तिकेतून ते पुरेपुर जाणवत आहे. रिजनल अकॅडेमिक अथॉरिटीच्या अहवालानुसार मोठ्या प्रमाणात शिक्षक विकास कार्यक्रमांच्या व्यवस्थापन क्षमतेमध्ये सुधारणा घडून आली आहे. अकॅडेमिक रिसोर्स पर्सन्स म्हणून सरकारकडून नियुक्त करण्यात आलेले इंग्रजी भाषेचे विशेषज्ञ सांगतात की अधिक जास्त शिक्षकांना सीपीडी प्रदान करण्यासाठीच्या क्षमतेमध्ये वाढ झाली आहे. सर्व स्तरावरील शिक्षकांनी आपाल्या आत्मविश्वासामध्ये आणि वर्गांमध्ये नवीन शिक्षण पद्धती अवलंबण्याच्या क्षमतेमध्ये वाढ झाल्याचे सांगितले आहे. या पुस्तिकेमध्ये पालकांनी सांगितलेल्या गोष्टींमधून तेजसच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषा कौशल्यांवर, खास करुन बोलण्यावार झालेला सकारात्मक प्रभाव ठळकपणे जाणवतो.

या पुस्तिकेतील अनेक गोष्टींमधून एक बाब प्रकर्षाने दिसून येते ती म्हणजे तेजसमध्ये करण्यात आलेला नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर. यामध्ये टीचर ऍक्टिव्हिटी ग्रुप्स प्रत्यक्ष समोरासमोर आणि ऑनलाईन समूहाद्वारे शिक्षकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात आणि त्यांना नवनवीन कौशल्ये शिकवतात. तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाच्या वापरामुळे शिक्षकांना वर्गाच्या पलीकडे एकमेकांशी संवाद साधता येतो, चांगले विचार, नवनवीन पद्धती यांची देवाणघेवाण करता येते.

तिन्ही भागीदार संस्थांचा उत्साह, आपापसातील समन्वय आणि कामाप्रतीची निष्ठा यांचे तेजसच्या यशामध्ये खूप मोलाचे योगदान आहे. महाराष्ट्र शासनाने तेजसला यशस्वी करण्यासाठी उपलब्ध करवून दिलेले सर्व स्रोत आणि या प्रकल्पासाठीची त्यांची वचनबद्धता याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक निधी देऊन प्रकल्पाला मजबूत केल्याबद्दल मी टाटा ट्रस्टसचे आभार मानते. आणि आमच्या ब्रिटिशकौन्सिल टीमने केलेली सर्वोत्तम प्रकल्प रचना आणि अंमलबजावणी याबद्दल त्यांचे आणि यशामध्ये ज्या-ज्या सर्वांनी सातत्यपूर्ण मेहनतीने मोलाचा हातभार लावला त्या सर्वांचेही मी आभार मानते.

**हेलेन सिल्व्हेस्टर**

डायरेक्टर वेस्ट इंडिया ब्रिटिश कौन्सिल

***संदर्भ: https://www.teachingenlish.org.uk/sites/teacheng/files/Euromonitor%20Report%20A4.pdf

# ऋणनिर्देश

‘तेजस’ ची रचना आणि निर्मितीमध्ये आम्हाला अनेकांचे वेगवेगळ्या प्रकारे सहकार्य लाभले आहे. ब्रिटिश कौन्सिल त्या सर्वांचे आभारी आहे. ‘तेजस’ला एक नाविन्यपूर्ण प्रकल्प बनवण्यासाठी महाराष्ट्र शासन व टाटा ट्रस्टस यांच्याकडून मिळत असलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल आणि या प्रकल्पात त्यांच्याकडून केल्या जात असलेल्या प्रयत्नांबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आम्ही पुढील व्यक्तींचे विशेष आभार मानू इच्छितो:

**श्री.आशिष शेलार**

– माननीय क्रिडा व शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन

**श्री. विनोद तावडे**

– माननीय उच्च शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन

**डॉ. वंदना कृष्णा**

– अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**श्री. नंदकुमार**

– माजी मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**श्री. विशाल सोळंकी**

– मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य – संचालक, एससीईआरटी

**डॉ. सुवर्णा खरात**

– उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**श्रीमती चारुशीला चौधरी**

– उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**डॉ. सुभाष कांबळे**

– संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्ल भाषा तज्ञत्व), औरंगाबाद

**डॉ.उज्जवल करवंदे**

– वरीष्ठ आधिव्याख्याता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्ल भाषा तज्ञत्व) औरंगाबाद

**डॉ. प्रमोद कुमावत**

– तेजस प्रकल्प प्रमुख

प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्ल भाषा तज्ञत्व), औरंगाबाद

**श्रीमती प्राची साठे**

– विशेष कार्याधिकारी, शालेय शिक्षण विभाग

**एज्युकेशन टीम, टाटा ट्रस्टस**

**स्कूल, इंग्लिश अँड स्किल्स टीम. ब्रिटीश कौन्सिल, भारत**

या पुस्तिकेच्या संकलनाच्या कामी योगदान दिलेल्या सर्वांचेही आम्ही आभार मानतो.

# प्रस्तावना

''तेजस''च्या चाचणी टप्प्याला तीन वर्षे पूर्ण झाली असून आता ते समाप्त होत आहे. हा प्रकल्प चालवणाऱ्या संस्थांच्या बरोबरीनेच स्टेट अकॅडेमिक रिसोर्स पर्सन्स (SARP), TAG Coordinators (TAGC) आणि बदल घडवून आणण्यात ज्यांनी प्रत्यक्ष भूमिका बजावली आहे असे शिक्षक यांनीही माहिती विचार आणि मेहनत यांची लक्षणीय गुंतवणूक करुन हा प्रकल्प उभा केला आहे. शैक्षणिक प्रकल्पांची सांगता होत असताना त्यांच्या यशाचे मूल्यांकन केले जाते आणि बऱ्याचदा ही मूल्यांकन आकडेवारीच्या स्वरुपात सादर केली जातात. ''तेजस''च्या बाबतीत आकडेवारी अतिशय प्रभावी आहे. महाराष्ट्रच्या नऊ जिल्हयांमधील जवळपास १८,००० शिक्षकांनी शेकडो TAG बैठकांना हजेरी लावली. या बैठका २०० पेक्षा जास्त TAG Coordinators नी आयोजित केलेल्या होत्या आणि त्यांना 22 SARPs चे सहकार्य लाभले होते. ''तेजस''च्या प्रभावाचे आकडेवारीच्या स्वरूपातील पुरावे वर्गांमधील निरीक्षणांमधून (शाळांमध्ये आणि TAGs दरम्यान) आणि प्रकल्पांमध्ये सहभागी झालेल्यांनी भरून दिलेल्या प्रश्नावलींमधून जमा करण्यात आले आहेत. 'तेजस'च्या प्रभावाचे मोजमाप करण्यासाठी असे आकडेवारीच्या स्वरूपातील विश्लेषण हा महत्त्वाचा मार्ग असला तरी प्रकल्पामध्ये सहभागी झाल्यामुळे ज्यांच्या जीवनात आणि कामात सुधारणा घडून आल्या अशा अनेक व्यक्तींचे लक्षणीय अनुभव मात्र त्यातून समोर येऊ शकत नाहीत. या पुस्तिकेमध्ये विविध स्तरावरील प्रकल्प लाभार्थींनी 'तेजस'मुळे त्यांच्यामध्ये काय बदल घडून आणले याचे वर्णन केलेले असल्यामुळे ही पुस्तिका प्रकल्पाच्या प्रभावाचा अधिक गुणवत्तात्मक दृष्टिकोन सादर करते.

ही पुस्तिका तयार करण्यासाठी 'तेजस' Whatsapp ग्रुप्समध्ये एक आमंत्रण पाठविले गेले होते. यामध्ये शिक्षक, TAG Coordinators, SARP व RAA अधिकाऱ्यांना काही छोट्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे आवाहन करण्यात आले होते. प्रकल्पाचा त्यांच्यावर काय प्रभाव झाला या संदर्भातील हे सर्व प्रश्न होते. ब्रिटिश कौन्सिल वेस्ट इंडियाच्या अकॅडेमिक टीमने हे सर्व प्रश्न तयार केले होते आणि ऑनलाईन SurveyMonkey फॉर्ममार्फत उपलब्ध करवून देण्यात आले होते. ७२ प्रतिक्रिया आल्या. प्रकल्पाच्या प्रभावाबाबत माहिती देणाऱ्या प्रतिक्रिया विचारात घेण्यात आल्या आणि काहीवेळा दूरध्वनीवरुन संपर्क साधून त्या व्यक्तींकडून अधिक माहिती मिळवण्यात आली. काही बाबतीत SARP आणि TAG Coordinatorsनी विशिष्ट शिक्षकांची नावे सुचवली, त्यांना थेट संपर्क केला गेला व अनुभव कथन करण्याची विनंती केली गेली. तसेच काही पालकांच्या फोनवरून मुलाखती घेतल्या गेल्या व त्यांना त्यांच्या मुलांच्या इंग्रजी शिक्षणाबद्दलच्या दृष्टिकोनाबद्दल बोलण्यास सांगितले गेले. सुरुवातीचे लिखित अनुभव व मुलाखतींच्या नोट्स जमा केल्यानंतर (हे सर्व २०१८ ऑक्टोबर व डिसेंबर महिन्यात करण्यात आले) ब्रिटिश कौन्सिल टीमने प्रत्येक व्यक्तीच्या (एकूण ४५) स्वतंत्र लिखित केसेस तयार केल्या. प्रकल्पामुळे कोणते बदल घडून आले ते जितके शक्य होतील तितक्या प्रमाणात व्यक्तीच्या स्वत:च्या शब्दांमध्ये मांडणे हा प्रत्येक केसचा उद्देश होता.

जमा करण्यात आलेल्या संपूर्ण साहित्याचे पाच भाग करण्यात आले -RAA अधिकारी,TAG Coordinators, शिक्षक आणि पालक. या सर्व अनुभव कथांमधुन अनेक विचार आणि संकल्पना

दिसून येतात आणि चार असे प्रमुख मुद्दे आहेत जे पुन्हा-पुन्हा वेगवेगळ्या रूपात पुढे येतात: आत्मविश्वास, प्रेरणा, तंत्रज्ञान आणि संवाद. हे मुद्दे वेगवेगळे दिसत असले तरी ते परस्परांशी निगडित आहेत आणि या अनुभव कथा लिहीणाऱ्या व्यक्तींवर प्रकल्पाचा जो प्रभाव झाला त्यामध्ये त्यांचे योगदान आहे.

सहभागी झालेल्या व्यक्तींच्या आत्मविश्वासावर झालेला प्रभाव हा मुद्दा अनेक अनुभवांमध्ये प्रकर्षाने आढळून येतो. स्वत:च्या किंवा इतर शिक्षकांचा विकास घडवून आणण्यात तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेण्याच्या बाबतीत वाढलेला आत्मविश्वास हा मुद्दा अनेक लोकांनी मांडला आहे. इंग्रजी बोलण्यातला आत्मविश्वास वाढला हेही अनेक लोकांनी सांगितले आहे. अनेक शिक्षकांनी असेही सांगितले की, 'तेजस'मुळे त्यांच्या विद्यार्थ्यांचा इंग्रजी बोलण्यातला आत्मविश्वास वाढला आहे आणि हीच बाब बालकांच्या बोलण्यातूनही दिसून आली. अशाप्रकारे आत्मविश्वास वाढणे हे 'तेजस'चे खूप मोठे फलित आहे कारण जेव्हा व्यक्तीला विश्वास वाटतो की त्याला / तिला एखादी गोष्ट करता येते तेव्हा ते त्याच्यासाठी पुढे अधिक जास्त वेळ आणि ऊर्जा खर्च करतात.

प्रेरणा, प्रोत्साहन हा अजून एक मुद्दा आहे जो 'तेजस'च्या अनुभव कथांमध्ये दिसून देतो. शिक्षकांना प्रोत्साहन कसे दिले याबद्दल TAG Coordinators नी माहिती दिली (उदाहरणार्थ, वर्गात नवनवीन ऍक्टिव्हिटीज करणे); शिक्षकांनी सांगितले की कशाप्रकारे त्यांना त्यांच्या धड्यांमध्ये ऍक्टिव्हिटीवर आधारित शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहित केले गेले आणि विद्यार्थ्यांना अभ्यासाबद्दल नवीन दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी कसे प्रोत्साहित केले गेले. प्रकल्पातील लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी सोशल मीडियाने देखील महत्त्वाची भूमिका बजावली. काही केसेसमध्ये लोकांनी ऑनलाईन लर्निंग कम्युनिटीजमध्ये सहभागी होऊन आपला व्यावसायिक विकास साध्य केला. काही लोकांनी आपल्या वर्गातील नाविन्यपूर्ण गोष्टी ऑनलाईन शेअर केल्या त्यामुळे इतरांनाही आपल्या वर्गांमध्ये त्या सादर करण्याची प्रेरणा मिळाली. या सर्व अनुभवांमधून हे स्पष्टपणे दिसून येते की, प्रकल्पातील अनेक हितधारकांवर 'तेजस'चा प्रभाव आहे, अनेकांना 'तेजस'मुळे इतरांनाही आपल्या वर्गांमध्ये त्या सादर करण्याची प्रेरणा मिळाली. या सर्व अनुभवांमधून हे स्पष्टपणे दिसून येते की, प्रकल्पातील अनेक हितधारकांवर 'तेजस'चा प्रभाव आहे, अनेकांना 'तेजस'मुळे प्रेरणा मिळाली आहे. अशाप्रकारे प्रेरणा, प्रोत्साहन मिळणे खूप महत्त्वाचे आहे. शिक्षक नवीन माहिती, ज्ञान व कौशल्ये संपादन करतात पण त्यांचा वापर करण्यासाठी आणि पुढे विकास करण्यासाठी प्रेरणा मिळणे आवश्यक असते. या अनुभव कथांमधून दिसून येते की. लोकांना विकसित होण्यासाठी, बदल घडवून आणण्यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करण्यात 'तेजस' प्रकल्प यशस्वी ठरला.

आत्मविश्वास आणि प्रेरणा या दोन्ही मुद्दयांमध्ये तंत्रज्ञानाचा उल्लेख आलेला आहेच. परंतु तरीही त्याचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे कारण तंत्रज्ञाचा हा 'तेजस'चा केंद्रभाग आहे आणि अनेक अनुभव कथांमध्ये परिवर्तनाचा प्रमुख भाग म्हणून तंत्रज्ञाचा उल्लेख आहे. तंत्रज्ञान कौशल्ये विकसित झाल्यामुळे प्रकल्पाचा प्रशासनात्मक भाग प्रभावीपणे कसा हाताळता आला याबद्दल

SARPs नी सांगितले आहे. TAG Coordinators नी ट्विटर चॅट्स आणि ब्लॉगिंग कसे वापरावे हे शिकायला मिळाल्याबद्दल सांगितले आहे. 'तेजस'मध्ये Whatsapp ग्रुपचा वापर (शिक्षकांनी देखील) मोठ्या प्रमाणावर झाला आणि हे एक उपयुक्त माध्यम ठरले, त्यामुळे संवाद, देवाणघेवाण आणि शिक्षण वाढले असे लोकांनी सांगितले आहे. तंत्रज्ञान विषयक ज्ञान, कौशल्ये आणि आत्मविश्वास लोकांनी आत्मसात केले हे महाराष्ट्रातील शिक्षकांच्या व्यापक विकासात 'तेजस'चे खूप मोठे योगदान आहे.

या अनुभव कथांमध्ये संवाद या अजून एका मुद्दयाचा उल्लेख केलेला दिसून येतो. शिक्षण जेव्हा संवादाच्या माध्यमातून होते तेव्हा ते अधिक प्रभावी ठरते हा ''तेजस''चा एक आधारभूत सिद्धांत आहे. शिक्षकांनी केलेल्या नोंदीमधून प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे वर्गातले शिकवणे, धडे जे आधी शिक्षक केंद्री होते ते विद्यार्थी-केंद्रित बनत गेले. वर्गामध्ये संवादाला प्रोत्साहन देणाऱ्या ऍक्टिव्हिटीज, यामध्ये मुले इंग्रजीचा वापर करतात, जोड्या-जोड्यांनी किंवा छोट्या समूहांमध्ये संवाद यामुळे हाबदल घडून आला. TAGs मधून आणि खास करुन TAG रिसोर्स बुकमधून शिक्षकांना अनेक नवीन ऍक्टिव्हिटीज शिकता आल्या, ज्यामुळे ते आपले शिकवणे अधिक संवादी बनवू शकले. परंतु संवाद हा फक्त विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरता महत्त्वाचा नाही. TAG शिक्षकांनी देखील एकमेकांसोबत,आपल्या TAG Coordinators सोबत संवाद केला आणि त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढला (उदाहरणार्थ, इंग्रजी बोलणे) सोशल मीडियामुळे देखील SARP, TAG Coordinators आणि शिक्षक यांच्या दरम्यान संवादाच्या संधी वेळोवेळी पुरवल्या.

'तेजस'हा क्षमता वृद्धी प्रकल्प आहे. शिक्षक, SARP आणि टॅग कोऑर्डिनेटर्स यांच्यावर या प्रकल्पाचा प्रभाव झाला आहे. परंतु यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्गातील वागणुकीवर आणि कामगिरीवर कसा परिणाम झाला आहे हे समजून घेणे देखील खूप महत्त्वाचे आहे. म्हणूनच आपल्या या प्रकल्पामुळे कोणकोणते सकारात्मक बदल घडून आले हे पालकांच्या तोंडून ऐकणे खूप जास्त प्रोत्साहक ठरले.

या पुस्तिकेतील अनुभव कथा 'तेजस'चा प्रभाव कसा व किती झाला आहे याबद्दल परिपूर्ण माहिती देतात. आधीपासून उपलब्ध असलेल्या पुराव्यांना या अनुभव कथा बळ देतात. या सर्व कथांमधून स्पष्टपणे दिसून येते की, महाराष्ट्रात इंग्रजी भाषा शिकवण्याच्या प्रक्रियेत या प्रकल्पाने अतिशय सकारात्मक योगदान दिले आहे. हेही नमूद केले पाहिजे की, या यशामुळे रोमानिया, पॅलेस्टाईन व इजिप्त यासारख्या इतर देशांमधील टॅग्सच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले. चाचणी टप्प्यामध्ये या प्रकल्पात सहभागी होताना मला अदिशय आनंद झाला. संपूर्ण राज्यभरात या प्रकल्पाचा विस्तार होऊन त्याला अजून जास्त भरभरुन यश मिळेल याची मला खात्री आहे आणि त्याबद्दल ऐकायला मी उत्सुक आहे.

**प्रोफेसर सायमन बॉर्ग**
मॉनिटरींग अँड इव्हाल्युएशन कन्सल्टन्ट

# परिवर्तनाचा सिद्धांत

शाळांमध्ये शिकवण्याच्या प्रक्रियेच्या गुणवत्तेमध्ये सुधारण घडवून आणणे RAA मध्ये क्षमता निर्माण करणे ही दोन्ही उद्दीष्ट्ये पूर्ण करण्यासाठी या कार्यक्रमाच्या माध्यमातून एक संरचना पुरविली जाते जिच्यामुळे शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला वाव मिळतो. या संरचनेमध्ये शिक्षकांच्या कामाला पाठिंबा दिला जातो तसेच त्यावर सातत्याने देखरेख केली जाते. राज्य पातळीवरील यंत्रणेच्या क्षमतांमध्ये सुधारणा घडवून आणणे हे चाचणी टप्प्यातील उद्दिष्ट आहे. कार्यक्रमाची स्वतंत्रपणे अंमलबजावणी करता यावी यासाठी विविध घटकांचे संस्थाकरण (instutionalisation) हा देखील या प्रक्रियेचा आणखी एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे.




संक्षिप्त रूपांचे अर्थ

TAG : टीचर एक्टिव्हिटी ग्रुप

ELT : इंग्लिश लॅंग्वेज ट्रेनिंग

RAA : रिजनल अकॅडेमिक अथोरिटी

SARP : स्टेट अलॅडेमिक रिसोर्स पर्सन





# तेजसचे लक्ष्य

संपूर्णत: कार्यरत, साधनसामग्रीने सुसज्ज स्त्रोतांनी परिपूर्ण असे RAA प्लॅन्स शिक्षकांना त्यांच्या प्रशिक्षण व विकासात मदत करतो तसेच त्याचे व्यवस्थापन करतो. शिक्षक TAGs च्या माध्यमातून त्यांच्या स्थानिक भागात प्रत्यक्ष संपर्क होऊ शकतील असे तसेच डिजिटल समुदाय तयार करतात ज्यामूळे त्यांना त्यांच्या भाषा शिकण्याच्या आणि शिकवण्याच्या कौशल्यांमध्ये तसेच माहिती व अनुभवांमध्ये वाढ करता येते. या प्रक्रियेतून अधिक प्रेरित शिक्षक निर्माण होतात जे माहिती, ज्ञान, स्त्रोतसाधनांची देवाणधेवाण व शिकण्याच्या संस्कृतीत सहभागी होतात. स्वाभाविकपणे वर्गामध्ये शिकवण्याचा व शिकण्याचा दर्जा उचावतो.

प्रशिक्षित
TAG Coordinators नियमितपणे
TAGs ना पुढे नेत असतात, त्यांना
ARPs चा पाठिंबा मिळत असतो.



निवडक जिल्ह्यांमधील शिक्षक
डिजिटल कंटिन्यूइंग प्रोफेशनल
डेव्हलपमेंट रिसोर्सेसच्या साहाय्याने
TAGs मध्ये येतात.



स्थापन
जल्ह्यामध्ये
करून ते
ठी त्यामध्ये
करतात.

एका संलग्न निगराणी व TAGs मूल्याकन संरचनेमार्फत SARPs वर देखरेख केली जाते आणि ते मूल्यांकन केले जाते.

शिक्षक त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी त्यांच्या स्थानिक भागात प्रत्यक्ष संपर्क होऊ शकतील असे तसेच डिजिटल समुदाय तयार करण्यात सक्षम होतात. स्वतंत्रपणे आणि शिक्षकांच्या विकासासाठी नियोजन, व्यवस्थापन व समर्थन करू शकते

कृती करा

परिणाम साध्य करा

# तेजसची आकडेवारी

स्वरूप, व्याप्ती आणि प्रमाण या सर्वांमुळे तेजस हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जातो. या प्रकल्पाचे खूप मोठ्या प्रमाणावर आणि दीर्घकालीन परिणाम घडून येऊ शकतात.

## महाराष्ट्र राज्य

| | |
|---|---|
| नंदुरबार | यवतमाळ |
| नाशिक | अमरावती |
| औरंगाबाद | नागपूर |
| बीड | गडचिरोली |
| हिंगोली | |

## डिजिटल समर्थन

| ४७२ | ३० | ७५० |
|---|---|---|
|  |  | |
| सहभागींनी डिजिटल सेल्फ कोर्सेस घेतले | सहभागींनी डिजिटल ई-मॉडरेटेड कोर्सेस घेतले | WhatsApp ग्रुप्स तयार करण्यात आले व त्यांच्यावर पूर्ण देखरेख ठेवली गेली |



**१८,०००** शिक्षक सहभागी

**७५०** टीचर ॲक्टिव्हिटी ग्रुप्स तयार करण्यात आले.



## सरकारी पायाभूत सोयीसुविधांचा प्रकल्पामध्ये समावेश

- **९** जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायीक विकास संस्था (DIECPD)
- **२२** स्टेट अकॅडेमिक रिसोर्स पर्सन्स
- **२५०** TAG को ऑार्डिनेटर
- **१०८** ब्लॉक रिसोर्स सेंटर अधिकारी
- **१२०** केंद्र प्रमुख
- **५४००००** विद्यार्थी

# TAG संरचना

१ — अंदाजे ३० मी.

तुमच्या गेल्या बैठकीतील कृती नियोजनाच्या मुद्द्यांचा आढावा घ्या आणि नंतर खालील प्रत्येकी विभागामधून एक विषय निवडा.

२ — अंदाजे ३०–४५ मी. प्रत्येकी

- भाषा विकास
- वाचनातून शिकणे
- पाहून शिकणे

३ — अंदाजे ३० मी.

तुम्ही वर्गात ज्या कल्पना राबविण्याचा प्रयत्न करणार आहात त्या कृती नियोजन विभागात लिहा. तसेच तुम्ही तुमच्या स्वत:मध्ये भाषा विकासासाठी काय करणार आहात ते देखील नमूद करा.

---

वर्गामध्ये नवनवीन कल्पना राबवा

फेसबुक, ट्विटर, WhatsApp वर तुमच्या कल्पना/स्त्रोतसाधने यांची देवाणघेवाण करा.

# RAA औरंगाबाद, अधिकारी

औरंगाबाद येथील प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आग्लभाषा तज्ज्ञत्व) म्हणजेच रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी (RAA) चे आधीचे नाव स्टेट इन्सिस्टट्यूट ऑफ इंग्लिश असे होते. १७ ऑक्टोबर २०१६ रोजी सराकारी अध्यादेशानुसार ते नाव बदलण्यात आले. आता रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी (RAA) औरंगाबाद ही महाराष्ट्रातील इंग्रजी भाषा शिक्षण आणि प्रशिक्षण यासाठीची प्रमुख संस्था म्हणून काम पाहते. त्याचबरोबरीने मराठवाड्यातील औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, आणि उस्मानाबाद या आठ जिल्ह्यांमध्ये इतर विषयांच्या शिक्षकांना शैक्षणिक मदत देखील पुरवते.

रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी (RAA) ही तेजसमध्ये नियोजन, कार्यान्वयन, देखरेख आणि मूल्यांकन यांचे केंद्रस्थान असून RAA मध्ये नियुक्त करण्यात आलेले SARPs हे सर्व कामकाज पाहतात. RAAकडून शिक्षकांना दिली जाणारी मदत तसेच शिक्षकांना उपलब्ध करवून दिल्या जाणाऱ्या सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास (CPD) ऍक्टिव्हिटीज यांच्या स्वरूपामध्ये झालेला बदल ही RAAच्या कामकाजातील सर्वात प्रमुख सुधारणा आहे. आता RAA तेजसच्याही पलीकडे जाऊन महाराष्ट्रात इंग्रजी भाषा शिकवणे आणि शिकणे यांच्याशी संबंधित कितीतरी नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवत आहे.

# सीपीडीमध्ये बदलते स्वरूप



महाराष्ट्रामध्ये शिक्षकांचे शिक्षण आणि विकास यामध्ये घडून आलेल्या सुधारणा अनेक विविध उपक्रमांचे फलित आहेत. रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी (RAA) ची सुव्यवस्थित पुर्नरचना करण्यात आल्यामुळे राज्यभरातील शाळांमध्ये शिकवत असलेल्या शिक्षकांना पुरेशी मदत मिळते. शैक्षणिक स्तरांवर शाळामध्ये शिकवत असलेल्या शाळांकडून कंटिन्यूइंग प्रोफेशनल डेव्हलमेंट (सीपीडी) चा लाभ घेण्याच्या पद्धतीमध्ये 'तेजस' प्रकल्पाने खूप मोठे योगदान दिले आहे. उदाहरणार्थ, कधीतरी होणाऱ्या प्रशिक्षणांच्या ऐवजी आता 'तेजस'मुळे दर महिन्यांला नियमित बैठका होऊ लागल्या आहेत. ही खऱ्या अर्थाने सीपीडी आहे.

RAA चे स्वरूप, कामकाज, नियमांचे तसेच शैक्षणिक दृष्ट्या सबलीकरण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सरकारने या संस्थेच्या पायाभूत सोयीसुविधांचे नुतनीकरण केले आहे. ब्रिटिश कौन्सिलने स्टेट अकॅडेमिक रिसोर्स पर्सन्सना (SARPs) तीन वर्षांमध्ये ५० दिवसांचे सखोल प्रशिक्षण देऊन शैक्षणिक सबळीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

ब्रिटिश कौन्सिलकडून प्रशिक्षण मिळालेल्या SARPs आणि TAG Coordinators ना साहित्यसामग्री तयार करण्याबद्दल आणि प्रशिक्षण शिबिरांच्या आयोजनाबद्दल माहिती मिळाली. स्पोकन इंग्लिश प्रशिक्षणाच्या मोड्युलच्या विकासात त्यांनी योगदान दिले आहे. हा आरएएचा एक स्वतंत्र उपक्रम आहे. TAG Facilitation प्रशिक्षणामुळे त्यांना सत्रातील मजकूर व साहित्य इतरांपर्यंत पोहोचवण्यात मदत मिळाली. आता SARPs इतर आरएए उपक्रमांच्या समन्वयनाची जबाबदारी स्वतंत्रपणे सांभाळत आहेत. त्यामुळे आरएएने गरजेनुसार प्रशिक्षणासाठी आपली स्वतःची प्रशिक्षण मोड्यूल्स विकसित करण्यास सुरवात केली आहे. त्याचप्रमाणे आरएए मूल्यांन तंत्रे व अभ्यास साहित्य देखील विकसित करत आहे.



TAG Coordinators साठी ब्रिटिश कौन्सिलने तयार केलेले अभ्यास साहित्य मोठ्या प्रकल्पांमध्ये काम करण्यांच्या आमच्या पद्धतीवर 'तेजस'चा प्रभाव पडला आहे. परंतु भाषा शिकण्यासाठी राबवले जाणारे उपक्रम आणि त्याची अंमलबजावणी, TAG Coordinators च्या कौशल्यांचा विकास आणि वर्गात मुलांना जास्तीत जास्त सक्रिय ठेवणे या तीन बाबतीत सर्वात जास्त बदल घडून आले आहेत.

ब्रिटिश कौन्सिलच्या ट्रेनिंग कन्सल्टन्टकडून मी फॅसिलेटेशन व मेन्टॉरिंग कौशल्ये शिकलो. नेहमी प्लॅन बी अर्थात पर्यायी योजना स्वतःकडे तयार ठेवावी ही ब्रिटिश कौन्सिलकडून मला मिळालेली सर्वात मोठी शिकवण आहे. संभाव्य धोके ओळखणे आणि प्रभावी प्रकल्प नियोजन यामुळे सर्व आरएए उपक्रमांमध्ये यश मिळते.

'तेजस' प्रकल्पामधून शिक्षकांना मिळत असलेले यश पाहून मला प्रेरणा मिळाली. (TAG) बैठकांच्या निमित्ताने दिलेल्या भेटी, शाळांना दिलेल्या भेटी, शिक्षकांसोबत बातचीत आणि वर्गाचे निरीक्षण यामधून मिळालेल्या माहितीमुळे मला माझी मार्गदर्शन धोरणे तयार करण्यास मदत मिळाली. म्हणूनच मी असे मानतो की, शिक्षक हे माझ्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत.

या संपूर्ण वाटचालीत आमच्यासमोर अनेक अडीअडचणी आल्या. TAG Coordinators साठी हे सर्व काम कंटाळवाणे होऊ नये त्यांचा उत्साह टिकून राहावा हे मोठे आव्हान होते. ज्या भागांमध्ये व्यवस्थापन किंवा प्रशासकीय मदत नव्हती अशा भागांमध्ये हे आव्हान अधिक गंभीर होते. माझ्या अनुभवांनुसार ज्याठिकाणी क्लस्टर हेड्स उत्साही आहेत आणि TAG बैठका घेण्यास TAG Coordinators ना मदत करतात त्याभागांमध्ये TAGs चे काम सुरळीत चालले आहे. व्यवस्थापन आणि संपर्क याबाबतीत क्लस्टर हेड्सची भूमिका खूप महत्वाची आहे. प्रकल्पातील प्रत्येक हितधारकाने आपापल्या भीमिका व जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित करावे यावर मी भर दिला. यामुळे आम्हाला कामाचे सकारात्मक वातावरण निर्माण करता आले. ज्यामुळे महाराष्ट्रातील शिक्षकांच्या विकासाला वाव मिळाला. स्वाभाविकपणे मुलांच्या अभ्यासात, प्रगतीत सुधारणा झाली.

**डॉ. उज्ज्वल करवंदे**
वरिष्ठ अधिव्याख्याता
प्रादेशिक विद्या प्राधिकरण,(आंग्ल भाषा तज्ञत्व)
औरंगाबाद.

# समस्यांकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन – उपायांवर लक्ष केंद्रीत करा.



'तेजस म्हणजे शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, २०१६साली महाराष्ट्रातील ३६ पैकी ९ जिल्ह्यांमध्ये चाचणी प्रकल्पाला सुरुवात झाली. आज जे शिक्षक तेजसमध्ये नव्हते ते बैठकांना येण्यासाठी उत्सुक आहेत आणि 'तेजस'मध्ये सहभागी न होऊ शकलेल्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी TAG Coordinators ना सतत आमंत्रित केले जात आहे. सीपीडी अर्थात सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास ही वाटचाल शिक्षकांसाठी किती उत्साहवर्धक आणि लोकप्रिय ठरली हे यावरून दिसून येते.

२०१६साली रिजनल अकॅडेमिक अथॉरिटीकडे (आधीचे नाव स्टेट इन्स्टिट्यूट इंग्लिश (एसआयई) आठ इतर समांतर उपक्रम होते. म्हणजेच आमच्याकडे TAGs प्रसारासाठी पुरेशी क्षमता नव्हती आणि सततच्या प्रशिक्षणामुळे थकलेल्या शिक्षकांना प्रेरित करणे कठीण होते. शिक्षकांचा सहभाग वाढावा यासाठी एक मंच निर्माण करण्याबाबत आम्ही शाळा मुख्याध्यापक व स्थानिक शिक्षण अधिकाऱ्यांसोबत बोललो. प्रकल्पाच्या कामासाठी आणि तो सुरळीतपणे चालावा यासाठी प्रक्रिया विकासासाठी मला मोकळेपणाने काम करण्याची मुभा देण्यात आली. या संपूर्ण वाटचालीत माझ्या स्वतःच्या संवाद कौशल्यांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे.

ब्रिटिश कौन्सिलच्या मदतीने आम्ही २२ SARPs आणि ४०० पेक्षा जास्त TAG Coordinators ना प्रशिक्षण दिले आहे. शिकवण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यात त्यांना सक्षम केले गेले, अशाप्रकारे ही परिवर्तनाची गंगा पुढे गेली. शिक्षक प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांसोबत कसा संवाद साधायचा, विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन नियोजन कसे करावे, धडे कसे शिकवावे आणि वेळेचे पक्के नियोजन कसे करावे ते शिक्षकांना 'तेजस'मध्ये शिकवले गेले. ग्रामीण दुर्गम भागातील शिक्षकांना क्षमता यामुळे वाढल्या. आता अंतर्गत प्रशिक्षणे तसेच SARPs मध्ये याचे अनुकरण करत आहेत.

शैक्षणिक बाबी, व्यवस्थापन आणि संचालन या तीन बाबतीत आम्हाला अडीअडचणीचा सामना करावा लागला. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आम्ही शैक्षणिक आव्हानांचा सामना केला. आधी आम्ही तंत्रज्ञान म्हणजे फक्त ईमेल वापरत होतो. पण आता आम्ही ऑनलाईन बैठकांसाठी झूम व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सॉफ्टवेअर वापरतो. सीपीडी सरावासाठी ऑनलाइन समुदाय तयार करण्यासाटी फेसबुक व WhatsAppचा वापर करतो. यामुळे आमच्या कामाला एक विशिष्ट आकार मिळाला आहे. आज महाराष्ट्रातील सर्व भागातील शिक्षक तंत्रज्ञानाचा, खासकरून मोबाईलचा वापर करून एकमेकांसोबत विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत आणि शिक्षण विभागासोबत संपर्क करत असतात. हे सर्व फक्त 'तेजस'मुळे शक्य झाले आहे.

संपूर्ण राज्यभरात एखाद्या प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यात अडीअडचणी येतातच आणि सर्वात मोठी अडचण म्हणजे रिर्पोटींग कामाचा अहवाल सादर करणे हे आमच्यासमोरील मोठे आव्हान

होते. आता आम्ही 'तेजस' ऍप विकसित केले आहे, ज्यामध्ये आम्हाला TAGs मधील उपस्थितीची संपूर्ण माहिती मिळेल, शिक्षकांना आणि TAG Coordinators ना TAGs चे आयोजन कधी होणार याची आठवण करून दिली जाईल आणि ब्लॉक रिसोर्स पर्सन्सना (बीआरपी) TAGs चे प्रभावी नियोजन करता येईल. ब्लॉक्सचे इन–चार्ज असलेल्या बीआरपीजपासून ते जिल्ह्यांचे इन–चार्ज असलेल्या SARPs पर्यंत सर्वांकडे आवश्यक माहिती व अहवाल असतील.

समस्यांकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन आता बदलला आहे. आता SARPs देखील मार्गदर्शन, मूल्यांकन व प्रकल्प जोखीम व्यवस्थापन याबद्दल विचार करतात. आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात ६००० क्लस्टर्सची आखणी केली असून त्यांना मदतीसाठी ब्लॉक दिले आहेत आणि प्रत्येक TAG Coordinator आपापल्या क्लस्टरमध्ये आणि बाजूच्या दोन क्लस्टर्समध्ये काम करतो. ग्रामीण महाराष्ट्रात दोन ठिकाणांमधील अंतर हे आव्हान आहे. TAG Coordinator किती प्रवास करू शकेल हे या अंतरानुसार ठरते. संचालनातील आव्हानांमध्ये शिक्षकांना TAG बैठकांसाठी वेळेवर सोडले जाणे, स्त्रोतसाधने आणि ठिकाण नियोजनाबाबत ब्लॉक रिसोर्स पर्सन्स व केंद्र प्रमुखांची मदत यांचा समावेश होता. या ठिकाणी पुन्हा एकदा संवाद कौशल्यांनी महत्त्वाची भूमिका बजावून या समस्या सोडवण्यात मदत केली TAG Coordinators व / किंवा SARPs WhatsApp ग्रुप्सवर मुद्दे, समस्या मांडतात आणि आम्ही त्या सोडवू शकतो. त्यामुळे डिस्ट्रिक्ट इन्स्टिट्यूट ऑफ एज्यूकेशन अँड कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट (DIECPD) आणि SARPs / इंग्लिश सब्जेक्ट असिस्टंट्स (ESA) यांच्यासोबत माझे चांगले संबंध प्रस्थापित झाले आहेत, साहजिकच कामे वेगाने होतात. फक्त एक WhatsApp पोस्ट किंवा एक फोन केला की मदत मिळते.

**डॉ.प्रमोद कुमावत**
अधिव्याख्याता
प्रादेशिक विद्या प्राधिकरण, (आंग्ल भाषा तज्ञत्व) औरंगाबाद.




**३१ जानेवारी २०१९ रोजी तिसऱ्या परिसंवादामध्ये SARPs.**



# स्टेट अकॅडेमिक रिसोर्स पर्सन्स ( SARPs )

रिजनल अकॅडेमिक अथॉरिटी (RAA) मध्ये सुधारणा घडवून आणणे आणि क्षमता निर्माण करणे हे तेजस प्रकल्पाचे एक प्रमुख उद्दिष्ट होते. तातडीने कर्मचारी नियुक्त करण्याची गरज होती. आरएएमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य पात्रता असलेल्या व्यक्तींच्या टीमची आवश्यकता होती. त्यातून SARPs ची संकल्पना पुढे आली. 'तेजस'ची अंमलबजावणी आणि त्याचा प्रभाव चिरस्थायी टिकून राहण्यासाठी SARPs ची भूमिका महत्त्वाची ठरली.

SARPs मध्ये पाच मुख्य पात्रता असणे आवश्यक होते.

१) शिक्षण प्रशिक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी करणे

२) शिक्षक व TAG Coordinators ना मदत व मार्गदर्शन करणे

३) देखरेख, मूल्यांकन व अहवाल लेखन

४) सोशल मीडिया व्यवस्थापन

५) साहित्य विकसन

या पाचही बाबतीत ४० दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि ब्रिटिश कौन्सिलचे ऑनलाईन कोर्सेस यामुळे आता SARPs नियोजन व संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षकांच्या सीपीडीची अंमलबजावणी करण्यात सराईत झाले आहेत.

गेल्या तीन वर्षात २२ SARPs च्या या टीमने महाराष्ट्रातील अमरावती, औरंगाबाद, बीड, हिंगोली, नागपूर, नंदुरबार, नाशिक, गडचिरोली आणि यवतमाळ या नऊ जिल्ह्यांमध्ये ३०० TAG Coordinators ना नियोजनात मदत केली आहे. तसेच प्रशिक्षण दिले आहे. वर्ग निरीक्षणात ते ब्रिटिश कौन्सिल प्रशिक्षण कन्सल्टसच्या सोबत होते व प्रशिक्षण शिबिरांच्या कामकाजाचे देखील त्यांनी निरीक्षण केले.

SARPs मध्ये घडून आलेला विकास स्पष्टपणे दिसून येतो असे आणखी एक क्षेत्र म्हणजे त्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळाली आणि आता शिक्षकांना मदत करण्यासाठी ते तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. शिक्षकांसाठी ट्विटर चॅट्स करणे. SARPs नी शिकून घेतले आहे. त्यांनी झूमचा (व्हर्च्युअल व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्लॅटफॉर्म) वापर करून ऑनलाईन बैठका (उदाहरणार्थ, TAG Coordinators च्या बैठका) घेतल्या आहेत. काही SARPs नी तंत्रज्ञान शिकून घेण्यात पुढाकार घेतला आणि नंतर आपल्याला मिळालेली माहिती इतर SARPs व TAG Coordinators पर्यंत पोहोचवली. त्यांनी पुढे जाऊन शिक्षकांना मदत पुरवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे अशाप्रकारच्या शिकण्याच्या पद्धतीमुळे तंत्रज्ञान शिकून घेताना नेहमी जी भीती मनात असते ती दूर होण्यास मदत झाली.

SARPs च्या क्षमता २०१८ मधील तेजस परिसंवादामध्ये दिसून आल्या. भाषणांच्या अनेक प्रस्तावांमधून सादरीकरणासाठी विशिष्ट व्यक्तींची निवड करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. या प्रक्रियेती त्यांच्या सहभागामुळे ठळकपणे जाणवले की, शिक्षकांसाठी इंग्रजी भाषा शिकविण्याच्या उपक्रमांचे नियोजन, आयोजन आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याच्या संपूर्ण क्षमता त्यांच्यामध्ये आल्या आहेत.

यापुढील भागात काही SARPs नी आपले अनुभव, त्यांच्या कामाचे नाविन्यपूर्ण स्वरूप आणि त्यांना ज्या समस्या भेडसावत होत्या त्या कशा प्रकारे दूर केल्या ते आपल्यासमोर मांडले आहे.

# शिक्षक व TAG Coordinators चे सीपीडी व मार्गदर्शनासाठी आयसीटी

**अशोक चव्हाण** २०० साली प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. २०१६ सालापासून ते नाशिक जिल्ह्यात SARP incharge आहेत.

अशोक चव्हाण यांच ब्लॉग वाचण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

तेजसच्या प्रभावासंदर्भात अशोक चव्हाण यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

'तेजस'मध्ये मला मिळालेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे तंत्रज्ञानाच्या वापराचे ज्ञान. शैक्षणिक व प्रशासकीय कामांसाठी सर्वांच्या समन्वयाने काम करण्यासाठी तंत्रज्ञानाने खूप मदत केली. मी काही वर्षांपूर्वी कम्प्युटरचा एक बेसिक कोर्स केलेला होता. पण सोशल मीडिया, ब्लॉग लिहिणे इतकेच काय तर, ईमेल करणे देखील मला जमत नव्हते. तेजसमध्ये सहभागी झाल्यानंतर मी ट्विटर, फेसबुक, WhatsApp ही माध्यमे आणि गूगल डॉक्स, झूम मिटींग्स आणि पॅडलेट ही सॉफ्टवेअर्स वापरू लागलो.

मुख्याध्यापक, TAG Coordinators आणि शिक्षण अधिकारी यांच्यासाठी मी एक whatsApp ग्रुप बनवला. या ग्रुपवर TAG Coordinators त्यांच्या समस्या सांगत आणि त्याच ठिकाणी त्या तातडीने सोडवल्या जात असत. TAG Coordinators बैठका कशाप्रकारे घेतात हे या ग्रुप्समधून इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. TAGs आणि त्यांच्या वर्गाचे फोटो व व्हिडीओज ग्रुपमधून इतरांसोबत शेअर करण्यासाठी देखील त्यांना प्रोत्साहन दिले जाते. ब्रिटिश कौन्सिल ट्रेनिंग कन्सल्टन्टससोबत वर्ग आणि TAG निरीक्षणांमध्ये मला आढळून आलेल्या गोष्टी, माझी मते देखील मी शेअर केली. यामधून सकारात्मक प्रतिक्रिया देण्यावर भर दिला जात असल्यामुळे आता शिक्षक मला त्यांच्या वर्गाचे निरीक्षण करण्यासाठी आमंत्रित करतात. आता शिक्षकांसाठी वर्ग निरीक्षण हे त्यांना सकारात्मक प्रोत्साहन, प्रेरणा मिळवून देणारे बनले आहे. एका SARP प्रशिक्षणामध्ये डेमनस्ट्रेशन चार्ट दाखवला गेल्यानंतर मी ट्विटर वापरायला सुरुवात केली. ट्विटर प्रभावीपणे कसे वापरता येऊ शकते ते पाहिल्यांदाच अनुभवले. तेव्हापासून मी माझ्या स्वतः च्या सीपीडीसाठी आणि शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी ट्विटरचा नियमितपणे वापर करतो. शिक्षकांच्या उपयुक्त पोस्ट्स शेअर केल्यामुळे जे शिक्षक फारसे निपुण नाहीत त्यांनाही भरपूर माहिती उपलब्ध होते आणि त्याचा ते फायदा करून घेऊ शकतात. मला हे सांगताना अतिशय आनंद होतो की, मी आजवर ९९५ ट्विट्स केली आहेत आणि माझे १३९५ फॉलोअर्स आहेत. TAG बैठकांनतर TAG Coordinators जी मते मांडताना ती देखील मी ट्वीट करतो आणि माझ्या प्रतिक्रियेसोबत फोटो शेअर करतो. माझ्या ८०% ट्विट्स तेजस प्रकल्पाबद्दल आहेत. यामुळे शिक्षक व SARPs यांना देखील ट्विट्रवर येऊन इंग्रजी भाषा शिकवण्याबद्दल अधिक जास्त माहिती मिळवण्याची प्रेरणा मिळाली.

मी एक चिंतनशील पत्रिका ऑनलाईन सुरु करण्याबद्दल विचार करत होतो आणि त्यातून ब्लॉगिंगची सुरुवात केली. WhatsApp ट्विटर हे काही कायमस्वरूपी नाहीत पण ब्लॉग दीर्घकाळपर्यंत टिकून राहून शकतो आणि ब्लॉगमधील मजकूर शोधून काढला जाऊ शकतो. मे २०१७ मध्ये मी ब्लॉगिंग करायला सुरुवात केली. आजवर मी ३० पेक्षा जास्त ब्लॉग्स लिहिले आहेत. मी TAG ना दिलेल्या भेटी आणि वर्गातील निरीक्षणे हे याचे प्रमुख विषय आहेत. (हे माझे लिखाण शिक्षकांना देखील खूप आवडते.)

तेजसमध्ये तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन दिले गेल्यामुळे महाराष्ट्रातील शिक्षकांना एकत्र येण्यासाठी एक प्लॅटफॉर्म मिळाला. माहितीची अमर्याद देवाणघेवाण आणि पूर्वी कधीही मिळाल्या नव्हत्या इतक्या मुक्त शिक्षणाच्या संधी यामध्ये याची खूप मदत झाली.

# मार्गदर्शन व निरीक्षण कौशल्यांचा विकास

**कल्पना बनसोड** यांनी २००२ साली प्राथमिक शिक्षक म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. २०१६ सालापासून गडचिरोली जिल्ह्यात त्या SARP म्हणून काम करत आहेत.

**तेजसच्या** प्रभावाबद्दल कल्पना यांचे मनोगत त्यांच्याच तोंडून ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

ब्रिटिश कौन्सिल ट्रेनिंग कन्सल्टन्टससोबत तेजस प्रकल्पाची देखरेख आणि मूल्यांकन कामे करत असताना मला वर्ग निरीक्षण कसे करावे ते शिकायला मिळाले. शिक्षकांना त्यांच्या कामगिरीबद्दल सकारात्मकता आणि रचनात्मकतेकडे नेणारा, त्यांच्या विकासाला प्रोत्साहक ठरेल असा प्रतिसाद कसा द्यायचा ते मी या कामातून शिकले. मी सॅडविच फीडबॅकबद्दल वाचले होते पण जेव्हा मी ट्रेनिंग कन्सल्टन्टसना ते वापरताना पाहिले तेव्हा मला कळून आले की, त्याचा शिक्षक आणि TAG Coordinators वर किती सकारात्मक प्रभाव होऊ शकतो.

उदाहरणार्थ, माझ्या असे निदर्शनास आले की, एक शिक्षक TAG बैठकांमध्ये जे काही शिकले होते ते अंमलात आणण्याचा प्रयत्न करत होते. काही विद्यार्थ्यांनी एक नाटिका सादर केली आणि इतर विद्यार्थ्यांनी ती पाहिली. प्रेक्षक विद्यार्थ्यांकडून संवाद पाठ करून घेतले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काहीच चुका केल्या नाहीत. माझ्या प्रतिसादात मी दोन गोष्टींवर भर दिला. त्यांनी त्या पाच मुलांना का निवडले आणि ज्यांनी फक्त गप्प बसून ते पाहिले त्यांचे काय. त्या मुलांना अजून कसे समाविष्ट करून घेता आले असते ? त्या शिक्षकांनी मान्य केले की, त्या पाच विद्यार्थ्यांचे इंग्रजी चांगले होते आणि त्यांनी असेही सांगितले की, यापुढे ते संमिश्र ग्रुप्स बनवतील ज्यामुळे प्रत्येकाला संधी मिळेल. माझा दुसरा मुद्दा पाठांतराबद्दल होता. शिक्षकांनी मान्य केले की, मुलांना स्वतःचे संवाद तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. काही दिवसांनी अचानक दिलेल्या भेटीत मला त्यांचा एक नाटिका उपक्रम बघायला मिळाला आणि मला अतिशय आनंद झाला की, त्यांनी प्रत्येक चार विद्यार्थ्यांचे तीन समूह तयार केले होते. प्रत्येक समूहाला वेगवेगळे विषय दिले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे संवाद तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर, प्रत्येकाला आळीपाळीने सहभागी होण्यासही वाव दिला. मुलांना एकमेकांना समजून, सांभाळून घेण्याची सवय झाली होती आणि काही चुका जरी झाल्या असल्या तरी त्यांनी सर्वांनी अतिशय आत्मविश्वासाने हा उपक्रम पूर्ण केला.

प्रतिक्रिया देताना शिक्षकाच्या बलस्थानावर लक्ष केंद्रीत करायचे हे मी शिकले. एखादा शिक्षक खूप जास्त चुका जरी करत असेल तरी त्याच्यामध्ये काही न काही बलस्थान असते, जसे मुलांसोबत त्यांचे सख्य किंवा एखादा उपक्रम राबवण्याची पद्धत इत्यादी. नाहीतर सुधारणेला कुठे-कुठे वाव आहे त्याबद्दल चर्चा करताना सूचना करणे योग्य ठरते. असे करत असताना नकारात्मक भाषा न वापरण्याची काळजी घेतली गेली पाहिजे. सुधारणेला कुठे वाव आहे त्याची चर्चा करताना प्रश्न विचारणे नेहमी चांगले असते, उदाहरणार्थ, जर तुम्ही या ऐवजी हे केले असते तर जास्त चांगले झाले असते असे तुम्हाला वाटते का ? हे तंत्र वापरले तर शिक्षक सूचनांचा, चर्चेचा, अधिक मोकळ्या बलस्थानाचा उल्लेख ठळकपणे केल्याने चर्चेचा समारोप सकारात्मकतेने होतो. तर असा असतो सॅन्डविच फीडबॅक !

# TAG Coordinators व शिक्षकांना मदत व मार्गदर्शन

**सचिन यादव** हे गेली १८ वर्षे शिकवत आहेत. ते नाशिक जिल्ह्यामध्ये प्रभारी SARP आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल सचिन यादव यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया या क्यूआर कोडला स्कॅन करा.

SARP म्हणून प्रशिक्षणातून मी मार्गदर्शक बनलो. जेव्हा मी एखादा शिक्षक किंवा TAG Coordinator च्या विकासाच्या एखाद्या मुद्द्याला विचार करत असतो तेव्हा तेजसमध्ये मला मिळालेली शिकवण वापरून सकारात्मक, रचनात्मक प्रतिसाद देतो, त्यामुळे शिक्षकांना प्रोत्साहन मिळते आणि ते स्वतःच उपाययोजना शोधून काढतात.

सकारात्मक भाषेचा वापर, चुका दुरुस्त करण्याच्या विविध पद्धती आणि प्रतिसादाविषयीची विशिष्ट धोरणे यामुळे मार्गदर्शक म्हणून माझी भूमिका अधिक सशक्त बनली आहे. यातून मला व मी ज्यांना मार्गदर्शन करतो त्या सर्वांना लाभ मिळत आहेत. उदाहरणार्थ, विकासाच्या अनेक संधी सांगण्यापेक्षा मी आता फक्त एकाच गोष्टीची निवड करतो (जसे, सूचना देणे, सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे, गतिबोध उपक्रम वापरण्यासाठीची कारणे) आणि त्याबद्दल सखोल चर्चा करतो. प्रतिसादाबद्दलच्या चर्चा देखील अधिक साचेबद्ध असतात, कारण आता मी प्रिऑबजर्वेशन ते पोस्टऑबजर्वेशन फॉरमॅट वापरतो. निरीक्षण पूर्व चर्चेमुळे जवळीक निर्माण होण्यास मदत होते, शिक्षकांना धड्यामधून बोलता येते व निरीक्षणासाठी तयार होता येते. दुसरीकडे निरीक्षणानंतरच्या चर्चेमुळे शिक्षक वेगळे, नवीन काय करू शकतात याबद्दलचे त्यांचे विचार, कल्पना व्यक्त करण्यास वाव मिळतो. सरतेशेवटी मी काही सूचना मांडतो. परंतु त्याआधी ज्याचे निरीक्षण करण्यात आले आहे त्या शिक्षकाच्या बलस्थानांबद्दल जाणीवपूर्वक ठळकपणे उल्लेख करतो.

या संपूर्ण प्रक्रियेत मला जी शिकवण मिळाली त्याची मार्गदर्शक म्हणून काम करताना मला खूप फायदा झाला. निरीक्षणांमुळे सातत्याने सुधारणांना वाव मिळतो, शिक्षकांच्या विशिष्ट गरजा आणि संदर्भ ओळखून त्यानुसार काम करता येते. त्यामुळे आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, शिक्षक स्वतः हून प्रतिक्रिया मागतात, त्यांना प्रतिक्रियांची उत्सुकता असते, दडपण नाही!

**वर्गातील उपक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग.**



# प्रात्यक्षिकीकरण : शेकडो शब्दांइतकी प्रभावी ठरणारी एक कृती

**कृतिका बुरघाटे** यांनी १९९८ साली हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषा शिक्षक म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. आता SARP म्हणून त्या गडचिरोली जिल्ह्याच्या प्रभारी आहेत.

**तेजस** आणि त्याच्या प्रभावाबद्दल कृतिका बुरघाटे यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया या क्यूआर कोडला स्कॅन करा.

गडचिरोलीमध्ये काम करत असताना TAG Coordinator बनण्यासाठी पुरेशा संख्येने शिक्षकांकडून अर्ज मिळवणे हे माझ्यासमोरील सर्वात मोठे आव्हान होते. काही शिक्षक आणि केंद्र प्रमुख सुरुवातीला या प्रकल्पात सहभागी होण्यास तयार नव्हते. भाषणे, माहिती विश्लेषण, अहवाल, यशस्वी TAGs ची चित्रे, उदाहरणे आणि व्हिडीओज यांचा वापर करून शिक्षकांना प्रोत्साहित करण्याचा मी प्रयत्न केला. पण याचा फारसा काही फायद झाला नाही. शिक्षकांच्या मनात प्रशिक्षण कार्यक्रमांबद्दल आधीपासून काही कल्पना होत्या, प्रशिक्षण हे व्यावहारीक कमी आणि सैद्धांतिक जास्त असते, त्याचा वर्गात प्रत्यक्ष शिकवण्यामध्ये फारसा फायदा होत नाही हे त्यांच्या मनात पक्के बसलेले होते. अशा प्रशिक्षणासाठी प्रवास करून जाण्यासाठी शिक्षक नाखूष असायचे. तेव्हा मला आठवले की, तेजस प्रशिक्षणात कोणत्याही ॲक्टिव्हिटीच्या आधी प्रात्यक्षिके दाखविली जायची. त्यामुळे प्रशिक्षणातील विषय जास्त स्पष्टपणे, सहजपणे समजायचा. प्रशिक्षणात शिक्षकांचा सहभाग वाढावा यासाठी मी हाच दृष्टिकोन वापरण्याचे ठरवले.

मी TAG बैठका कशा असतात आणि डिजिटल मीडिया कसा वापरायचा त्याची प्रात्यक्षिके देण्यास सुरुवात केली आणि अतिशय उत्तम प्रतिसाद मिळू लागला.TAG बैठक आणि बाहेरील TAG Coordinator ची भूमिका काय असते ते मी समजावून सांगू लागले. यामुळे परिस्थितीत सुधारणा होऊ लागली.

तेजस प्रकल्पात प्रकल्प नियोजनाबद्दल जे प्रशिक्षण दिले होते त्याचाही खूप फायदा झाला. दिवसाच्या प्रत्येक टप्प्यावर कोण, काय, कधी आणि कसे काम करणार त्याची आखणी मी केली TAG Coordinator सोबत आम्ही निश्चित केले की, रिसोर्स बुकचे कोणते भाग आम्ही वापरणार आहोत आणि त्यामागची कारणे देखील ठरवली. सर्वात शेवटी आम्ही संपूर्ण स्क्रिप्ट एकत्र जुळवली, हे सर्व करताना सोप्या इंग्रजीचा वापर केला. उदाहरणार्थ, सिरोंचामध्ये TAG Coordinator नव्हते आणि त्याठिकाणी TAG सुरू होणे खूप गरजेचे होते. विभागप्रमुखऽ मुख्याध्यापक आणि ब्लॉक रिसोर्स पर्सन्स यांच्याकडून सहकार्य मिळणे माझ्यासाठी आवश्यक होते. बैठकांनंतर बीआरपीज कडून प्रत्येक क्लस्टरमधून कमीत कमी दोन उमेदवार पाठवले. शिक्षकांकडून ज्यांना चांगला प्रतिसाद मिळाला होता अशा TAG Coordinator ना आम्ही यशस्वितांचे अनुभव, व्हिडिओज पाठविले आणि आमच्या योजनेनुसार TAG बैठक घेतली. सत्राच्या शेवटी शिक्षक खूपच उत्साही झालेले होते. या सत्रामध्ये आपल्याला खूप काही शिकायला मिळाले याची जाणीव त्यांना झालेली होती. ते सहभागी होण्यासाठी उत्सुक होते. इतकेच नव्हे तर, त्यांनी असेही सांगितले की, जर ते TAG Coordinator म्हणून निवडले जाऊ शकले नाहीत तर ते भविष्यात TAGs साठी सोयी उपलब्ध करवून देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करतील.

ही पद्धत खूपच यशस्वी झाली. लवकरच माझ्या लक्षात आले की, आता स्वयंसेवकांची संख्या भरपूर झालेली होती आणि प्रत्येक क्लस्टरसाठी फक्त एकाचीच निवड करण्याचे काम कठीण होऊन बसणार होते. प्रात्यक्षिक पद्धतीचा हा परिणाम दिसून आला होता.

एक कृती १०० शब्दांपेक्षा कैक पटींनी जास्त प्रभावी ठरली!

# सीपीडी १४० शब्दात

**निसार शेख** हे १३ वर्षे शिकवत आहेत. म्हणून ते औरंगाबाद जिल्ह्याचे प्रभारी आहेत.

**निसार शेख** तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल काय बोलतात ते पाहण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

तेजस प्रकल्पात सहभागी झाल्यामुळे माझ्यामध्ये शिक्षक ते शिक्षक एज्युकेटर असे परिवर्तन घडून आले. तेजस प्रशिक्षणामध्ये इतर गोष्टींबरोबरीनें आम्हाला माहिती पुस्तिकांचे लिखाण, प्रकल्प राबविणे आणि हितधारकांसोबत संवाद याचेही प्रशिक्षण दिले गेले होते. पर्सनल लर्निंग नेटवर्क्स (पीएलएन)आणि सीपीडीसाठी सोशल मीडियाचा वापर या दोन अतिशय रोचक आणि प्रेरणादायी गोष्टी मला शिकायला मिळाल्या.

आज मी ट्विटरवर खूप सक्रिय आहे. माझे ६७० फॉलोअर्स असून मी ५६० वेळा ट्विट्स केले आहेत. #teachingspeaking#elt #fluency #accuracy यासारखे हॅशटॅग्स वापरून मी माझ्या पोस्ट्स करत असतो. यामधून मला सीपीडीचा प्रभाव दिसून आला. इंग्रजी भाषा शिकवण्याच्या बाबतीत कोणकोणत्या घडामोडी होत आहेत त्याची इत्यंभूत माहिती मला यामुळे मिळत राहते. मी विविध परिषदा, परिसंवाद आणि वेबिनार्सची माहिती घेत राहतो आणि शक्य असेल तर त्यात सहभागी होतो. ट्विटरमुळे मला भाषेबद्दल माहिती मिळवण्यात मदत होते, शब्दसंग्रह वाढवणारे खेळ, विचार प्रवृत्त करणारी उपकरणे यांची माहिती मिळते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांसोबत मी त्यांचा उपयोग करतो.

एका सहकाऱ्यासोबत मी पहिले ट्विटर चॅट (#Tejas4ed) आयोजित केले, जे महिन्यातून एकदा होते. जेव्हा आम्हाला सर्वात पहिल्यांदा ट्विटर चॅट करण्यास सांगितले गेले तेव्हा मला वाटले होते की यासाठी काहीच तयारी आणि नियोजनाची आवश्यकता नाही पण हा माझा गैरसमज ठरला ! दीर्घ चर्चा, चॅटस कसे आयोजित करायचे याची तपशीलवार माहिती आणि भरपूर तयारीनंतर आम्ही अखेरीस सज्ज झालो. एकाद्या विषयावर संशोधन करणे आणि आधीच प्रश्न तयार करून ठेवणे यामुळे मला विषयावर लक्ष केंद्रित करण्यात मदत झाली. प्रश्न खुल्या स्वरूपाचे असणे आवश्यक असते जेणेकरून सहभागींना १५ ते २० मिनिटे तरी चॅट करता येऊ शकेल. चॅट खूप यशस्वी झाला, शिक्षकांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. शिक्षकांनी आपल्या समस्या मांडल्या तसेच एकमेकांना समस्या सोडवण्यात सहकार्य केले. अशा प्रकारे सर्व स्नेह्यांचा एक सहयोग समूह तयार झाला. पुढील चॅट्ससाठी आम्ही इतर SARPs आणि TAG Coordinator ना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली.

आजवर आम्ही इंग्रजी भाषा शिकवण्यासंदर्भात साधारण डझनभर तरी ट्विटर चॅटस आयोजित केले आहेत. ही तासाभराची सत्रे असतात, यामध्ये जास्तीत जास्त १४० शब्दांच्या पोस्ट्स करता येतात आणि जवळपास ८०-९० शिक्षक सहभागी होतात. जे या चॅट्समध्ये सहभागी होऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी आयोजक ब्लॉग्स तसेच WhatsApp पोस्ट्स मध्ये चॅट्सचा सारांश उपलब्ध करवून देतो. माझ्या सीपीडीसाठी मी स्वयंपूर्ण असावे अशी माझी इच्छा होती आणि ते कसे करावे हे मला 'तेजस'ने शिकवले.

# निरीक्षणे : प्रोत्साहन व मार्गदर्शनाची संधी

**श्रीधर नागरगोजे** जे १९९१ सालापासून इंग्रजी विषय शिकवत आहेत. २०१६ सालापासून ते बीड जिल्ह्याचे SARP प्रभारी आहेत.

**श्रीधर नागरगोजे** यांचे तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

TAG Coordinator व शिक्षकांनी आपापल्या सीपीडीची जबाबदारी घ्यावी यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे हे SARP या नात्याने माझे काम आहे. माझे असे ठाम मत आहे की, शिक्षक जितका जास्त प्रेरित असेल तितके जास्त परिवर्तन वर्गात घडून येईल. इंग्रजी शिकवण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनावे, मोकळेपणाने, नवनवीन कल्पना, विचार अंमलात आणून शिकवावे अशी इच्छा शिक्षकांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे.

दर महिन्याला मी तीन किंवा चार TAG बैठकांचे आणि TAG शिक्षकांच्या धड्यांचे निरीक्षण करतो. पहिल्या वर्षी मी ब्रिटिश कौन्सिल ट्रेनिंग कन्सल्टन्टससोबत राहून निरीक्षण कसे करावे ते शिकलो, TAG Coordinator तसेच शिक्षकांना त्याच्या धड्यांच्या मांडणीमध्ये मदत कशी करावी आणि त्यांच्या विकासाला पोषक ठरेल असा प्रतिसाद कसा द्यावा ते मी शिकलो. त्यामुळे जेव्हा मी निरीक्षणाला सुरुवात केली तेव्हाही मी त्याच पद्धतीचा वापर केला. काही विशिष्ट मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करून त्यानुसार माझा प्रतिसाद दिला.

सुरुवातीच्या निरीक्षणांमध्ये जास्तीत जास्त वेळ TAG Coordinator बोलत असत आणि कितीतरी शिक्षक अजिबात बोलत नसत.TAG Coordinator सोबत होणाऱ्या माझ्या चॅट्समध्ये मी त्यांना बैठकीबद्दल विचार प्रकट करण्यास मदत केली आणि शिक्षकांना जास्त सक्रियपणे कसे सहभागी करून घेता येईल त्यासाठी नवनवीन उपाय शोधून काढण्यासाठी प्रोत्साहित केले.

TAG Coordinator व शिक्षकांमध्ये परिवर्तन आणि विकास घडून आलेला पाहणे खूप उत्साहवर्धक आहे. विचार कल्पना प्रकट करायच्या म्हणजे काय ते सुरुवातीला शिक्षकांना समजत नव्हते. तुम्ही हे आधीपेक्ष वेगळेपणाने कसे करू शकाल ? असे प्रश्न विचारल्याने त्यांना प्रकटीकरणात मदत मिळाली. माझ्या स्वतःच्या कल्पना, उपाय त्यांना सांगणे मी कटाक्षाने टाळले. आपले निरीक्षणाची भीती न वाटता त्याविषयी सकारात्मक विकासाचा दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे हे मी शिकलो. काहीवेळा धडे घेण्याच्या पर्यायी पद्धती मला सुचवाव्या लागत. पण जेव्हा शिक्षकांच्या लक्षात आले की, वर्गात नवनवीन प्रयोग करणे मजेशीर आहे तेव्हा ते यामध्ये सहभागी झाले. यानंतरची माझी निरीक्षणे ठरवून दिलेल्या फॉरमॅटनुसार पार पडू लागली.

आता मला दिसून येते की, जे TAG Coordinator आधी इंग्रजी बोलायला घाबरायचे ते आता अतिशय आत्मविश्वासाने इंग्रजी बोलू शकत आहेत. आता मुले देखील शिक्षकांसोबत संवाद साधतात. त्यांच्या इंग्रजी भाषा वापरात सुधारणा झाली आहे आणि उत्साह देखील वाढला आहे. TAG Coordinator शिक्षक WhatsApp ग्रुप्सवर आपापले वर्गातील अनुभव एकमेकांना सांगतात. आता तेजस ही सर्वांचा सहभाग असलेली चळवळ बनली आहे.

# ईएलटी चर्चासाठी WhatsApp चा वापर

**सुचिता माहोरकर** या गेली १७ वर्षे शिक्षक आहेत. गेल्या दोन वर्षांपासून त्या SARP म्हणून ओरंगाबाद जिल्ह्याच्या प्रभारी आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल सुचिता यांचे मत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

SARPs म्हणून आम्हाला विविध विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये सोशल मीडीया व्यवस्थापन, मार्गदर्शन कसे करावे आणि सामग्री लिखाण यांचा समावेश होता. सुरुवातीला मला सोशल मीडिया वापराचे खूप दडपण आले होते पण आता माझ्या सीपीडीसाठी मी सोशल मीडियाचा नियमितपणे वापर करते. मी अनेक वेबसाईट्सना भेटी दिल्या आहेत, ईएलटीबद्दल लेख वाचले आहेत आणि काही मॅसिव्ह ओपन ऑनलाइन केर्सेसदेखील (MOOC) केले आहेत. चुका दुरुस्ती, प्रतिसाद यंत्रणा, शिक्षण साहित्याचा वापर कसा करावा आणि वर्गातील फळा प्रभावीपणे कसा वापरावा या बऱ्याच गोष्टी मी यातून शिकले.

तेजसमध्ये मी ज्यांना मार्गदर्शन देते त्यांच्यासोबत देखील सोशल मीडिया वापरणे मी सुरू केले. Tag Coordinators आणि शिक्षकांसाठी मी WhatsApp वर दोन ग्रुप्स तयार केले आहेत. या ग्रुप्सवर आम्ही विविध शैक्षणिक विषयांवर चर्चा करत असतो. ऑनलाईन चॅट्स करत असताना आपले आचरण कसे असायला हवे हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा मला शिकावा लागला. उदाहरणार्थ, सदस्यांनी अनावश्यक संदेश आणि फॉरवर्ड्स पोस्ट करून ग्रुप स्पॅम करू नये हे खूप गरजेचे असते. सदस्य चॅटच्या माध्यमातून किती वेगवेगळ्या प्रकारे संवाद साधतात, सहभागी होतात हे पाहणे खूप रोचक ठरते. काहीवेळा आवश्यक ते सर्व वाचन करून माहिती गोळा करून शिक्षक मला आश्चर्यचकित करतात. काहीवेळा आयोजकांपैकी एकजण चांगली तयारी करून आलेला असतो. पण इतरांची तयारी झालेली नसते. चॅट्सचे नियोजन करताना मला हे सर्व मुद्दे लक्षात घ्यावे लागतात. विषयावर चार प्रश्न तयार करून मी आयोजकांना मदत देखील करते. हे प्रश्न एखाद्या व्यक्तीला विचारले जाऊ शकतील असे असावे लागतात, त्यामधून विषयाच्या मुख्य गाभ्यावर लक्ष केंद्रित करावे लागते, काय, कधी आणि का वापरले जावे आणि त्यासोबत काय करावे आणि काय करू नये यांचाही समावेश त्यामध्ये असावा लातो. सदस्यांपैकी काहीजण सक्रिय योगदान देत नाहीत पण मला असे लक्षात आले आहे की, ते नंतर त्यांच्या सवडीनुसार सर्व चॅट्स वाचतात.

चॅटसमध्ये आम्ही शिक्षकांनी दरदिवशी सराव करावा यावर भर देतो आणि त्यांच्यामध्ये सुधारणा कशा घडून येतील ते पाहतो. म्हणूनच मी मानते की, या चॅट्समुळे शिक्षकांच्या सीपीडीला चालना मिळते. उदाहरणार्थ एका चॅटमध्ये आम्ही एकविसाव्या शतकातील चार कौशल्यांचा आणि ती आमच्या विद्यार्थ्यांमध्ये कशी आणता येतील याचा समावेश केला. मी MOOCs साठी काही महत्त्वाच्या लिंक्स देखील शैअर केल्या ज्या काही शिक्षकांनी पाहिल्या आहेत. एकाच मुद्द्यावर काम करणाऱ्या मित्रमंडळींचे छोटे WhatsApp ग्रुप्स, जसे विविध इयत्तांना शिकवणारे शिक्षक किंवा उर्दू माध्यमात शिकवणारे शिक्षक यांचे ग्रुप्स केल्यामुळे सहकारी एकमेकांसोबत संवाद साधू लागले आहेत आणि त्यामुळे सहकार्याला प्रोत्साहन मिळाले आहे. या ग्रुप्समध्ये समस्या व आव्हाने मांडली जातात आणि त्यावरील उपायांबद्दल चर्चा केली जाते. या चर्चांमध्ये सहभागी झाल्यामुळे मला आव्हानांचा सामना कसा करायचा त्याचे नवे उपाय समजतात. WhatsApp कसे वापरायचे हे शिकवल्यामुळे माझ्या ज्ञानात भर पडली. मी आता Tag Coordinators व शिक्षकांना अधिक सक्षमतेने मार्गदर्शन करू शकते.

# नियोजन न करणे म्हणजे अपयशाचे नियोजन

**सुरेंद्र करवंदे** हे गेली २४ वर्षे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. SARP म्हणून ते औरंगाबाद व यवतमाळ जिल्ह्यांचे प्रभारी आहेत.

सुरेंद्र करवंदे यांचे तेजस आणि त्यांच्या प्रभावाबद्दल मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

'तेजस' सुरू होण्याच्या आधी शाळेत माझे इंग्रजी शिकवणे खूप वरवरचे होते आणि एखादे व्याख्यान द्यावे त्याप्रकारे मी शिकवत असे. आज मी कोणत्याही धड्याची तयारी जितक्या सखोलपणे करतो तितकी तयारी मी याआधी करत नव्हतो. तेजसमध्ये मी शिकलो की, कामाचे नियोजन न करणे म्हणजे त्या कामात अपयशाचे नियोजन करण्यासारखेच आहे. आता जेव्हा मी धड्यांचे नियोजन करतो तेव्हा मी सर्वात आधी परिणाम, उद्दीष्टये, वेळ विविध टप्पे आणि कोणता दृष्टिकोन, कोणती पद्धत वापरायची ते ठरवतो. मी संवादासाठी कोणती पद्धत वापरणार आहे हे देखील ठरवतो. एंगेज स्टडी ॲक्टिव्हेट (ईएसए), प्रेझेन्ट प्रॅक्टिस प्रोड्युस आणि टोटल फिजिकल रिस्पॉन्स या शिकवण्याच्या विविध पद्धती मी शिकलो. यामधून इंग्रजी कसे शिकवायचे यांचे माझे ज्ञान विस्तारात गेले. याचा थेट परिणाम वेळ व्यवस्थापनावर झाला आणि टीचर टॉक टाइम (टीटीटी) कमी करण्यात मदत मिळाली. नियोजनामुळे मला विद्यार्थ्यांना कसे व कधी सहभागी करून घ्यायचे ते ठरवण्यातही मदत होते आणि मी फ्लॅशकार्ड्स, हॅन्डआउट्स अशी साधने तयार करू शकतो. आधी विद्यार्थी आनंदी दिसायचे पण आता त्यांच्या प्रगतीमधूनही शिकवण्याचे चांगले परिणाम दिसून येतात. प्रश्नावलींच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या प्रतिसादांमधूनही त्यांना कसे शिक्षण मिळत आहे ते दिसून येते.

शिक्षक एज्युकेटर म्हणून स्पोकन इंग्लिश व ॲडव्हान्स्ड स्पोकन इंग्लिश या RAA च्या प्रोजेक्टमध्ये जेव्हा मी काम करायला सुरुवात केली तेव्हा हे खूप जास्त उपयुक्त ठरले. 'तेजस'मध्ये मी ज्या पद्धती शिकलो त्यामुळे मी संवाद आणि सहभागाचा समावेश असलेली सामग्री तयार करू शकलो. यामध्ये टीटीटी तसेच स्टुडंट्स टॉकिंग टाईम या मुद्यांचाही यामध्ये समावेश असतो. त्याचप्रमाणे धडा नियोजनाबद्दल मी जे प्रशिक्षण घेतले त्यामध्ये या पद्धतीचा समावेश केला आणि सहभागींना आपल्या धड्यांचे नियोजन प्रभावीपणे करता यावे यासाठी व्यवहार्य उपकरणे पुरविली, संवादाला अनुकूलता निर्माण करून दिली आणि विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्याचा सराव व्हावा यावर भर दिला.

जेव्हा मी TAG शिक्षकांच्या काही वर्गांचे निरीक्षण केले तेव्हा त्यांनी धड्यांच्या नियोजनाची पद्धत वापरली तसेच WhatsApp चॅटमध्ये मी जो ESA दृष्टिकोन आणला होता तो देखील त्यांनी वापरला हे पाहून मला अतिशय आनंद झाला. त्यांनी अतिशय तपशीलवार नियोजन केले होते. त्यामध्ये संवाद आणि प्रत्येक टप्प्यासाठी विशिष्ट वेळ दिलेला असणे यांचा समावेश होता.

माझ्या तंत्रज्ञान कौशल्यांचा झालेला विकास तर मला स्वतःलाही अचंबित करणारा आहे. ब्रिटिश कॉन्सिलचा प्राथमिक शिक्षणासंदर्भातील एक ऑनलाईन कोर्स मी केला, त्यामध्ये मी ईमेल आणि ऑनलाईन मेसेज कसे पाठवायचे ते शिकलो. आधी मला लॉग इन कसे करायचे ते देखील माहिती नव्हते आणि मी आता झूमवर मिटींग्स घेतो. दिलेले काम वेळेत पूर्ण करणे. संवाद कौशल्यांचा विकास, स्त्रोतांचे यशस्वी व्यवस्थापन आणि आत्मविश्वास वाढवण्यात 'तेजस'ने माझी मदत केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पाने मला नियोजनात मदत केली–नियोजन यशाचे !


TATA TRUSTS
BRITISH COUNCIL 70 YEARS IN INDIA
BRITISH COUNCIL 70 YEARS IN INDIA
TATA TRUSTS

# TAG Coordinators

'तेजस' मध्ये TAG Coordinator अर्थात टीचर ऍक्टिव्हिटी ग्रुप कोऑर्डिनटरची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. RAA आणि ब्रिटिश कौन्सिलने काटेकोर निवड प्रक्रियेच्या माध्यमातून २१२ पात्र शिक्षकांची निवड केली. त्यांना ब्रिटिश कॉन्सिलने १९ दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व एक ऑनलाईन कोर्स दिला गेला आणि TAG Coordinator म्हणून नियुक्त करण्यात आले. प्रशिक्षण व ऑनलाईन कोर्समध्ये या शिक्षकांना फॅसिलिटेशन कौशल्ये शिकवली गेली. या प्रशिक्षणामुळे त्यांच्या इंग्रजी भाषा नैपुण्यांमध्ये सुधारणा झाली, वर्ग शिक्षणाशास्त्रासंबंधीचे त्यांचे ज्ञान व समज यामध्येही मोलाची भर पडली.

प्रत्येक TAG Coordinator हा दोन किंवा तीन TAGs चा प्रमुख असतो. प्रत्येक ग्रुपची दर महिन्यातून एकदा तीन तासांची बैठक होते. प्रत्येक TAG बैठकीला एकाच भागातील जवळपास २० सरकारी शिक्षक उपस्थित असतात. त्यामुळे या बैठकांमध्ये स्थानिक पातळीवर शिक्षकांना भेडसावणाऱ्या अडचणी व त्यांवरील उपाययोजना यावर भर दिला जाऊ शकतो. त्यांच्या स्वतःच्या सीपीडीशी संबंधित गरजा व इतर आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या जाऊ शकतात. TAG Coordinator मधील मजकूर वापरून TAG Coordinator बैठक घेतात आणि आपापल्या समूहातील शिक्षकांसाठी त्याचा स्रोत म्हणून वापर करतात. प्रत्येक TAG साठी सरावाच्या दृष्टीने उपयुक्त ठरावे म्हणून ते WhatsApp सुविधेचा वापर करतात. त्यामुळे शिक्षकांना वर्गात येणाऱ्या अडीअडचणी व उपाययोजना याबद्दल एकमेकांशी चर्चा करता येते. वर्गामध्ये ते कोणकोणते उपक्रम राबवत आहेत याचे व्हिडीओज ग्रुपसोबत शेअर करू शकतात. या संवाद व देवाणघेवाणीचा उपयोग करून शिक्षक TAG बैठकांच्या व्यतिरिक्त देखील ते आपल्या सीपीडीमध्ये सुधारणा घडवून आणू शकतात.

TAG Coordinator नी शिक्षक एज्युकेटर म्हणून त्यांच्या स्वतःच्या कौशल्यांवर, TAG मध्ये सहभागी होणाऱ्या शिक्षकांवर आणि त्यांच्या स्वतःच्या वर्गांवर प्रकल्पाचा कसा प्रभाव पडला याचे अनुभव यापुढील भागात सांगितले आहेत.

# सकारात्मक दृष्टिकोन – उत्तम सुरुवात

**प्रियांका दळवी** या प्राथमिक शाळेतील शिक्षिका आहेत. त्या औरंगाबाद जिल्ह्यामध्ये TAG Coordinator आहेत. त्या तिसरी ते पाचवी इयत्तांच्या एकूण २१ विद्यार्थ्यांच्या मल्टी-ग्रेड वर्गाला शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल प्रियांका दळवी यांचर मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

प्रियांका यांचे विद्यार्थी आणि त्यांचे अनुभव याबद्दल वाचण्यासाठी कृपया पान क्रमांक ८० वर जा.




**मुलांचा शब्दसंग्रह वाढावा यासाठी माईड मॅपचा वापर करताना.**

### दृष्टिकोन व उद्दिष्टांमध्येबदल.

तेजसमध्ये सहभागी होण्याआधी मला विविध स्त्रोतसाधनांचा शोध कसा घ्यायचा. त्यांचा उपयोग कसा करून घ्यायचा त्याची काही माहिती नव्हती. विद्यार्थ्यांसोबत माझा फारसा संवाद होत नसे. माझ्या शिकवण्याच्या पद्धती देखील खूपच पारंपारिक आणि शिक्षक-केंद्रित होत्या. नेमून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे हा माझा उद्देश असायचा. 'तेजस'मध्ये सहभागी झाल्यापासून शिकवणे आणि शिकणे या दोन्ही प्रक्रियांबद्दलचा माझा संपूर्ण दृष्टिकोनच बदलला.

TAG Resource Book मध्ये मला अनेक उपक्रमांची माहिती मिळाली जे मला वर्गात विद्यार्थ्यांसोबत करता येण्याजोगे होते. माझी शिकवण्याची पद्धत कशी चुकीची आहे ते मला यातील लेख वाचून समजले. इतकेच नव्हे ते, माझे वर्गातील शिकवणे विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त रोचक, मजेशीर आणि उपयुक्त कसे ठरेल याचा विचार करण्यातही मला याची खूप मदत झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे TAG बैठकांमध्ये सहकाऱ्यांसोबत साधलेला संवाद, विचार, चर्चा यांची देवाणघेवाण यामुळे मला व्यावसायिक विकासात मदत मिळाली.

### वर्ग ते परिसंवाद

लिसनिंग ॲड यंग स्टुडंट्स या TAG Resource

Book मधील लेखामध्ये वर्गात बोलक्या बाहुल्या वापरण्याची कल्पना मला वाचायला मिळाली. मी धड्यांमध्ये त्याचा वापर केला आणि माझ्या लक्षात आले की, माझ्या विद्यार्थ्यांचा त्या धड्यातील रस लगेचच वाढला. हातातल्या बोलक्या बाहुल्या, काठीवर चिटकवण्याच्या बोलक्या बाहुल्या आणि बोटांवरच्या बाहुल्या वापरून गोष्टी सांगितल्या, नाटिकांचा सराव करून घेतला आणि सूचना देण्यासाठी देखील त्यांचा वापर केला. मुलांना याची इतकी गंमत वाटते की, ते स्वतःहून या बोलक्या बाहुल्यांसोबत इंग्रजीत बोलू लागतात.

मग मी याची माहिती इतर शिक्षकांनाही देण्याचे ठरविले. यातूनच मला जानेवारी २०१८ मध्ये भरवण्यात आलेल्या तेजस परिसंवादात सादरीकरणाची संधी मिळाली. नऊ जिल्ह्यातून आलेले TAG Coordinator आणि शिक्षकांनी माझ्या सादरीकरणाचे कौतुक केले. यामुळे प्रोत्साहीत होऊन मी फेब्रुवारी २०१८ मध्ये मुंबईतील चौथ्या इंटरनॅशनल एआयएनईटी परिषदेत सादरीकरण केले. How to create teaching-learning environment in my classroom with puppetry' माझ्या सादरीकरणाचा विषय होता. याठिकाणी देखील देशभरातून आलेल्या शिक्षकांनी माझ्या कामाची प्रशंसा केली व माझ्याकडून सूचना घेतल्या. यातूनच झालेल्या एका संवादातून मी ऍप्टीस ऍक्शन रिसर्च मॅटर स्कीम (AARMS) मध्ये सहभागी झाले. यामध्ये कृती संशोधनावर भर देण्यात येतो. सध्या मी या प्रकल्पामध्ये एक प्रशिक्षणार्थी आहे. कमी आत्मविश्वास असलेल्या मुलांचा वर्गातील सहभाग कसा वाढवू शकतो याबद्दल एका कृती संशोधन प्रकल्पामध्ये मी काम करत आहे. तेजसमुळे मला माझ्या पीएलएनचा विस्तार करण्यात मदत मिळाली.

शिक्षकांचे जसे TAGs असतात, त्याप्रमाणे माझ्या वर्गातील विद्र्थ्यांचे SAGs (Students Activity Groups) सुरु करण्यात पुढाकार घेतला. या ग्रुप्समध्ये विद्यार्थी त्यांच्या अभ्यासातील अडचणी एकमेकांना सांगू शकतात आणि त्या अडचणींवर स्वतःच आपापसात उपाय शोधून काढू शकतात. माझा मल्टी-ग्रेड वर्ग असल्यामुळे वरच्या इयत्तांमधील विद्यार्थी लहान विद्यार्थ्यांना मदत करतात. असे करत असताना मोठ्या विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाढतो, ते आपले विचार, कल्पना दुसऱ्यांसमोर मांडण्यात सक्षम बनतात. मुलांच्या इंग्रजी बोलण्यावर तर याचा खूप मोठा प्रभाव पडला आहे. इंग्रजी बोलण्याविषयी मुलांच्या मनात असलेली भीती कायमची पुसली गेली आहे. विद्यार्थी नवनवीन इंग्रजी शब्द शोधून काढतात. जेव्हा मी WhatsApp ग्रुपवर वर्गातील उपक्रमांचे व्हिडीओज शेअर करते तेव्हा पालक, विद्यार्थी ते बघतात. पालक देखील खुश आहेत. त्यांनी नमूद केले आहे की मुलांचे इंग्रजी सुधारले आहे.

**सर्वकष विकास**

'तेजस'मुळे मला व्यक्तिशः आणि व्यावसायिकदृष्ट्या विकासात मदत मिळाली. माझा आत्मविश्वास वाढला. शिकवण्याच्या नवीन पद्धतीच्या प्रभावामुळे मला आणि माझ्या विद्यार्थ्यांना अनेक सकारात्मक लाभ मिळाले आहेत, पालक आणि माझ्या सहकाऱ्यांनीही याची दखल घेतली आहे. मला मिळालेली शिकवण इतरांपर्यंत पोहोचवण्याच्या संधी मला या प्रकल्पामुळे मिळाल्या.



**विद्यार्थ्यांसोबत बोलक्या बाहुल्या वापरताना**

**प्रियांका दळवी** (TAG Coordinator)

**शाळा** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कावीतखेडा

**क्लस्टर** – वडोदबाजार
ब्लॉक फुलांबरी, **जिल्हा** – औरंगाबाद

# विद्यार्थी त्यांच्या शिक्षणाबद्दल अधिक जबाबदारीने वागू लागले आहेत.

**प्रतीक्षा गायकवाड** या गेली १० वर्षे शिकवत आहेत. त्या चौथीच्या मुलांना सर्व विषय शिकवतात. त्या नाशिक जिल्ह्याच्या TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल प्रतीक्षा यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

**'जम्प लेफ्ट, जम्प राईट' उपक्रम**




### सर्वात आधी एक शिक्षक

मी जरी एक TAG Coordinator असले तरी तेजसने मला सर्वात आधी एक शिक्षक म्हणून प्रभावित केले. या प्रभावामुळेच आता मी माझ्या विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण शिक्षण अनुभव निर्माण करते, त्यांनी मौजमजेने इंग्रजी भाषा शिकावी हा माझा उद्देश असतो. तेजस प्रकल्पातील साहित्यातून मी अनेक नवनवीन उपक्रम आणि कल्पना शिकले, तसेच माझ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचा वापर कसा करायचा तेही मला यामधून समजले.

इतर कितीतरी गोष्टींबरोबरीने माझी शिक्षणाची पद्धत देखील सुधारली आहे. उदाहरणार्थ, मुलांना जोडीने किंवा समूहात आखून दिले की शिक्षणाला प्रोत्साहन मिळते, मुले उत्साहाने शिकतात हे मला शिकता आले. माझ्या वर्गात याची प्रत्यक्षात अमंलबजावणी करताना माझ्या असे लक्षात आले की, यामुळे विद्यार्थी अधिक चांगले इंग्रजी बोलू व लिहू शकत आहेत. आता विद्यार्थ्यांना इंग्रजी सोपी वाटू लागली आहे. मुले आता इंग्रजीला अजिबात घाबरत नाहीत.

### शिक्षणाविषयी जबाबदारीची भावना

आपल्या अभ्यासाची जबाबदारी मुलांनी स्वत:वर घ्यावी, त्यांना इंग्रजीचा नियमितपणे सराव करण्यात मदत करण्यासाठी मी असे वातावरण निर्माण केले आहे. ज्यामध्ये त्यांना इंग्रजी बोलण्याच्या भरपूर संधी मिळत राहतात. यासाठी मी दुसरी ते चौथी इयत्तामध्ये प्रत्येक बॅचमध्ये स्कूल इंग्लिश लँग्वेज अम्बॅसॅडर्सची नियुक्ती केली आहे. जेव्हा जेव्हा एखादा तास मोकळा असेल किंवा मुलांना मोकळा वेळ असेल तेव्हा हे एसईएलएज स्लॅप द बोर्ड, जम्प लेफ्ट जम्प राईट, चेन ड्रिल, बॉल गेम, लॅडर रेस यासारखे उपक्रम करून घेतात. लहान वयात विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण अशाप्रकारे विकसित होताना पाहणे खूपच प्रोत्साहक असते. माझ्या शिकवण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्या स्वत:वर असावी हे मी शिकले आहे. त्याचप्रमाणे माझे विद्यार्थी देखील त्यांच्या अभ्यासाची जबाबदारी घेण्यास शिकले आहेत.

**प्रतीक्षा गायकवाड** (TAG Coordinator)
**शाळा –** जिल्हा परिषद शाळा, दिक्षी
**क्लस्टर –** ओझर टाऊनशिप
**ब्लॉक –** निफाड
**जिल्हा –** नाशिक

# शिक्षकांमध्ये आत्मविश्वास व लवचिकता निर्माण झाली.

**अशफिया सिद्दीकी** या आठ वर्षे शिक्षिका होत्या व आता डीआयईसीपीडीमध्ये सब्जेक्ट असिस्टंट आहेत. त्या ग़डचिरोली जिल्ह्यात TAG Coordinatorआहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल अशफिया यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

## सखोल शिक्षण

मी ज्या जिल्ह्यात काम करते त्याठिकाणी विद्यार्थ्यांची मातृभाषा गोंडी, छत्तीसगढी, मराठी, तेलगू यांच्यासहीत आठ भाषांपैकी कोणतीही असू शकते. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकवताना अशा विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजी या दोन द्वितीय भाषा कशा शिकवणार असा प्रश्न माझ्या सहकाऱ्यांना नेहमी पडलेला असायचा. 'तेजस' मुळे त्यांच्या दृष्टिकोन बदलला आणि 'शक्य' आहे अशी भावना शिक्षकांमध्ये निर्माण झाली.

इतर प्रकल्प आणि तेजस यांच्यामध्ये फरक असा आहे की इतर प्रकल्पांमध्ये प्रशिक्षण काही दिवस चालते आणि वर्गांवर परतेपर्यंत शिक्षक जे काही शिकलेले असतात ते विसरून जातात. पण तेजसमध्ये आम्ही दर महिन्याला भेटतो आणि त्यामुळे प्रशिक्षणात मिळालेली माहिती पुन्हा पुन्हा ताजी होत राहते. परिवर्तन दिसून यायला काही महिने जातात पण ते परिवर्तन खूप जास्त सखोल आणि दीर्घकाळपर्यंत टिकून राहील असे असते. ढअऋ Resource Book चा वापर शिक्षक एखाद्या माहितीच्या स्रोतांप्रमाणे करतात, त्यामधून शिकतात. त्यामध्ये देण्यात आलेले ओनियन रिंग्स आणि फ्लॅशकार्ड्स यासारखे उपक्रम आणि पद्धती, तंत्रे ते स्वत:च्या गरजा, परिस्थिती आणि वेळेप्रमाणे वापरतात. प्रत्येक शिक्षकाचा स्वत:चा शिकण्याचा वेग असतो आणि रिसोर्स बुक त्यांना मार्गदर्शन करते.

## सराव समुदाय विकसित करणे

तेजस ने आम्हाला दिशा दिली. ट्विटर, फेसबुक या सोशल मीडियाचा वापर तसेच सीपीडीचे ऑनलाईन कोर्सेस याचा उपयोग करून घेण्याविषयी शिक्षकांमध्ये खूप उत्साह



**उपक्रमाआधी सूचना करताना**

निर्माण झाला आहे. मी स्वत: हे सर्व वापरतेच शिवाय माझ्या शिक्षकांनाही त्यासाठी प्रोत्साहन देत राहते. 'Becoming a Better Teacher' यासारखे चजजउी मी तयार केले आहेत, ज्यामुळे मला माझ व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यात मदत मिळते. मी WhatsApp आणि ट्विटर चॅट् स देखील आयोजित करते.

TAGs मध्ये सहभागी झाल्यापासून शिक्षकांमध्ये इंग्रजी बोलण्यातला आत्मविश्वास वाढला आहे. त्यांनी साध्या-सोप्या उपक्रमांमधून इंग्रजी शिकवण्यास सुरुवात केली आहे. आपले विचार कसे प्रकट करायचे, कृती नियोजन कसे करायचे हे देखील ते शिकले आहेत. माझ्या स्वत:मध्ये देखील या कौशल्यांचा विकास झाला आहे.

**अशफिया सिद्दीकी** (TAG Coordinator)

**शाळा –** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झगडवाडी, **क्लस्टर –** बेटकाठी, ब्लॉक – कोरची, **जिल्हा –** गडचिरोली

# भीती ते आत्मविश्वास: इंग्रजी संभाषणाचा प्रवास

**सचिन इझळकर** हे गेली २१ वर्षे शिकवत आहेत. ते उच्च प्राथमिक शाळा शिक्षक असून सहावी आणि सातवीच्या वर्गांना शिकवतात. ते अमरावती जिल्ह्यात TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल सचिन यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.




**माईंड मॅप सोबत शब्द शिकवणे**

तेजस इझळकर यांचे विद्यार्थी व त्यांचे अनुभव याबद्दल वाचण्यासाठी कृपया पान क्रमांक ८१ वर जा.

### साहित्य-सामग्रीचा उपयोग करून घेणे

तेजस TAG Resource Book अतिशय उपयुक्त आहे. TAG बैठकांमध्ये वापरण्यासाठी अनेक उपक्रम मी यामधून शिकू शकलो. साहित्य-सामग्रीचा वापर करणे आणि भाषा संवाद कौशल्यांचा विकास हे माझ्यासाठी दोन प्रमुख मुद्दे ठरले. माझे पहिले आव्हान होते की मला TAG Resource Book मधून कल्पना अशा प्रकारे वापरायच्या होत्या की माझ्या विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत आणि मला पुस्तकातील जे धडे शिकवायचे आहेत ते नीटपणे शिकवले गेले पाहिजेत. प्रत्येक धड्याचा इच्छित परिणाम, प्रभाव साधला जावा अशा पद्धतीने उपक्रमांची रचना करण्यात मला रिसोर्स बुकने मदत केली. उदाहरणार्थ, दिशा दाखवणे आणि एखादी पाककृती ऐकणे.

माझ्या धड्यांमध्ये मी हे आवर्जून पाहतो की भाषा ही स्थानिक संदर्भांबरोबरीनेच माझ्या विद्यार्थ्यांच्या पातळीलाही अनुसरून असावी. उदाहरणार्थ, TAG रिसोर्स बुकच्या लँग्वेज डेव्हलपमेंट सेक्शनमध्ये गिविंग पर्सनल

इन्फॉरमेशन असा एक उपक्रम आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना स्वत:ची ओळख करून द्यायची असते.

पुस्तकामध्ये पाच ते सहा वाक्ये आहेत. पण मी त्यामध्ये वाढ केली. मुले स्वत:बद्दल बोलतात, आपल्या कुटुंबाबद्दल बोलतात. आणखी एक उदाहरण म्हणेज 'गोइंग टू हॉटेल' हॉटेलमधील ग्राहक व वेटर यांच्यातील एक संवाद यामध्ये आहे. मी यामध्ये वाढ करून पदार्थांच्या पाककृतीबद्दलच्या संवादाचा यामध्ये समावेश केला. गृहपाठ म्हणून मुलांना त्यांच्या पालकांसोबत एका पाककृतींबद्दल बोलण्यास सांगितले होते. नंतर वर्गात समूहांमध्ये मुलांनी आपापल्या पाककृती इंग्रजीमध्ये इतरांना सांगितल्या. यामधून मुले जे काही शिकली ते नाटिकेच्या अंतिम सादरीकरणात समाविष्ट करण्यात आले.

### अस्खलितपणा वि. अचूकपणा

बदल किती आणि कसा घडून आला आहे हे पाहण्याचे प्रभावी साधन म्हणजे अस्खलितपणा. एक TAG Coordinator या नात्याने मी असे मानतो की, उदाहरणांमधून विद्यार्थ्यांना पुढे नेले जाऊ शकते. मी माझ्या विद्यार्थ्यांमध्ये अस्खलितपणा विकसित करण्यासाठी खूप मेहनत केली. दररोजच्या नेमून दिलेल्या तीस मिनिटांमध्ये हे काम करणे खूप जिकिरीचे आहे. मी असे मानतो की, संभाषण कौशल्ये विकसित करताना आधी अस्खलितपणा आला पाहिजे आणि अचूकता नंतर. म्हणूनच पहिल्या वर्षी मी धड्याचा प्रतिसाध टप्पा सोडला तर इतरत्र कोठेही मुलांच्या चुका दुरुस्त केल्या नाहीत. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी मी अचूकतेवर काम करायला सुरुवात करतो.

प्रेरणा ही यशाची गुरुकिल्ली असते. माझ्या कामाची सुरुवात मी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यापासून केली. तुम्ही सर्व गोष्टी वर्गात शिकू शकत नाही, म्हणून मी मुलांना आरशासमोर सराव करायला सांगतो. सर्व नाटिकांचा ते सराव करतात. उदाहरणार्थ, डॉक्टरांची मुलाखत. दोन्ही भूमिकांचा ते आरशासमोर सराव करतात आणि दुसऱ्या दिवशी संपूर्ण वर्गासमोर सादर करतात. त्यांना तयार संवाद दिल्याने देखील फायदा होतो. मुले गावातील विविध भागांमधून येतात. त्यामुळे आम्ही त्यांचे समूह तयार केले आहेत. शाळेत येताना त्यांना इंग्रजीत बोलण्यास सांगितले आहे, टीव्हीवर काय पाहिले, गृहपाठाबद्दल इत्यादी विषय ते इंग्रजीमध्ये बोलतात. मध्यान्ह जेवणाच्या वेळी तसेच शाळा सुटल्यावर घरी परत जाताना देखील ते तसेच करतात. यामुळे दररोज इंग्रजी बोलण्याचा वेळ वाढतो.



**वर्गाबोहरील एक उपक्रम**

**सचिन इंझळकर** (TAG Coordinator)

**शाळा –** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, पिंपळगाव, निपाणी

**क्लस्टर –** सलोड

**ब्लॉक –** नांदगाव खांदेश्वर

**जिल्हा –** अमरावती

# चिंतनशील शिक्षक बनणे

**खाजा माईनुद्दीन** यांना शिक्षणक्षेत्रातील कामाचा २० वर्षाचा अनुभव आहे. प्राथमिक शाळा शिक्षक म्हणून काम करत असताना त्यांना RAA औरंगाबाद येथे सब्जेक्ट असिस्टंट बनण्याची संधी मिळाली. आता ते शिक्षक एज्युकेटर आणि TAG Coordinator म्हणून काम पाहतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल खाजा यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

वर्गात खाजा कशाप्रकारे उपक्रम राबवतात ते पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८८ वर जा.



**उपक्रमाआधी वर्गात सूचना देताना**

## शिक्षक केंद्री ते विद्यार्थी केंद्री

तेजस मध्ये सहभागी होण्याआधी माझे वर्ग इंग्रजी भाषेच्या इतर कोणत्याही पारंपरिक वर्गासारखेच असायचे. वर्गाचे संपूर्ण नियंत्रण सदासर्वकाळ शिक्षकाकडेच हीच माझी देखील पद्धत होती. माझ्या विद्यार्थ्यांना कोणते शब्द कठीण वाटतील हे देखील मीच ठरवत असे. तेजस मध्ये मी माझ्या शिकवण्याच्या पद्धतीबद्दल विचार करायला शिकलो. जेव्हा मी मागे वळून पाहतो तेव्हा मला जाणवते की मी जे काही करत होतो ते फारसे प्रभावी नव्हते. तेजसमुळे भाषा शिक्षण मौजमजेचे, रोचक आणि मुलांना सामावून घेणारे बनले. माझ्या तसेच माझ्या TAG शिक्षकांच्या वर्गांमध्ये उपक्रमांवर आधारित शिक्षण सुरु झाले. आता मी अभिमानाने सांगू शकतो की, माझे विद्यार्थी इंग्रजीच्या तासाची वाट पाहत असतात. मी शिकवण्यापेक्षा शिकण्यावर जास्त भर देतो. TAG Resource Book मध्ये अनेक उपक्रम आहेत, ते उपयुक्त आहेतच शिवाय ते राबविणे खूप सोपे आहे.

आमच्या संदर्भात विचार करता या सर्व कल्पना व्यवहार्य आहेत. या उपक्रमांच्या मदतीने माझ्या विद्यार्थ्यांना वर्गामध्ये भाषा सराव करणे सोपे बनले आहे. मुलांना सहभागी कसे करवून घ्यायचे, मुलांकडून कृती आणि परिणाम कसा साधून घ्यायचा, त्यांच्यासाठी अभ्यास सोपा कसा करायचा ते मी शिकलो.

### सहयोगात्मक वाचन कार्य

TAG बैठकांमध्ये ज्या गोष्टी शिकलो त्या माझ्या वर्गांमध्ये राबविण्यास मी सुरुवात केली. उदाहरणार्थ, चेन ड्रिल किंवा फ्लॅशकार्ड्स. माझ्या TAGs आणि वर्गांमध्ये मी व्यक्तिगत, जोडीजोडीने किंवा समूह कार्य अशा पद्धती वापरतो. मी राबविलेली सर्वात रोचक बाब ठरली. **जिगसॉ वाचन**. वाचन संवादी आणि सहयोगात्मक बनावे यासाठी हा प्रयोग केला गेला.



**मुले कृती करून गाणे म्हणतात.**

मुलांचे तीन किंवा पाच गट केले आणि त्यानुसार वाचन मजकूर देखील विभागला गेला. प्रत्येक विद्यार्थी त्याला नेमून दिलेला परिच्छेद वाचतो आणि आपापल्या समूहामध्ये त्यावर चर्चा करतो. त्यानंतर विद्यार्थ्यांचे नवीन गट तयार केले जातात. आता सदस्य नवे असतात, ते वेगळे परिच्छेद वाचतात. त्यामुळे समूहाला संपूर्ण मजकूर वाचता येतो. आपण काय वाचन केले ते मुले एकमेकांना सांगतात आणि त्यावर प्रश्नांबद्दल चर्चा करतात. हे एक चांगले धोरण आहे कारण यामध्ये प्रत्येकाला खूप जास्त वाचावे लागत नाही. त्यामुळे त्यांच्याकडे वाचलेला मजकूर समजून घेण्यासाठी आणि त्यावर विचार करण्यासाठी, आपले विचार प्रकट करण्यासाठी वेळ असतो. लेख स्वरूपात मजकूर असेल तर हे सोपे असते पण संवाद असतील तर मात्र कठीण जाते.

### माझ्यासारख्या शिक्षकांसाठी सल्ला

तेजस चा माझ्यावर खूप प्रभाव पडला. स्वत:चे विचार प्रकट करण्यासाठी, नवीन कल्पना समजून घेण्यासाठी TAGs हा अगदी योग्य मंच आहे. मी एका बिगर-इंग्रजी शाळेतून आलो आहे पण आता मला इंग्रजी बोलण्याचा आत्म विश्वास मिळाला आहे. माझ्यासारख्या इतर शिक्षकांना मी सांगू इच्छितो की, जर तुम्हाला काही शिकण्याची इच्छा असेल तर तुम्हाला त्याबद्दल बोलावे लागेल. शिक्षणक्षेत्रातील

नेटवर्क्सबद्दल माहिती शोधून काढावी लागेल. तुम्ही अशा ऑनलाईन समुदायांमध्ये सहभागी झाले पाहिजे ज्याठिकाणी तुम्हाला चर्चा करता येतील, विचार शेअर करता येतील आणि प्रकट होता येईल. तुम्ही एकमेकांना सहकार्य केले पाहिजे. शिक्षणासाठी मुक्त आणि सकारात्मक वातावरण असणे गरजेचे आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्या आजूबाजूला तसे वातावरण निर्माण केले पाहिजे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रबळ इच्छाशक्ती. यशस्वी होण्यासाठी या दोन गोष्टी खूप आवश्यक आहेत. सुरुवात स्वत:पासून करा.



**नवीन शब्द शिकवण्यासाठी ड्रिल**

**खाजा मोईनोद्दीन** (TAG Coordinator)

**शाळा –** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पंढरपूर
**क्लस्टर –** पंढरपूर,
**ब्लॉक –** औरंगाबाद

# अस्खलितपणा सुधारणे आणि विद्यार्थ्यांना अधिकाधिक मोकळपण मिळवून देण्याचे मार्ग

**स्वानंद थोरवे** हे २३ वर्षे शिकवत आहेत. सहावी ते आठवीच्या वर्गांना ते इंग्रजी शिकवतात. बीड जिल्हयामध्ये ते TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल स्वानंद थोरवे यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.



**नवीन शब्द समजावून सांगताना हावभावांचा वापर**

इंग्रजी शिकायचे असेल तर आत्मविश्वास हवा. आधी TAG बैठकांमध्ये शिक्षक फक्त ऐकायचे पण आता बरेच प्रोत्साहन दिले गेल्यानंतर ते चर्चांमध्ये उत्साहाने सहभागी होतात, त्यांचे अनुभव आणि कल्पना इतरांना सांगतात. शिक्षकांमध्ये अस्खलितपणा आणि आत्मविश्वास वाढला आहे. दोन वर्षानंतर ते माझ्याशिवाय TAG बैठका करू शकत आहेत. मुलांना मदत म्हणून आम्ही पहिला तास इंग्रजीसाठी राखीव ठेवतो कारण त्यावेळी मुले ताजीतवानी आणि उत्साही असतात. या सरावामुळे शिक्षकांना त्यांची भाषा कौशल्ये विकसित करता येतात शिवाय विद्यार्थ्यांचाही विकास घडवून आणता येतो. हेच 'तेजस' चे उद्दिष्ट आहे.

तेजसमध्ये आम्ही अनेक उपक्रम आणि तंत्रे शिकलो आहोत ज्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना वर्गामध्येन इंग्रजी बोलण्यासाठी प्रोत्साहन दिले जाऊ शकते. गाणी, कथाकथन यांचा वापर कसा करायचा, बहुभाषिक मुले असतील तर कसे शिकवायचे, चुका दुरुस्त करण्याच्या वेगळ्या पद्धती हे सर्व यामध्ये शिकायला मिळाले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आम्ही वेगवेगळ्या गोष्टींचा अवलंब करणे आणि कामे वेगळ्या प्रकारे करणे शिकलो.

अस्खलितपणा सुधारणे आणि विद्यार्थ्यांना अधिकाधिक मोकळेपणा मिळवून देणे

अस्खलितपणा सुधारणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी केले जाणारे उपाय मजेशीर असणे आवश्यक आहे. नवीन भाषा शिकण्यासाठी संधी निर्माण करणे, आपल्या संदर्भात त्याचा समावेश करणे हे एक तंत्र आहे.

TAG Resource Book मध्ये लर्निंग बाय रीडिंग सेक्शन आहे, त्यामध्ये मिश्र भाषा वापरून कथाकथनाबद्दल एक लेख आहे. मी माझ्या शिकवण्यामध्ये त्याचा वापर केला. मुले गाऊ शकतील अशी २० गाणी लिहिली. उदाहरणार्थ, एलिफंट दादा, एलिफंट दादा

व्हॉट डू यु डू?

बोला ..... व्हॉट डू यु डू?

आय ईट ग्रीन ग्रास अँड वॉक व्हेरी स्लो

अशाप्रकारे गाण्यात माकड, मांजर, गाय हे प्राणी येतात. मी मुलांकडून काही हावभावांची गाणी म्हणवून घेतो. सिक्स लिटिल माईस यासारख्या गाण्यामध्ये मुले नाकावर बोट ठेऊन उंदीर दाखवतात आणि कात्रीप्रमाणे बोटे चालवून कापण्याची कृती दर्शवतात.

गाणी बनवणे आणि ती वर्गात बसवून घेणे हे तेजसच्या प्रशिक्षणातून मला मिळालेले खूप मोठे फलित आहे. माझ्या विद्यार्थ्यांना या कविता इतक्या आवडतात की ती मधल्या सुट्टीत देखील त्याचा सराव करताना मला दिसतात.

मी इतर उपक्रम देखील करून घेतो. लँग्वेज डेव्हलपमेंट सेक्शनमध्ये एक धडा आहे - माय फॅमिली ट्री, यामध्ये माझे विद्यार्थी एका झाडाचे चित्र काढतात आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांची नावे त्यामध्ये लिहितात. नंतर ते एकमेकांना आपल्या कुटुंबाची माहिती करून देतात. वर्गात आणि TAG बैठकांमध्ये सुरुवातीची ॲक्टिव्हिटी म्हणून हे खूप यशस्वी झाले.

तेजस बैठकांमध्ये मी वर्गातील फळा प्रभावीपणे कसा वापरायचा ते शिकलो. आता मी फळ्याची विभागणी करतो, त्यावर नवीन शब्द लिहितो आणि धड्याची उद्दिष्ट्ये लिहितो. मी वर्गातील माझा बोलण्याचा वेळ कमी करण्याचा प्रयत्न करतो आणि विद्यार्थ्यांचा बोलण्याचा वेळ वाढवतो.

माझ्या विद्यार्थ्यांना अतिशय मोकळेपणाने शिकता यावे हा माझा प्रयत्न असतो. उदाहरणार्थ, जेव्हा मी त्यांच्या लिखाणातील चुका दाखवून देतो तेव्हा मी त्यांना उत्तरे सांगत नाही. मी चुका दुरुस्त करतानाचे काही कोड बनवले आहेत, जसे स्पेलिंग चुकीसाठी एसपी, शब्द क्रमासाठी डब्ल्युओ आणि विराम चिन्हांसाठी पीयु. मी कोड लिहितो आणि मग विद्यार्थी डिक्शनरी पाहून किंवा आपापसात चर्चा करून उत्तरे मिळवतात. अशाप्रकारे मुले शिक्षकावर अवलंबून राहत नाहीत आणि आपल्या अभ्यासाची जबाबदारी स्वत: घेतात. अर्थात जेव्हा जेव्हा त्यांना गरज लागेल तेव्हा त्यांच्या मदतीसाठी मी असतोच!



**मुलांवर देखरेख करताना**

स्वानंद थोरव (TAG Coordinator)

शाळा - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पागुळगाचान

क्लस्टर - ब्रहमगाव

ब्लॉक - आष्टी

जिल्हा - बीड

# निर्भीड विद्यार्थी आणि उत्साही वर्ग

**संजीवनी भारदे** या गेली १४ वर्षे शिकवत आहेत. सध्या त्या तिसरी इयत्तेला सर्व विषय शिकवतात. त्या अमरावती जिल्हयामध्ये TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल संजीवनी यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा..




**व्यक्तिगत वाचनाचा वेळ**

संजीवनी यांच्या वर्गातील सुव्यवस्थित फळा

**इंग्रजी एक साधन**

तेजसच्या आधी आमच्याकडे इंग्रजी शिकवणे आणि इंग्रजीच्या अभ्यासाला पोषक असे वातावरणच नव्हते. आम्ही कविता वाचायचो, शब्द आणि स्पेलिंग्स वाचायचो. विद्यार्थ्यांना वाक्ये बनवता यायची नाहीत. इंग्रजी एक कला आहे जी शिकावी लागते आणि आता इंग्रजी एक साधन बनले आहे. आता आम्ही जेव्हा हवामान अंदाज किंवा किराणा दुकानात असा एखादा उपक्रम करतो तेव्हा मुले वाक्ये बोलण्याचा सराव करतात आणि ती वाक्ये दैनंदिन जीवनात वापरतात. शिकणे हे पूर्वीपेक्षा जास्त मजेशीर बनले असल्यामुळे पाठांतर पद्धतीतून आम्ही बाहेर पडलो आहोत आणि उपक्रमांवर आधारित अभ्यास करत आहोत. आधी विद्यार्थ्यांना इंग्रजीची भीतीवाटायची पण ते वर्गात एकमेकांसोबत बोलताना साधी वाक्ये बोलतात. उदाहरणार्थ, एक बोलतो, 'I forgot my eraser today.' त्यावर दुसरा म्हणतो, 'Oh! No problem, you can use mine.' माझे विद्यार्थी निर्भीड बनले आहेत आणि वर्गात उत्साह वाढला आहे.

### नेहमीच्या जीवनातील इंग्रजी

TAG रिर्सोस बुक च्या लँग्वेज डेव्हलपमेंट सेक्शनमधील एक उपक्रम खूप वेळा वापरते. त्याचे नाव आहे 'न्यूज रिपोर्ट.' मी तो माझ्या TAG बैठकांमध्ये आणि माझ्या वर्गात देखील वापरला आहे. दर दिवशी मी माझ्या मुलांना सांगते की, आदल्या दिवशी ते शाळेतून घरी पोहोचले तेव्हा त्यांच्या घरातील व्यक्ती काय काय करत होत्या याचा वृत्तांत वर्गात येऊन द्यावा. त्यांनी संपूर्ण वाक्य इंग्रजीत बोलून हा वृत्तांत द्यावा अशी अपेक्षा असते. उदाहरणार्थ, 'When I reached home yesterday, my grandmother was watching TV and my father was reading the newspaper.'

हे उपक्रम मुलांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यासाठी भाषा शिकणे एक मजेशीर अनुभव बनतो. जेव्हा आम्ही एकत्र जेवतो तेव्हा मुले मला डब्यातील पदार्थांची इंग्रजी नावे विचारतात. उदाहरणार्थ, एकदा एका मुलाने मला करवंदासाठी इंग्रजी शब्द कोणता असे विचारले.

### आशेचा किरण

माझ्या TAG चा एक WhatsApp ग्रुप देखील आहे, यामध्ये मी वर्गातील व्हिडीओज शेअर करते आणि इतर शिक्षक देखील तेच करतात. हा ग्रुप शिक्षकांसाठी प्रयोग, शिक्षण आणि विचार प्रकटीकरणाचा मार्गदर्शक बनला आहे.

शिकवण्याचा दर्जा वाढावा यासाठी तेजसने सरकारी शाळांमध्ये आशेचा किरण निर्माण केला आहे. आता शिक्षक आपल्या TAGs मध्ये नवनवीन उपक्रम करत असतात आणि त्यांचा समावेश आपल्या धड्यांमध्ये करतात. त्यामुळे इंग्रजीचे शिक्षण अधिक जास्त प्रभावी बनले आहे. इंग्रजी शिकवण्याच्या पद्धतीचे शिक्षकांचे ज्ञान वाढले आहे त्यामुळे ते अधिक जास्त प्रयोग, उपक्रम करत आहेत.

आता मी नाविन्यपूर्ण उपक्रमांचा ऑनलाईन शोध घेते आणि माझे ढअत्रि आणि वर्गांमध्ये ते राबवते. याचा नियमित सराव केल्यामुळे माझी भीड चेपली आहे. बिकमिंग अ बेटर टीचर, टीचिंग फॉर सक्सेस व अंडरस्टँडिंग इंग्लिश हे ऑनलाईन कोर्सेस करण्याची मला संधी मिळाली. यामुळे माझी शिकवण्याची कौशल्ये वाढली, मुलांना नेमके काय हवे आहे ते मी आधीपेक्षा जास्त चांगल्याप्रकारे समजून घेऊ शकते.



**स्वत:च्या वाचनाचा वेळ**

तेजसने आम्हाला शिकवण्याकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन दिला आहे. इतकेच नव्हे तर, जीवनाविषयीचे आमचे विचार बदलले आहेत. तेजसमधून मी शिकले की चांगले प्रशिक्षक हे प्रत्येक व्यक्तीला एक समान महत्त्व आणि निष्पक्ष वागणूक देतात. ते कधीही भेदभाव करत नाहीत. मला जाणवले की, प्रत्येकामध्ये क्षमता आहेत, त्यामुळे प्रतिसाद सकारात्मकतेने दिले गेले पाहिजेत. आता माझे उद्दिष्ट आहे – तुम्ही कितीही जाणकार असाल तरी विनम्र रहा आणि प्रत्येकाला आपल्या वेगाने आणि आपल्या वेळेत शिकण्याची संधी द्या.

**संजीवनी भारदे** (TAG Coordinator)

**शाळा** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळ क्रमांक ९, मोर्शी

**क्लस्टर** – मोर्शी

**ब्लॉक** – मोर्शी

**जिल्हा** –अमरावती

# धड्यातील भाषा कौशल्यांकडे विशेष लक्ष

**योगेश वाढाई** हे गेली १३ वर्षे शिकवत आहेत. ते पाचवी ते सातवीच्या वर्गांना शिकवतात आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल योगेश यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

या उपक्रमाबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया पान क्रमांक ९१ वर जा.

**मी तेजसमध्ये काय शिकलो.**

तेजस प्रकल्पातून मी अनेक वेगवेगळी कौशल्ये शिकलो, खासकरून वेळेचे आणि लोकांचे व्यवस्थापन. संवादाच्या विविध पद्धती आणि एन्गेज स्टडी ॲक्टिव्हेट (ईएसए) हा दृष्टिकोन मी शिकलो. वर्गामध्ये उपक्रमांवर आधारित शिकवणे कसे असते ते देखील मी या प्रकल्पात शिकलो. यामुळे आधीचे शब्द आणि वाक्प्रचार पुन्हा एकदा समजून घेण्यात मदत मिळते. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी माझ्या चौथी इयत्तेच्या बॅचला भाज्यांवर एक धडा होता (युनिट ७). त्यावेळी मी भाज्यांची माहिती देणारे हावभावांसहीत सादर करता येईल असे गाणे तयार केले. याम्ध्ये गाजर, कोबी, वांगे आणि इतर भाज्यांचा समावेश केला होता. हा सहभावाचा टप्पा होता. त्यानंतर अभ्यासासाठी मी त्यांना फ्लॅशकार्ड्स दाखवली आणि प्रश्न विचारले, जसे, 'Do you like cabbage?' मग त्यांनी उत्तरादाखल 'Yes, I do.' किंवा 'No I don't.' असे म्हणणे अपेक्षित होते. संपूर्ण वर्गात हे ड्रिल करून झाल्यानंतर मी त्यांच्या जोड्या तयार केल्या आणि आपापसात संवाद बोलण्यास सांगितले. त्यानंतर मी सक्रियता टप्प्याकडे वळलो. यावेळी मी उदाहरणादाखल चॉकलेट, दूध आणि चहा हे पदार्थ घेतले होते.

**माझ्या वर्गात मी नियमितपणे करत असलेल्या ॲक्टिव्हिटीज**

मी गणित आणि इंग्रजीचा शिक्षक आहे. सध्या मी फक्त पाचवीच्या वर्गाला इंग्रजी शिकवत आहे. Year 1 TAG Resource Book मधील 'When is the festival ?' ही ॲक्टिव्हिटी मी केली होती. यामध्ये आम्ही जोड्याजोड्यांमध्ये महिन्याचे नाव बोललो. त्यानंतर पुस्तकात दिलेली कामे जोड्या व समूहात पूर्ण केल्यानंतर शेवटच्या ॲक्टिव्हिटीसाठी प्रत्येकाने एकमेकाला होळी किंवा स्वातंत्र्य दिन यासारख्या सणांबद्दल विचारले. मी हे ढअत्रृ बैठक आणि माझ्या वर्गात केले आणि TAG WhatsApp ग्रुपवर त्याचा व्हिडीओ शेअर केला. शिक्षकांनी याचे कौतुक केलेच, शिवाय हीच ॲक्टिव्हिटी आपापल्या वर्गात करण्यासाठी ते प्रोत्साहित झाले. पुढील ढअत्रीं मध्ये त्यांनी त्यांचे व्हिडीओज शेअर केले.

**आमूलाग्र बदल**

आधी आम्ही फक्त अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर द्यायचो. पण आता आम्ही जो धडा शिकवत आहोत त्यामधून भाषा कौशल्ये कशी विकसित होतील यावर भर देतो. इंग्रजी संभाषणाचा आम्ही खूप सराव करतो आणि प्रत्येक विषयात 'क्लासरूम लँग्वेज' हा मुद्दा असतोच. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हापासून आम्ही विद्यार्थी केंद्री वर्ग तयार केले आहेत. तेव्हापासून माझ्या विद्यार्थ्यांचा इंग्रजी बोलण्यातला आत्मविश्वास वाढला आहे. आधी जेव्हा मी त्यांना इंग्रजीत बोलायला सांगायचो तेव्हा ते अस्वस्थ व्हायचे पण आता ते संपूर्ण वर्गासमोर बोलायला नेहमी तयार असतात!

**योगेश वाढई** (TAG Coordinator)

**शाळा –** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, मिचगाव (बूज)

**क्लस्टर –** रांगी

**ब्लॉक –** धानोरा, **जिल्हा –** गडचिरोली

# संवादात्मक क्रियांमधून विद्यार्थ्यांना प्रेरणा

**ज्ञानेश्वर गुरुकर** हे गेली १४ वर्षे शिकवत आहेत. सध्या ते पाचवीच्या वर्गाला शिकवत आहेत आणि त्यांच्या वर्गात ३३ विद्यार्थी आहेत. ते नागपूर जिल्ह्यात TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल ज्ञानेश्वर यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

ज्ञानेश्वर त्यांच्या वर्गामध्ये ॲक्टिव्हिटी घेत असताना पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८६ वर जा.



**विद्यार्थिनी उपक्रमामध्ये सहभागी होताना**

**इंग्रजीच्या धडयांमध्ये ट्रेजर हंट**

तेजसमध्ये सहभागी होण्यापूर्वी माझी पद्धत अशी होती की, मी जे काम दयायचो ते माझे विद्यार्थी करायचे. आता त्यांना अभ्यासात जितकी मजा येते तितकी मजा तेव्हा येत नव्हती. तेजसमध्ये मला अनेक मनोरंजनपर आणि संवादात्मक उपक्रमांची माहिती मिळाली. माझ्या विद्यार्थ्यांना 'फाईंड द ट्रेजर' हा खेळ तर खूपच आवडला कारण यामध्ये त्यांना वर्गाबाहेर जाऊन दिलेल्या खाणाखुणा, दिशा ओळखून, लक्षपूर्वक ऐकून आणि खऱ्या परिस्थितीत इंग्रजीचा वापर करायचा असतो. विद्यार्थ्यांना दोन समूहांमध्ये विभागले जाते. एक टीम वस्तू लपवते. दुसऱ्या टीमचे डोळे बांधलेले असतात आणि पहिली टीम त्यांना वस्तू कोठे लपविली आहे त्याच्या खाणाखुणा सांगते. 'go left', 'go right.,' 'jump', 'bend down' अशी वाक्ये मुले वापरतात. प्रत्येक टीम आळीपाळीने हे करते.

**इतरांसोबत शेअरिंग**

मी या ॲक्टिव्हिटीजचे व्हिडीओज बनवतो व ते युट्युबवर शेअर करतो. माझे विद्यार्थी आणि TAG शिक्षकांना मी ते दाखवतो. मुले खूप उत्साहाने ते बघतात. शिक्षकांना आपापल्या वर्गामध्ये त्या ॲक्टिव्हिटीज करण्याची प्रेरणा मिळते. नंतर ते आपले व्हिडीओज TAG बैठकांमध्ये शेअर करतात. असे काहीवेळा केल्यानंतर TAG मधील सर्व शिक्षक यामध्ये सहभागी झाले व त्यांनी TAG यशस्वी केले.

**ज्ञानेश्वर गुरुकर** (TAG Coordinator)

**शाळा** – जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेर

**क्लस्टर** – चाचेर

**ब्लॉक** – मौदा

**जिल्हा** – नागपूर

# एक SEN विद्यार्थ्याची कथा

**मनीषा वैद्य** या गेली १७ वर्षे शिकवत आहेत. गेली १२ वर्षे त्या ब्लॉक स्तरावर सब्जेक्ट रिसोर्स पर्सन म्हणून कार्यरत आहेत. २०१६ मध्ये त्यांनी अमरावती जिल्ह्यामध्ये TAG Coordinator म्हणून तेजस प्रकल्पात काम करण्यात सुरुवात केली.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल मनीषा वैद्य यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

या उपक्रमाबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया पान क्रमांक ९१ वर जा.



**TAG मधील शिक्षकांवर देखरेख करताना**

### प्रेरणा ही गुरुकिल्ली

प्रेरणा किती महत्त्वाची असते ते मला तेजस ने शिकवले. इतरांना प्रेरित करायचे असेल तर प्रशंसा करणे आवश्यक आहे. माझ्या TAGs मधील शिक्षकांसोबत काम करत असताना मी हे नेहमी करते. त्याचप्रमाणे माझ्या विद्यार्थ्यांसोबत देखील मी अशीच वागते. विद्यार्थ्यांसोबत असे वागणे जास्त महत्त्वाचे आहे कारण सर्वच्या सर्व मुलांना अस्खलितपणे बोलता आले पाहिजे हे उद्दिष्ट मला पूर्ण करायचे आहे. इतरांनी माझ्या कामाची प्रशंसा केली म्हणूनच २०१८ साली औरंगाबाद येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय तेजसन परिसंवादामध्ये मी आत्मविश्वासाने सादरीकरण करू शकले. यावेळी माझ्या सादरीकरणाला पुरस्कार मिळाला. त्यामुळे माझा उत्साह दुणावला!

### अस्खलितपणा – आव्हान ते संधी

मी ज्याठिकाणी काम करते त्या ग्रामीण

भागात शिक्षकांना इंग्रजी बोलण्याची फारशी संधी मिळत नाही. बोलण्याच्या सरावाचा अभाव असल्यामुळे ते घाबरतात आणि इंग्रजी बोलायला संकोच करतात. पण जेव्हा मी त्यांना TAG बैठकीची संरचना समजावून सांगितली तेव्हा त्यांना पटले की स्वत:ला व्यक्त करण्याची ही योग्य जागा आहे. लँग्वेज डेव्हलपमेंट सेक्शनमधील नाटिका नियमितपणे केल्यामुळे त्यांची भीती देखील दूर झाली. इतर सहकारी देखील अशाप्रकारे इंग्रजी बोलतात हे त्यांना दिसू लागले. त्यातून त्यांना सतत प्रयत्न करत राहण्यासाठी प्रोत्साहन मिळत गेले. मला देखील इंग्रजी बोलण्याचा सराव नव्हता पण आता मी TAG बैठकांमध्ये इंग्रजी बोलते, स्पर्धा व सादरीकरणांमध्ये सहभागी होते. आता माझा आत्मविश्वास खूप जास्त वाढला आहे.

**प्रत्येक मूल शिकू शकते.**

ब्लॉक रिसोर्स पर्सन म्हणून मी स्थानिक शाळांना नियमितपणे भेटी देत असते. चांदूरबाजारमधील एका SEN विद्यार्थिनीबद्दल मला तुम्हाला सांगायचे आहे. तसेच आम्ही तिच्यामध्ये आणि तिच्या वातावरणामध्ये जो लक्षणीय बदल घडवून आणू शकलो त्याबद्दल देखील मी सांगणार आहे. ही लहान मुलगी वर्गातील कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होत नसे. पण जेव्हा मी खेळ खेळण्यास सुरुवात केली तेव्हा तिने सुरुवातीला संकोच केला पण नंतर ती स्वत:हून सहभागी झाली. तिला वाटले आम्ही खेळ खेळत आहोत. ती अजिबात बोलत नसे पण या खेळांमध्ये तिने काही इंग्रजी शब्द आणि वाक्प्रचार बोलण्यास सुरुवात केली. ती इतरांपेक्षा मागे होती हे खरे पण कोणीही तिला घाई केली नाही आणि तिच्या मित्रमंडळींनी देखील तिची मदत केली. तिचे वर्गशिक्षक हे तेजस प्रकल्पातील नव्हते. त्यामुळे तिला इतर TAG शिक्षकांच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीला आणण्यासाठी मला तिच्यासबोत स्वतंत्रपणे बोलावे लागत असे. इतरांना प्रोत्साहन कसे द्यायचे, उपक्रम कसे करून घ्यायचे ते मी तिला शिकवले. आता ही विद्यार्थिनी अतिशय उत्साहाने सहभागी होते, वर्गात पुढे येते (तसेच शाळेच्या असेंब्लीमध्ये देखील), ती काय काय शिकली आहे ते सर्वांसमोर सादर करते हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटते. हे सगळे घडून येण्यासाठी दोन वर्षे जावी लागली आणि तिला अचूक बोलता जरी येत नसले तरी गावातील सगळे तिला सहभागासाठी प्रोत्साहन देतात. व्यक्तिगत माहिती देण्यासाठी ओनियन रिंग ही तिची आवडती ॲक्टिव्हिटी आहे. चित्रकला, भाषणे अशा स्पर्धांमध्ये देखील ती भाग घेते.




**TAG बैठकीत शिक्षकांचा उपक्रमात सहभाग**

**मनीषा वैद्य** (TAG Coordinator)
ब्लॉक रिसोर्स पर्सन,
**जिल्हा –** अमरावती

# इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास विकसित करण्यासाठी शिक्षकांची मदत

**हरीश पातोडकर** हे गेली १५ वर्षे शिकवत आहेत. ते हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या लहानशा (स्रोतसाधने कमी प्रमाणात आहेत अशा) शाळेत पाचवीच्या वर्गाला सर्व विषय शिकवतात. ते हिंगोली जिल्ह्यात TAG Coordinator देखील आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल हरीश यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.




**मुलांना सहभागी करवून घेण्यासाठी फ्लॅशकार्ड्सचा वापर**

## आत्मविश्वास आणि सख्य निर्माण करण्यासाठी उपाययोजना

तीन क्लस्टर्समध्ये TAG Coordinator म्हणून काम करत असताना शिक्षकांकडून दिल्या जाणाऱ्या योगदानाला प्रोत्साहन देणे हे माझे पहिले काम होते. जे शिक्षक इंग्रजी बोलायला संकोच करत त्यांना सर्वाधिक प्राधान्य दिले जाणे गरजेचे होते. आत्मविश्वासपूर्ण आणि संकोची सहभागींचे संमिश्र समूह तयार करून ही बुजरेपणाची समस्या सोडविली गेली व सर्वांसोबत जवळीक निर्माण झाली. त्यानंतर उत्तरे देण्यासाठी आणि चर्चेतून प्रतिक्रिया देण्यासाठी मी संकोची शिक्षकांना निवडू लागलो. बैठकीच्या आधी WhatsApp ग्रुपवर मी शिक्षकांना विचारतो की त्यांना पुढील TAG बैठकीमध्ये काय करायचे आहे. याठिकाणी देखील मी संकोची शिक्षकांना त्यांची मते, विचार इतरांसमोर मांडण्यास आणि एखादे विशिष्ट कार्य कसे करता येईल याबद्दल सूचना देण्यास सांगायला सुरुवात केली. WhatsApp ग्रुप हे अतिशय उत्तम माध्यम आहे कारण याचे स्वरूप औपचारिक आहे आणि त्यामुळे हळूहळू




**'Board rush' उपक्रमामध्ये विद्यार्थी सहभागी होताना**

सख्य निर्माण होण्यात मदत होते.

शिक्षकांमध्ये इंग्रजी बोलण्याचा आणि त्यांचे विचार प्रकट करण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे हे तेजसमधील माझे प्रमुख काम आहे.

**शिकवण्याचा आनंद पुन्हा एकदा मिळाला**

माझे विद्यार्थी बंजारा समाजातील आहेत. जरी ते मराठी माध्यमाच्या शाळेत शिकत असले तरी ते घरी बंजारा आणि हिंदी बोलतात. त्यामुळे इंग्रजी ही त्यांची चौथी भाषा आहे. शिवाय आमच्या शाळेत फारशी स्रोतसाधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे आमच्यासमोरील आव्हानांमध्ये अधिकच भर पडते. परंतु मी एक आनंदी,



**आळीपाळीने प्रश्नांची उत्तरे देणे**

उत्साही आणि नवनवीन पद्धती राबविणारा इंग्रजी शिक्षक बनण्याचा प्रयत्न करतो, ज्याचे विद्यार्थी इंग्रजी शिक्षणाचा पुरेपूर आनंद घेतात.

TAG Resource Book मधील उपक्रम आणि कामे माझ्या संदर्भात सहज करण्याजोगी आहेत. लर्निंग बाय वॉचिंग सेक्शनमधील व्हिडीओजमधील एक उपक्रम मी नेहमी करतो. यामध्ये शिक्षक फ्लॅशकार्ड्स दाखवून नवीन शब्द मुलांना शिकवतात आणि 'What's this? This is an orange.' अशी सोपी इंग्रजी वाक्ये वापरून सराव करून घेतात. शब्द वापरण्याचा आत्मविश्वास मुलांमध्ये आला की शिक्षक त्यातून एक खेळ तयार करतात. एखादे कार्ड पटकन दाखवले जाते आणि मुलांना शब्द ओळखायचे असतात. यामध्ये हळूहळू नवनवीन शब्दांची ओळख होत असल्याने आणि नवीन शब्दांना चित्रांचीही जोड असल्याने माझ्या विद्यार्थ्यांसाठी याचा खूप चांगला फायदा होतो. मुलांना मदत म्हणून मी त्यांची मातृभाषा वापरतो. TAG मध्ये मी इतर ज्या गोष्टी शिकलो त्या देखील मी माझ्या विद्यार्थ्यांसाठी वापरतो. काही गोष्टी त्यांच्यासाठी अगदीच अनोळखी आहेत, जसे, विमानतळ. त्यांनी विमानतळ कधीच पाहिलेला नाही आणि ते काय असते तेही त्यांना माहिती नाही. परंतु चित्रे दाखवून आणि सुव्यवस्थित पद्धतीने नवीन शब्दांची ओळख करवून दिल्याने त्यांचे क्षितिज विस्तारत आहे.



**विद्यार्थी चायनीज व्हिस्पर हा उपक्रम करत आहेत.**

**हरीश पातोडकर** (TAG Coordinator)

**शाळा –** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जांभरून अंध तांडा, **क्लस्टर –** नरसी नामदेव, **ब्लॉक –** हिंगोली, **जिल्हा –** हिंगोली.

# शिक्षक शिकले तर विद्यार्थी शिकतील

**निशा सोनावणे** या गेली ९ वर्षे शिकवत आहेत. त्या तिसरी व चौथीच्या १८ विद्यार्थ्यांना एकाच वर्गात शिकवतात. त्या नंदुरबार जिल्ह्यात TAG Coordinator आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल निशा यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

निशा त्यांच्या वर्गामध्ये उपक्रम कशाप्रकारे घेतात ते पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८७ वर जा.




**शब्द शिकवताना फळ्याचा वापर**

## अनेक इयत्तांचा प्राथमिक वर्ग

माझे विद्यार्थी माझ्यासोबत गेली दोन-तीन वर्षे आहेत. जेव्हा ते पहिल्या इयत्तेत होते तेव्हापासून मी त्यांना शिकवते आहे. माझे एकूण १८ विद्यार्थी असून ते सर्व एकाच वर्गात बसतात. माझे विद्यार्थी आदिवासी समाजातील आहेत आणि ते अहिराणी, भिलोरी व इतर भाषा बोलतात. मराठी, हिंदी, इंग्रजी (या भाषा त्यांच्या अभ्यासक्रमात आहेत) या भाषा शिकताना त्यांना बऱ्याच अडचणी येतात. खरेतर या त्यांच्यासाठी द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ भाषा आहेत. आम्ही मराठीतील काही सोप्या शब्दांपासून सुरुवात केली. याठिकाणी लोक मराठी आणि हिंदी बोलतात त्यामुळे मुलांना या भाषा ऐकायला मिळतात. परंतु त्यांना इंग्रजी भाषे ऐकण्याची, बोलण्याची संधी मिळत नाही. तेजसमध्ये शिकवण्याची पद्धत विद्यार्थीकेंद्री असल्यामुळे आता त्यांना इंग्रजी बोलण्याची संधी मिळते.

## इंग्रजी शिकवावे कसे त्याचे शिक्षण

इंग्रजी हा माझा आवडीचा विषय असला आणि जास्त चांगल्या पद्धतीने कसे शिकवायचे

हे जाणून घेण्यात मला खूप रस होता तरी तेजसमध्ये सहभागी झाल्यानंतरच मला माझ्या शिकवण्याच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करण्याची संधी मिळाली. धड्यांचे नियोजन करणे, उपक्रम घेणे आणि विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन संवादातून शब्द व व्याकरण शिकवणे हे सर्व मी शिकले. तेजसमध्ये मला असे जाणवले की, मुलांना भाषा ऐकायला मिळणे गरजेचे असते आणि शिक्षक जर इंग्रजीतून बोलतील तरच ते शक्य आहे. मी सोपे इंग्रजी अगदी धीम्या गतीने बोलणे सुरु केले. माझे बोलणे ऐकून, म इझ्यासोबत बोलून आणि हावभावांमधून माझ्या विद्यार्थ्यांनी माझ्या सूचनांना प्रतिसाद देणे सुरु केले.

आता मला पक्के ठाऊक आहे की धडे प्रभावीपणे शिकवणे हे संपूर्णपणे शिक्षकाच्या नियोजन क्षमतांवर अवलंबून असते. जर मला कविता शिकवायची असेल तर मला हावभाव वापरून कविता बोलून दाखवणे शिकले पाहिजे. आधी मी हे संपूर्ण वर्गाचा उपक्रम म्हणून करत असे. पण आता आम्ही हे जोड्याजोड्यांनी, समूहांमध्ये करतो. कधीकधी कोणी एकजण सादरीकरण करतो तर कधी संपूर्ण वर्ग एकावेळेस कविता सादर करतो. अशाप्रकारे संवाद आणि



मुले एकत्र मिळून एक मॉडेल बनवत आहेत.

सहभागाच्या पद्धतीमध्ये वैविध्य असते. यामुळे मला माझे धडे प्रभावीपणे घेण्यास आणि शिकवण्यामधून अपेक्षित परिणाम साध्य करण्यात मदत मिळते.

### TAG बैठकांमध्ये

शिक्षकांची इंग्रजी भाषा कौशल्ये व शिकवण्यातील कौशल्ये विकसित करण्याची तेजस ही एक संधी आहे. जर शिक्षक शिकले तर विद्यार्थी शिकतील. त्यामुळे TAG शिक्षकांना आपल्या सहकाऱ्यांसोबत तसेच त्यांच्या विद्यार्थ्यांसोबत इंग्रजी बोलण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. आम्ही अनेक उपक्रम करतो आणि इतर शिक्षकांनी देखील ते उपक्रम आपापल्या वर्गांमध्ये राबवावेत यासाठी प्रोत्साहन देतो. जेव्हा मी एखादा उपक्रम करते तेव्हा मी व्हिडीओज बनवते आणि ते #Tejas4Ed या फेसबुक ग्रुपवर अपलोड करते. अनेक शिक्षकांना कल्पना अशाप्रकारे अंमलात आणणे आवडते. उपक्रमांमुळे शिक्षण हा एक आनंददायी अनुभव ठरतो.




प्रभावी साईनपोस्टींग

**निशो सोनवने** (शिक्षिका)

**शाळा –** सावित्रीबाई फुले नगर पालिका शाळा क्रमांक ४

**क्लस्टर –** नगर पालिका क्लस्टर

**ब्लॉक –** नंदुरबार, **जिल्हा –** नंदुरबार

# सीपीडीसाठी ब्लॉगिंग

**सुयोग दीक्षित** हे गेली १३ वर्षे शिकवत आहेत. ते इगतपुरीमध्ये चौथीच्या वर्गाला शिकवतात आणि नाशिक जिल्ह्याचे TAG Coordinatorआहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल सुयोग दीक्षित यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

ट्विटर चॅटरमध्ये कसे सहभागी व्हायचे याबद्दल सुयोग यांचा व्हिडीओ पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८९ वर जा.




**ट्विटर कसे वापरायचे त्याचे सादरीकरण करताना सुयोग**

**प्रभावी शिक्षणासाठी स्वत:ला परिवर्तनासाठी अनुकूल बनवणे**

TAG Coordinators च्या प्रशिक्षणामध्ये आम्हाला विविध उपक्रमांची माहिती दिली गेली, असे उपक्रम जे आम्ही इंग्रजीच्या तासाला धडे घेताना आमच्या विद्यर्थ्यांसोबत करून शकतो. सुरुवातीला माझे धडे घेताना मी तेजस प्रशिक्षकांची नक्कल करायचो. पण माझ्या लक्षात येऊ लागले की माझ्या विद्यार्थ्यांना उपक्रम समजत नाहीत. तसे का होत आहे ते मात्र मला समजत नव्हते. धड्यांचे नियोजन करण्यासाठी तेजसमध्ये आम्ही जे काम केले त्यामुळे मला ही अडचण सोडवण्यात मदत मिळाली. मी माझ्या वर्गाच्या दृष्टिकोनातून उपक्रमांची रचना करण्यास सुरुवात केली. यामुळे माझे धडे प्रभावी होऊ लागले. एक शिक्षक आणि TAG Coordinator या नात्याने मी माझे विद्यार्थी, शिकवण्यातून अपेक्षित असलेले परिणाम यांना अनुसरून उपक्रमांचे नियोजन करतो. आता माझे वर्ग उपक्रम विद्यार्थ्यांना खूप आवडतात आणि ते अर्थपूर्ण ठरतात.

**माझा ब्लॉगिंग प्रवास**

तेजस TAG Coordinator प्रशिक्षणात

आम्हाला ब्लागिंगची ओळख करवून दिली गेली. इतर शिक्षक व SARPs चे ब्लॉग्स वाचून मला देखील ब्लॉग लिहिण्याची प्रेरणा मिळाली. मी दर शुक्रवारी एक ब्लॉग प्रसिद्ध करणे सुरु केले. विचार, कल्पना प्रकटीकरण, रचनात्मक यावर मी ३७ लेख लिहीले आहेत. शिक्षण अधिकार अधिनियमावर ६ लेख लिहीले आहेत. आज माझा ब्लॉग २७ पेक्षा जास्त देशांमध्ये वाचला जातो.

दर आठवड्याला ब्लॉग प्रसिद्ध करणे अनिवार्य असल्यामुळे लेखकावर ताण येतो त्यामुळे मी पुढील अनेक आठवड्यांचे लेख लिहून तयार ठेवण्याचे ठरविले जेणेकरून मी ठरलेल्या वेळी ते प्रसिद्ध करू शकेन. परंतु जेव्हा मी सर्व लेख एकत्र वाचले तेव्हा माझ्या लक्षात आले की माझ्या लिखाणात एकसुरीपणा आला आहे आणि माझ्या विषयांमध्ये वैविध्य नव्हते. आता मी माझे लिखाण थांबवून माझी कौशल्ये विकसित करण्यावर भर देत आहे. लवकरच माझे लिखाण मी सुरु करेन.

**कथाकथनाचा प्रवास**

तेजस TAG Resource Book मधून मी विविध भाषांचा तसेच वेगवेगळ्या आवाजाचा वापर ही कथाकथनाची तंत्रे शिकलो.

इयत्ता चौथीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील ससा आणि कासवाची आपणां सर्वांना माहिती असलेली गोष्ट मी ही तंत्रे वापरून सांगितली. गोष्ट सांगण्यासाठी मी काठीवर चिकटवलेल्या चित्रांचा वापर केला आणि ती गोष्ट अनेक वेळा इंग्रजी व मराठीमध्ये सांगितली. नंतर मी माझ्या



**विद्यार्थी आनंदाने शिकताना**

विद्यार्थ्यांना ती गोष्ट त्यांच्या स्वत:च्या शब्दात सांगण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्यापैकी काहीजण पुढे येऊन संपूर्ण गोष्ट बरेच जास्त इंग्रजी शब्द वापरून सांगू शकले.

जेव्हा मी माझ्या TAGs मध्ये हा अनुभव सर्वांसमोर मांडला तेव्हा एका शिक्षकाने अजून एक पाऊल पुढे जात ती गोष्ट अधिक विस्ताराने सांगण्यासाठी आणि अधिक जास्त संवादी बनवण्यासाठी विद्यार्थ्यांकडून मदत घेतली. नंतर एक TAG Coordinator आणि मी मिळून २०१८ सालच्या तेजस परिसंवादामध्ये कथाकथनांची तंत्रे सादर केली, जी आम्ही आमच्या वर्गात आणि TAGs मध्ये राबविलेली होती. सर्वात शेवटी स्टोरीटेलिंग या माझ्या ब्लॉगमध्ये मी त्या अनुभवाबद्दल लिहीले.

माझ्या पर्सनल लर्निंग नेटवर्कने माझी मदत कशी केली. माझ्या सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे भीती, दडपण. माझ्या सहकारी TAG Coordinator नी WhatsApp ग्रुपवर शेअर केलेल्या कल्पना, विचार आणि अनुभव तसेच सहकारी, डअठझी यांच्याकडून मिळालेले समर्थन यामुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. WhatsApp, फेसबुक, ट्विटरवर मी सक्रिय असल्यामुळे मला अनेक गोष्टी वाचता आल्या, शिकता आल्या, विचार प्रकट करता आले, कल्पना अंमलात आणता आल्या आणि एक पर्सनल लर्निंग नेटवर्क निर्माण करता आले. मला माझ्या सहकाऱ्यांकडून जे प्रोत्साहन मिळाले त्यामुळेच मी ब्लॉगिंगबद्दल विचार करू शकलो. सहकाऱ्यांसोबत सख्य निर्माण करणे आणि आपले एक नेटवर्क असण्यामुळे आपल्याला समस्या सोडवता येतात आणि शिकता येते.

**सुयोग दीक्षित** (TAG Coordinator)

**शाळा** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकूरवाडी (तळोशी)

**क्लस्टर** – इगतपुरी २, देवळा, कूर्नोली

**ब्लॉक** – इगतपुरी, **जिल्हा** – नाशिक

सुयोग दीक्षित यांचा ब्लॉग वाचण्यासाठी कृपया या लिंकवर जा –https://dixitsuyog.wordpress.com/


# आपणही अजून विद्यार्थी आहोत ही जाणीव

**प्रशांत शिंदे** हे गेली २० वर्षे शिकवत आहेत आणि आता TAG Coordinator म्हणून काम पाहत आहेत. ते नाशिक जिल्ह्यातील एक प्राथमिक शाळेत पाचवीच्या वर्गाला शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल प्रशांत यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

प्रशांत त्यांच्या वर्गात उपक्रम कसा घेतात ते पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८८ वर जा.

‘नॉट्स अँड क्रॉसेस’ हा उपक्रम करताना प्रशांत




**संभाषणाला प्रोत्साहन**

तेजसमध्ये सहभागी होण्याच्या आधी मी इंग्रजी हा एक विषय म्हणून शिकवत होतो, भाषा म्हणून नाही. माझ्या विद्यार्थ्यांनी भाषा बोलली पाहिजे यावर मी कधी भर दिला नाही. माझे शिकवणे पारंपरिक पद्धतीचे असायचे, त्यामध्ये मी म्हणजे शिक्षक जास्त बोलत असे. तेजस प्रकल्पात सहभागी झाल्यावर मला समजले की विद्यार्थ्यांना बोलायला प्रोत्साहित करणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी मी चेन ड्रिल ॲक्टिव्हिटीचा उपयोग केला, जेणेकरून माझ्या विद्यार्थ्यांना भाषेचा सराव करता येईल. उदाहरणार्थ, ‘Do you like..........?’ यावर विद्यार्थी उत्तर देतात, ‘I lik se/I don’t like’. आधी मी संवाद खूप मर्यादित स्वरूपात आणि मर्यादित पद्धतीने करत असे – शिक्षक ते विद्यार्थी किंवा विद्यार्थी ते शिक्षक इतपत संवाद असे. पण आता मी जोड्या किंवा समूह कार्याचा वापर नियमितपणे करतो, यामुळे माझ्या विद्यार्थ्यांना मिळून मिसळून काम करण्याची प्रेरणा मिळते. यावर्षी मी पाचवीच्या वर्गाला शिकवत आहे, पाच मुली व चार मुलगे असे

एकूण ९ विद्यार्थी आहेत. मी त्यांच्यासोबत विविध संवाद पद्धती वापरू शकतो.

### उत्साही विद्यार्थी व शिक्षक

तेजसमध्ये शिक्षकांना पुस्तके व ऑनलाईन सामग्री आपापल्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, गरजा यानुसार वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. पेनी उर आणि अँड्रयू राईट यांच्या Five Minute Activities : A resource book of short activities या पुस्तकातील 'NOUDS and Adjectives' हा उपक्रम मी यशस्वीपणे माझ्या वर्गात आणि TAGs मध्ये राबविला. फळ्यावर एका बाजूला फळे व भाज्यांची नावे लिहीली आणि रंगाची नावे दुसऱ्या बाजूला लिहीली. या दोन्ही बाजूंच्या जोड्या जुळवण्यासाठी मुलांचे समूह तयार केले होते. समूहांनी एकत्रितपणे ते काम केले. त्यानंतर एका विद्यार्थ्याने प्राणी व त्यांची घरे यांच्या जोड्या जुळवण्याची नवीन कल्पना सुचविली. उदाहरणार्थ – tiger - Jungle, cow - cow shed. मुलांचा हा उत्साह आणि सहभाग तेजसमुळे घडून आला. या प्रकल्पात सहभागी होणे खरोखरीच प्रेरणादायी आहे.

पुढील TAG बैठकीमध्ये मी माझा अनुभव सादर केला. शिक्षकांनी माझ्या उपक्रमांचे कौतुक तर केलेच शिवाय अजून एक कल्पना सुचविली. मुलांच्या नावासोबत त्यांचे वर्णन करणारा एखादा गुण लिहिणे, जसे, clever, active or prompt. त्यांनी हे त्यांच्या वर्गात केले. दीपक या एका प्राथमिक शिक्षकांनी एक पाऊल पुढे जाऊन आपल्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावासोबत



**विद्यार्थी शिकण्याचा आनंद घेताना**

एक गुण जोडला आणि आता जेव्हा ते वर्गात हजेरी घेतात तेव्हा मुले उत्तरादाखल स्वत:च्या नावासोबत नावाच्या पहिल्या अक्षरावरून सुरु होणारा एक गुणदर्शक शब्द देखील बोलतात. उदाहरणार्थ, Active Anil.

### अनोखा मंच

तेजसमुळे शिक्षकांचा आत्मविश्वास जागृत झाला. त्याचबरोबरीने मुले देखील धीट व हुशार बनली. त्यांच्यातही आत्मविश्वास आला. आता ते अतिशय उत्साहाने स्थानिक स्पर्धांमध्ये भाग घेतात आणि जिंकतात देखील! एखाद्या पर्यटन स्थळावर परदेशी नागरिक असतील किवा जेव्हा कोणी इंग्रजी बोलणारी व्यक्ती शाळेला भेट देते तेव्हा त्यांच्यासोबत ते कोणत्याही दडपणाशिवाय इंग्रजी बोलू शकतात.

TAG Coordinator म्हणून मी माझ्या समूहातील शिक्षकांना त्यांची इंग्रजी भाषा शिकवण्याची कौशल्ये विकसित करण्यात मदत केली. आता आम्ही इंग्रजीकडे एक भाषा म्हणून पाहतो, शाळेत शिकण्याचा विषय म्हणून नाही. TAGs तसेच वर्गावर इंग्रजी बोलण्याचा कालावधी आम्ही वाढविला आहे. आम्ही वर्गात काय करतो ते एकमेकांसोबत शेअर करण्याची संधी आम्हाला TAGs नी दिली. WhatsApp ग्रुप्स खूपच उपयुक्त आहेत, त्याठिकाणी आम्ही आमचे व्हिडीओज शेअर करू शकतो आणि त्यावर चर्चा करू शकतो.

आमच्या स्वत:च्या क्षमता समजून घेऊन त्या वापरण्यासाठी अनोखा मंच तेजसने उपलब्ध करून दिला. आमच्या कोषातून बाहेर येण्याची संधी आम्हाला मिळाली तसेच नवीन शिक्षण तंत्रे शिकता आली. तेजसने आम्हाला जाणीव करून दिली की आम्ही देखील विद्यार्थी आहोत.

**प्रशांत शिंदे** (TAG Coordinator)

**शाळा –** जिल्हा परिषद शाळा, अडवत

**क्लस्टर –** जळगाव, ब्लॉक – येवला

**जिल्हा –** नाशिक

# नवी आणि खास ओळख विकसित करणे

**जया इगे** या गेली १५ वर्षे शिकवत आहेत. त्या TAG Coordinator आहेत. व बीड जिल्ह्यात चौथीच्या वर्गाला शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल जया यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

जया त्यांच्या वर्गामध्ये ॲक्टिव्हिटी घेताना व्हिडीओ पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८६ वर जा.

या ॲक्टिव्हिटीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी कृपया पान क्रमांक ९१ वर जा.




**'जम्प लेफ्ट जम्प राईट' उपक्रम करून घेताना**

माझे शिकवणे परावर्तीत करताना वर्गात आणि वर्गाच्या बाहेर इंग्रजीमध्ये प्रभावीपणे संवाद, संभाषणाच्या माझ्या क्षमतेमध्ये अधिक आत्म विश्वास यावा असे मला वाटत होते म्हणून मी तेजसमध्ये सहभागी झाले. माझे शिकवणे अधिक प्रभावी असावे, त्यामधून मला अधिक जास्त व्यक्त होता यावे असे वाटत असे. वर्गात इंग्रजी शिकवताना मला ज्या अडचणी यायच्या त्या इतर शिक्षकांच्या बाबतीत देखील येत असतील तर त्यांना मदत करावी असे मला वाटत होते. तेजसने मला या सर्व बाबतीत मदत केली. आता मी माझ्या सीपीडीसाठी सोशल मीडिया वापरते आणि ऑनलाईन कोर्सेस देखील करते. ब्रिटिश कौन्सिलची वेबसाईट यासारखे ऑनलाईन माहिती स्रोत मी वापरते. तेजसमध्ये मी जी तंत्रे शिकले त्याचाही मी वापर करते.

**प्रेरणा ही गुरुकिल्ली!**

जेव्हा TAG बैठका सुरु झाल्या तेव्हा माझ्या

ग्रुपमधील शिक्षकांमध्ये पुरेसा आत्मविश्वास नव्हता. बैठकांमध्ये इंग्रजी बोलताना त्यांना दडपण येत असे. यशस्वी शिक्षकांना चॉकलेट्स देणे, त्यांची नावे सोशल मीडियावर टेक्स्ट मेसेजेसमध्ये लिहिणे असे प्रोत्साहनपर उपक्रम करून मी त्यांचा उत्साह वाढवला.

मी त्यांच्या उपक्रमांचे व्हिडीओज बनवले आणि त्यांची परवानगी घेऊन ते शेअर केले.

पण काही शिक्षक Review सेक्शनमध्ये सहभागी होत नसत. या सेक्शनमध्ये शिक्षक जे काही शिकले आहेत ते अअत्मसाद करतात आणि वर्गात ते त्याचा वापर कसा करणार ते इतरांना सांगतात. त्यामुळे मी सर्वात चांगला Review आणि सर्वात चांगल्या कृती योजनेचा 'Star of the Month' म्हणून गौरव करण्याचे ठरवले. सर्वात चांगली कृती योजना आखणाऱ्या ढअऋ शिक्षकाला 'Star of the Month' हा गौरव दिला जात असे. या कृती योजना शिक्षक सोशल मीडियावर आणि TAG बैठकांमध्ये शेअर करतात. मी त्यांना ४ किंवा ५ स्टार्सचे रेटिंग देखील देत असे. त्यानंतर मी त्यांचे फोटो काढून स्टार्ससोबत ट्विटरवर शेअर करत असे. असे असूनही काही शिक्षक रिफ्लेक्शन्स गंभीरपणे लिहीत नसत. त्यामुळे मी रिफ्लेक्शन्सवर छोटे कागद चिटकवायला सुरुवात केली आणि त्यांना स्टार्स, स्मायलीज काढून सुशोभित करत असे, तसेच त्यावर सेव excellent असे कौतुकास्पद शेरे देखील देत असे. याला शिक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला, जेव्हा त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले गेले तेव्हा ते प्रोत्साहित झाले. या प्रोत्साहनामुळे शिक्षकांचा सहभाग वाढवण्यात मदत मिळाली.



वस्तूंच्या मदतीने गोष्ट सांगताना विद्यार्थिनी

**माझा आत्मविश्वास वाढला**

दोन-तीन वर्षापूर्वी मी एकही इंग्रजी वाक्य नीट बोलू शकत नव्हते. पण आता मी TAG बैठकांमध्ये अतिशय आत्मविश्वासाने इंग्रजी बोलते. तेजसने मला एक खास ओळख मिळवून दिली आहे आणि माझा आत्म विश्वास वाढविला आहे. तेजसमधील उपक्रम विद्यार्थीकेंद्री असतात, त्या मी माझ्या वर्गात नियमितपणे वापरते. आता मी माझ्या वर्गातील उपक्रम युट्युब, फेसबुक, ट्विटर आणि WhatsApp ग्रुप्सवर शेअर करते.




वर्गात सूचना देताना जया

**जया इगे** (TAG Coordinator)

**शाळा** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मळनाथपूर, **क्लस्टर** – मोहा, **ब्लॉक** – परळी **जिल्हा** – बीड

# वर्गात आणि TAG बैठकांमध्ये आयसीटीचा वापर

**समीर देवडे** हे गेली २२ वर्षे शिकवत आहेत आणि आता TAG Coordinator म्हणून काम करत आहेत. ते नाशिक जिल्ह्यात एकूण ७४ विद्यार्थ्यांच्या चौथीच्या वर्गाला शिकवत आहेत.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल समीर यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

तेजस यांचे विद्यार्थी व त्यांचे अनुभव याबद्दल जाणून घेण्यासाठी कृपया पान क्रमांक ८३ वर जा.

समीर त्याच्या वर्गामध्ये उपक्रम कसा घेतात ते पाहण्यासाठी पान क्रमांक ८७ वर जा.

**मुले शब्द शिकत आहेत.**




**तंत्रज्ञान कौशल्यांचा विकास**

तेजसमध्ये सहभागी झाल्यावर मला आयसीटी अर्थात माहिती संगणक तंत्रज्ञान स्रोतांचे महत्त्व जाणवले आणि मी एक लॅपटॉप घेतला, जो मी शाळेत उपलब्ध असलेल्या प्रोजेक्टरसोबत वापरू शकत होतो. आयसीटी अधिक प्रभावीपणे वापरण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे एखाद्या गोष्टीचा व्हिडीओ इंग्रजीमध्ये दाखवल्यानंतर मी तो सोप्या भाषेत समजावून सांगत असे. नंतर मी माझ्या चौथीच्या वर्गातील ७४ विद्यार्थ्यांना आपापसात गट तयार करून इंग्रजीत त्यांच्या स्वत:च्या शब्दात ती गोष्ट सादर करण्यात सांगत असे. त्यातील सर्वात चांगले सादरीकरण दुसऱ्या दिवशी शाळेच्या असेम्ब्लीमध्ये पुन्हा करून दाखवले जात असे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या भूमिका

करून सादरीकरण करणे या उपक्रमाची माहिती मला तेजसमध्ये मिळाली. माझ्या मुलांना हे खूप आवडले. उपयुक्त साहित्य ऑनलाईन कसे शोधायचे ते मी शिकलो. इतर शिक्षकांनी युट्युबवर अपलोड केलेल्या कथा आणि कविता मी माझ्या वर्गात वापरतो.

यामुळे मला इतकी प्रेरणा मिळाली आहे की, मी आयसीटी मध्ये मास्टर्स डिग्रीसाठी प्रवेश घेतला आहे. माझ्या TAGs मधील शिक्षकांना देखील त्यांच्या वर्गामध्ये आणि TAGs मध्ये आयसीटीचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन मिळत आहे. आता मी TAG बैठकीत पोहचण्याचा आधीच सर्व उपकरणे सज्जठेवलेली असतात.

**इतर विषयांमध्ये देखील वापर**

मोठ्या वर्गात विद्यार्थ्यांचे गट तयार करणे हे जिकिरीचे काम असते. तेजसमध्ये मी ज्या ग्रुपिंग टेक्निक्स शिकलो त्यामी माझ्या गणिताच्या वर्गात देखील वापरल्या. मी १,५,१०आणि २० रूपयांच्या छापील नोटा वर्गात वाटल्या आणि मुलांकडे ज्या नोटा आहेत त्यानुसार गट करण्यास सांगितले. नंतर संपूर्ण समूहाकडे किती पैसे जमा आहेत ते मोजण्यास सांगितले.



**एक विद्यार्थिनी अतिशय लक्षपूर्वक ऐकत आहे.**

उपक्रमांसाठी त्यांना वर्गाबाहेर जाण्याचाही मी प्रयत्न करत असतो पण संध्याकाळी चारच्या नंतर बाहेर फारसा उजेड नसतो.

**अधिक कुशल आणि निपुण शिक्षक**

TAGs मध्ये शिक्षक त्यांच्या वर्गातील समस्या मांडतात आणि इतर शिक्षक तसेच त्यांच्या TAG कडून त्यावर उपाययोजना मिळवतात.याठिकाणी त्यांना इंग्रजी बोलण्याची आणि आयसीटी कौशल्ये शिकण्याची संधी मिळते. त्यांच्या वर्गातील शिकवण्यामध्ये याची मदत होते तसेच ते वाचण्याच्या आणि शब्दसंग्रह वाढविण्याच्या विविध पद्धती शिकतात.TAGs मध्ये आम्ही इंग्रजी शिकण्यात जास्तीत जास्त नैपुण्य मिळण्याचा प्रयत्न करतो.

तेजसमुळे आम्ही ज्या शाळांमध्ये काम करतो त्यांची ख्याती वाढली आहे. आमच्या सरकारी शाळांमध्ये मुलांना

पाठविण्यासाठी पालक उत्सुक आहेत. हा तेजसचा आणखी एक अप्रत्यक्ष पण महत्वाचा फायदा होत आहे.




**शब्द शिकण्यामध्ये विद्यार्थांची मदत करताना**

**समीर देवडे** (TAG)

**शाळा :** जिजामाता प्राथमिक शाळा, लासलगाव

**क्लस्टर :** निफाड

**ब्लॉक :** नाशिक

**जिल्हा :** नाशिक



डावीकडील फोटोमध्ये – शब्द शिकवण्यासाठी चित्रांचा वापर

# शिक्षक

जवळपास १८,००० सरकारी प्राथमिक शिक्षक त्यांच्या स्वतःच्या क्लस्टर्समधील दर महिन्याला होणाऱ्या TAGs बैठकांमध्ये नियमितपणे सहभागी होत असतात. हे सर्व शिक्षक आपापल्या TAG च्या WhatsApp ग्रुप्सचे देखील सदस्य आहेत. बैठका आणि WhatsApp ग्रुप्सवर होणारी विचार, कल्पना, उपक्रमांची देवाणघेवाण यामुळे त्यांना त्यांच्या वर्गात भेडसावणाऱ्या समस्या मांडण्यांची, इतरांकडून उपाययोजनाबद्दल सूचना, सल्ला मिळण्याची संधी मिळते. याठिकाणी जी शैक्षणिक माहिती सादर केली जाते त्यातून शिक्षकांना बऱ्याच महत्वाच्या गोष्टी शिकता येतात. शिक्षकांची इंग्रजीवरील पकड घट्ट व्हावी, त्यांचे वर्गातील शिकवणे अधिक प्रभावी व्हावे आणि स्वतःच्या व्यावसायिक विकासासाठी उपलब्ध असलेलय पर्यायांची त्यांना माहिती मिळावी यावर विशेष भर दिला जातो.

तेजसमुळे शिक्षकांना त्यांची व्यवसायिक कौशल्ये विकसित करण्यात आणि विद्यार्थांचे इंग्रजी सुधारवण्यात कशी मदत मिळाली ते पुढील भागात आपल्याला वाचता येईल.



# यशस्वी होण्यासाठी कृती नियोजन

**वर्षा लोणारे** या गेली १२ वर्षे शिकवत आहेत. सध्या त्या यवतमाळ जिल्हयात पहिली, दुसरी आणि पाचवीच्या

तेजस आणि त्यांच्या प्रभावाबद्दल वर्षा यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.




**फळांची नावे शिकवण्यासाठी फ्लॅशकार्ड्चा वापर**

### घड्याचे अधिक चांगले नियोजन

TAGs मधून मला शिकायला मिळालेले सर्वात उपयुक्त कौशल्य म्हणजे कृती नियोजन. या सेक्शनमुळे मला वर्गात शिकवण्याआधी धड्यांचे नीट नियोजन कसे करायचे ते समजले. आम्हाला या धडा नियोजन टेम्प्लेटची ओळख करून देण्यात आली त्यातून मला वर्गात शिक्षक आणि विद्यार्थांची नेमकी भूमिका काय असावी ते समजून घेण्यात मदत मिळाली या टेम्प्लेटमध्ये वर्गाची संपूर्ण माहिती, वर्गाचा आकार, धड्याची उद्दीष्ट्ये, धड्यासाठी मुलांना जे शब्द आणि वाक्प्रचार माहिती असणे गरजेचे आहेत ते आवश्यक असलेली सामग्री, टप्पे व प्रक्रिया, संवाद पद्धती आणि शिकवताना येऊ शकतील अशा संभाव्य अडचणी याची माहिती विचारली जाते. या टेम्प्लेटनुसार जर धड्याचे नियोजन केलेले असेल तर वर्गात शिकवणे सहजसोपे आणि प्रभावी बनते.

### आधीच्या धड्याची उजळणी

नियोजन करत असताना मी माझ्या मुलांना आधीपासून काय काय माहिती आहे ते देखील विचारात घेते.

यामुळे मला अधिक चांगल्या पद्धतीने नियोजन करता येते आणि प्रभावी होतात. उदाहरणार्थ, या आधी मुलांनी कृती दर्शवणारे शब्द शिकवले असतात. पण आता मला त्याची उजळणी करणे गरजेचे असते. त्यासाठी मी एका विद्यार्थ्याला कृती दर्शवणारा शब्द लिहिलेली चिट्टी देते. त्याने हावभाव करून दाखवायचे आणि बाकीच्या मुलांनी तो शब्द ओळखायचा असतो. यानंतर तो शब्द फळयावर लिहून उच्चाराचा सराव केला जातो. `Shut the Door' 'open the



विद्यार्थी वर्गामध्ये उपक्रमात सहभागी होताना

window' `switch off/on the fan.यासारख्या सोप्या, साध्या, दैनंदिन सूचना इंग्रजीमध्ये दिल्याने शिक्षण आणि रोजच्या जगण्याचा संदर्भ जोडला जातो. माझे विदयार्थी आता रोज वापरले जाणारे शब्द नियमितपणे वापरू शकतात. शाळेमध्ये त्यांनी आपापसात इंग्रजी बोलण्यास सुरवात केली आहे. क्लास्टरमधील काही पालक सांगतात की, त्यांची मुले घरी देखील इंग्रजीत बोलतात.

**दोन भाषांमध्ये गोष्ट सांगणे.**

कथाकथन विद्यार्थ्यांना सगळ्यात जास्त आवडते. पाठ्यपुस्तकातील गोष्ट निवडून मी आधी ती मराठीमध्ये सांगते. नंतर हावभाव आणि संवाद वापरून तीच गोष्ट इंग्रजीत सांगते. नंतर हावभांवासहित गोष्ट सांगितली जाते. सर्वात शेवटी म्हणजे दुसऱ्या दिवशी शाळेच्या परिपाठात विद्यार्थी ती गोष्ट सादर करतात. यामध्ये वेगवेगळया भुमिका करतात. त्याव्यतिरिक्त TAG बैठकीत माहिती झालेली विविध तंत्रे मी वापरते. माझे शिकवणे जास्त संवादात्मक असते कारण मी मुलांच्या जोड्या किंवा गट तयार करून त्याचप्रमाणे मी शिक्षण सामग्री आणि उपक्रमांचा शिकवण्यामध्ये वापर करते.

**TAG बैठकांमुळे देवाण घेवाण सुलभतेने करता येते**

TAGs बैठका अतिशय उपयुक्त ठरतात. कारण TAGs उपक्रमांचा वापर मी माझ्या वर्गात करू शकते. तसेच माझ्या कल्पना इतर शिक्षकांसमोर मांडू शकते. माझ्या वर्गात करण्यासाठी मी आता इतर उपक्रम देखील तयार करू शकते. आणि वापरू शकते. शिकवण्याच्या विविध मुद्दयावर सहकाऱ्यांसोबत चर्चा केल्याने मला माझ्या विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये अधिक जास्त सहभागी करून घेण्यात मदत मिळाली आहे. WhatsApp गृपवर इतर शिक्षक हे विडोओज शेअर करतात ते देखील नवनवीन गोष्टी शिकण्याच्या दृष्टीने उपयुक्त असतात. TAG बैठकामुळे आम्हाला एकत्र काम करण्यात व आपापसात विजारांची देवाणघेवाण करण्यात मदत मिळाली आहे.




शब्द शिकवताना फ्लॅशकार्डसचा वापर

**वर्षा लोणारे** (शिक्षिका )

**शाळा :** जिल्हा परिघद मराठी प्राथमिक शाळा, मर्कडा

**क्लस्टर :** मोटिव्हेट, **ब्लॉक :** कळंब

**जिल्हा :** यवतमाळ

# माझ्या वर्गात इंग्रजी वापरण्यासाठी नियोजन, तयारी आणि सातत्य

**रूपाली आठरे** या गेली ७ वर्षे शिकवत आहेत. त्या नाशिक जिल्हातील एका मराठी माध्यमाच्या शाळेत इयत्ता दुसरीच्या वर्गाला शिकवतात

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल रूपाली यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.




**विद्यार्थिनी शब्दांचा सराव करीत आहे.**

आधी माझा स्वभाव फार बुजरा होता. तेजसमध्ये सहभागी होण्याआधी इंग्रजी तर सोडूनच दया, मी चार लोकांसमोर मराठीत देखील फार बोलू शकत नव्हते. गेली दोन शैक्षणिक वर्ष TAG बैठकांमध्ये नियमितपणे सहभागी झाल्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला आहे. मी इंग्रजीमध्ये सूचना देण्याचा प्रयत्न करते पण ज्याना त्या नीट समजू शकणार नाहीत अशा मुलांसाठी हावाभावांचा वापर करते. त्याचप्रमाणे मराठीमध्ये देखील समजावून सांगते. अशाप्रकारे मी आणि माझ्या वर्गाने भाषा नैपुण्यामध्ये हळूहळू वाढ केली आहे.

**सराव अणि संवाद वाढविण्यासाठी पुनरूक्ती आणि दृढीकरण**

मी इयत्ता दुसरीच्या एकूण ३५ विद्यार्थ्यांच्या वर्गाला शिकवते. विषय पुन्हा पुन्हा समजावून सांगण्याची पद्धत मी नियमितपणे वापरते. मुले एक वर्तुळ तयार करतात. मी विद्यार्थ्यांना एक प्रश्न विचारते. उदाहणार्थ. What is your favourite colour ? एक विद्यार्थी उत्तर देतो आणि तोच प्रश्न पुढच्या विद्यार्थाला विचारतो. असे हे वर्तुळ पूर्ण होते. अशाप्रकारे आम्ही प्रश्न आणि उत्तरे या दोन्हीचा पुन्हापुन्हा सराव करता येतो.

**वर्गातील संवाद वाढला.**

TAGs मुळे माझ्या वर्गात संवाद वाढला आहे. आधी मी फक्त पाठ्यपुस्तकापुरती मर्यादीत असायचे. माझे लिखाण वाचन फक्त त्यातूनच व्हायचे. ऐकण्याच्या कौशल्यांचा तर त्यामध्ये समावेश नव्हताच. मी फळ्याचा वापर खूप करायचे. मुलांना जेव्हा काही उत्तर विचारले जाईतेव्हाच त्यांचा आवाज ऐकू जायचा. माझ्या वर्गात मी म्हणजेच शिक्षकच सर्वात जास्त बोलत असेमाझे बोलणे जास्त करून मराठीमध्ये चाले. आता मी इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषांमध्ये बोलते. संवादात्मक उपक्रमांचा वापर केला जात असल्याने माझ्या विद्यार्थ्यांना बोलण्याच्या संधी भरपूर मिळतात. परिणामी त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. इंग्रजी बोलण्याची जोखीम उचलायला आता माझे विद्यार्थी तयार असतात. माझा देखील आत्मविश्वास वाढला आहे. आधी माझ्याकडे कौशल्ये होती आणि आता माझ्याकडे ती कौसल्ये वापरण्याची संधी देखील आहे.

**रूपाली आठरे** (शिक्षिका)

शाळा-जिल्हा परिषद शाळा, लासलगाव स्टेशन

**क्लस्टर –** लालसगाव, **ब्लॉक –** निफाड
**जिल्हा –** नाशिक

# शिकण्यातला आनंद मिळू लागला आहे

**तस्नीम रौफ** या गेली नऊ वर्षे शिकव आहेत. सध्या त्या नंदुरबार जिल्ह्याम इयत्ता सातवीच्या वर्गात शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल तस्नीम यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.




**स्लॅप द बोर्ड उपक्रम करून घेताना**

तेजसमध्ये सहभागी होण्याच्या आधी मी पूर्णपणे इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकावर अवलंबून असायचे. मी माझ्या विद्यार्थ्यांकडून पुस्कात दिलेली कामेच करून घेत असे. आता देखील मी जे धडे शिकवते तेच आहेत पण मी ज्या पद्धतीने शिकवते ती मात्र बदललेली आहे. उदाहरणार्थ, जर मी रंगाची नावे शिकवत असेन तर फक्त पाठ्यपुस्तकातील कामे करून घेण्याबरोबरीनेच मी देखील खेळते. What colour do you like? Which colour do you like, red or blue?` किंवा Do you like mangoes ? या सारखे खेळ घेते. विद्यार्थी एका वर्तुळात उभे राहतात. एक विद्यार्थी दुसऱ्याकडे चेंडू फेकतो आणि एक प्रश्न विचारतो दुसरा विद्यार्थी चेंडू झेलतो आणि प्रश्नाचे उत्तर देतो. अशाप्रकारे प्रश्न विद्यार्थीच विचारतात आणि त्यांची उत्तरे देखील विद्यार्थीच देतात.

माझ्या विद्यार्थ्यांना वाचन आणि शब्द शिकताना खूप अडचणी येतात. मी त्यांना एक डिक्शनरी बनवण्यात मदत केली आहे. एका वहीत त्यांनी प्रत्येक अक्षरावरून सूरू होणारे पाच शब्द लिहून काढले आहेत आणि आता त्यांच्याकडे भरपूर शब्द जमा झाले आहेत. मी दोन गट बनवते. एका गटातील विद्यार्थी फळ्यावर शब्द लिहितो आणि दुसऱ्या गटातील विद्यार्थ्याला आधीच्या शब्दाच्या शेवटच्या अक्षरावरून सुरू होणार शब्द पुढे लिहायचा असतो. उदाहरणार्थ, yellow-water-rat. या खेळांमुळे शिकण्यातला आनंद मिळू लागला आहे. मी आता एक सर्जनशील शिक्षिका बनले आहे.

गेली दोन वर्षे Resource Book मधील अनेक उपक्रम करून घेतल्यानंतर आता माझा आत्मविश्वास वाढला आहे. मी वर्गात माझ्या विद्यार्थ्यांसोबत अभ्यासाचा आनंद घेऊ शकते. आधी लाजरे बुजरे असणारे माझे विद्यार्थी आता स्वतःहून पुढे येतात आणि उपक्रमांमध्ये सहभागी होतात हे मला मिळणारे सर्वोत्तम पारितोषिक आहे.

**तस्नीम रौफ** (शिक्षिका)

**शाळा –** डॉ. झाकीर हुसेन नगर पालिका शाळा क्रमांक १७

**क्लस्टर –** नंदुरबार

**ब्लॉक –** नंदुरबार, **जिल्हा –** नंदुरबार

# इंग्रजी संभाषण

**शर्मिला माने** या गेली १७ वर्षे शिकवत आहेत. त्या गडचिरोली जिल्ह्यात उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना इंग्रजी व गणित शिकवतात. त्या स्थनिक TAG मध्ये सहभागी होतात.

तेजस आणि त्यांच्या प्रभावाबद्दल शर्मिला यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.



वर्गाच्या बाहेर एक भाषा खेळ घेताना शर्मिला

**मोठ्या वर्गासाठी वैविध्यपूर्ण आणि रोचक उपक्रम**

यावर्षी मी सहावी, सातवी आणि आठवीच्या वर्गांना शिकवत आहे. माझ्या प्रत्येक वर्गात जवळपास ५० विद्यार्थी आहेत. मला कायम असेच वाटत होते की इतक्या मोठ्या वर्गामध्ये संभाषण उपक्रम घेणे शक्य नाही. पण TAG बैठकांमध्ये सहभागी व्हायला लागल्यापासून मला हे समजू लागले आहे की मी हे नक्कीच करू शकते. उदाहरणार्थ, संभाषण उपक्रम घेण्यासाठी मी वर्गाचे दोन गट करते. एक गट संभाषण उपक्रम करतो तर त्यावेळेस दुसरा गट वाचन वगैरे काहीतरी दुसरे करतो. उपक्रम पूर्ण झाल्यानंतर गट बदलतात. यामुळे मला मोठ्या वर्गांमध्ये देखील संभाषण उपक्रम सहजपणे राबविता येतात. पत्त्येक विद्यार्थी काय आणि कसे बोलतो ते मी ऐकू शकते. चांगले वाक्प्रचार सांगू शकते. चुका दुरूस्त करू शकते.

(TAG Resource Book) मधून अनेक उपक्रम शिकले. ओनियन रिंग, चेंज युअर प्लेस, रोल प्ले, स्लॅप द ब्लॅक बोर्ड, आणि डू आय लीव्ह अ टीप असे अनेक उपक्रम आमचे खूप



**विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग – जवळीक**

आवडीचे झाले आहेत. माझ्या विद्यार्थ्यांना खरंच या सगळ्यांमध्ये खूप मजा येते. ते मजेमजेत इंग्रजी बोलू शकत आहेत. या उपक्रमांमुळे माझी विद्यार्थ्यांसोबत जवळीक निर्माण झाली आहे. मी असे मानते की एक शिक्षिका या नात्याने मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी त्यांची मदत करणे हे माझे कर्तव्य आहे. तरच माझे विद्यार्थी भीती किंवा दडपणाशिवाय इंग्रजी बालू शकतील. मी TAGs मध्ये जे संभाषण उपकद्व शिकले त्यांची मला खूप मदत झाली. त्यांतून मुलांना वर्गात मोकळेपणाने बोलण्यास प्रोत्साहन मिळाले. मी हे देखील शिकले की हे उपक्रम करत असताना मुलांच्या काही चुका होत असतील तर त्यांना लगेच थांबविणे योग्य नाही, आज माझ्या विद्यार्थ्यांच्या संभाषण कौशल्यांचा होत असलेला विकास त्यांना भविष्यात खूप उपयोगी पडेल. त्यांचा आत्मविश्वास वाढेल. पुढे मोठ्या परिक्षा व मुलाखतीमध्ये त्यांना यशस्वी होण्यात याची मदत होईल.

**अधिक आत्मविश्वासपूर्ण शिक्षिका**

TAG बैठकांमधील सहभागामुळे मला असे संभाषण उपक्रम माझ्या वर्गात नियमितपणे करण्याचा आत्मविश्वास वाढला. TAGs मध्ये सहभागापूर्वी मी इंग्रजी बोलू शकत होते. पण माझा आत्मविश्वास कमी पडत होता. TAGs मध्ये मला माझ्या सहकाऱ्यांसोबत इंग्रजीमध्ये बोलण्याची संधी मिळाली आणि आता मला त्याचे अजिबात दडपण येत नाही. धडे शिकवताना देखील मी मराठीपेक्षा इंग्रजीचा वापर जास्त करते. मी माझ्या सहकाऱ्यांना देखील जास्थत जास्त इंग्रजी बोलण्यासाठी

प्रोत्साहन देते कारण तसे केल्यास ते विद्यार्थ्यांसोबत इंग्रजी बोलू शकतील. दररोजच्या सरावामुळे आता विद्यार्थ्यांना वर्गात इंग्रजी बोलण्याची सवय झाली आहे. शिक्षकांमध्ये जर आत्मविश्वास असेल तर ते आपल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासदेखील जागृत करू शकतात.



**शब्द शिकवताना फ्लॅशकार्ड्सचा वापर**

**शर्मिला माने –** जवाहरलाल नेहरू अपर प्रायमरी म्युनिसिपल कौन्सिल स्कूल

**क्लस्टर –** गडचिरोली

**ब्लॉक –** गडचिरोली

**जिल्हा –** गडचिरोली

# जर शिक्षक इंग्रजी बोलत नसेल तर विद्यार्थी देखील बोलणार नाहीत.

**अझहर मोहम्मद** हे देखील आठ वर्षे शिकवत आहेत. ते नंदुरबार जिल्हयातील उर्दू माध्यमाच्या शाळेत पहिली व दुसरी इयत्तांचे विद्यार्थी एकत्र असलेल्या वर्गाला शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल अझहर याचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.




**हायमिंग शब्द शिकवताना विद्यार्थी**

**माझे उपक्रम**

तेजसमध्ये सहभागी होण्याआधी आम्ही म्हणजे मी स्वतः आणि माझे विद्यार्थी इंग्रजी ज्याप्रमाणे बोलत होतो त्यावर थानिक भाषेच्या प्रभावाची मला चिंता वाटायची. मी ऐकण्या आणि बोलण्याचा जास्तीत जास्त सराव करण्यास सुरवात केली. उदाहरणार्थ, मी चायनीज व्हिस्पर आणि उच्चार ड्रिल वापरतो. विद्यार्थी एक वर्तुळ करून बसतात. शिक्षक एका विद्यार्थ्यांच्या कानात एक शब्द कुजबुजतात. उदाहरणार्थ, apple त्याने तो शब्द पुढच्या विद्यार्थ्याच्या कानात सांगायचा. हा शब्द शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेस्तोवर त्याचा उच्चार काहीतरी वेगळाच झालेला असतो. नंतर मी तो शब्द मोठ्याने बोलतो आणि विद्यार्थी एकट्याने किंवा गटाने तो शब्द बोलतात. चायनीज व्हिस्पर या उपक्रमात नेहमी वाक्ये वापरली जातात पण मी शब्द वापरतो कारण माझ्या विद्यार्थ्यांचा भाषेचा स्तर कमी आहे. या उपक्रमामुळे त्यांना मदत तर होते पण शिकायला देखील मिळते. रोल द डायस हा आणखी एक उपक्रम आम्ही करतो. एका डब्यात मी कागदाच्या चिठ्या ठेवतो.

त्यावर काही चित्रे काढलेली असतात. फळ्यावर मी वस्तूंचे वर्णन करणारे प्रश्न लिहितो.



**वाचताना कृती आधी शिक्षक सूचना देताना**

उदाहरणार्थ, नाव, आकार, रंग आणि उपयोग. प्रत्येक प्रश्नाला एक एक ते सहा यातील एक क्रमांक दिलेला असतो. एक विद्यार्थी चिठ्ठी उचलतो.

उदाहरणार्थ, apple दुसरा विद्यार्थी डायस फिरवतो आणि त्यावर जो आकडा येईल त्या क्रमाकांच्या प्रश्नाचे उत्तर देतो. उदाहरणार्थ, ३ आकडा आला असेल तर विद्यार्थ्यांचे उत्तर असेल – An apple is a red coloured fruit.

माझ्या विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढावा यासाठी मी एक स्वतंत्र १६ पानी वही वापरतो. यामध्ये २/३/४/५ अक्षरांचे शब्द असतात. त्यापैकी काही शब्द यमक जुळणारे असतात. उदाहरणार्थ, can, pan, fan, ran ज्यामुळे यमक जुळते तो उच्चार मी त्यांना शिकवतो आणि मग त्यांना ते शब्द शिकणे सोपे जाते. मग मी तीन गट बनवतो. एका गटाला मी अक्षरांचा ठोकळा देतो. दुसऱ्या गटाला लॅमिनेटेड चिठ्ठ्या देतो आणि तिसऱ्या गटाला अल्फाबेट रोलर देतो. या रोलरमध्ये तीन रांगामध्ये अक्षरे असतात. यामुळे मुले छोटे छोटे शब्द तयार करू शकतात. मुले यावर एकेक अक्षर फिरवून शब्द तयार करू शकतात. उदाहरणार्थ, C.A.T. नंतर मी त्यांना दोन अक्षरे देतो. जसे AT. मग मुले B.A.T. M.A. T., S.A.T.यासारखे शब्द बनवतात.

विद्यार्थ्यांना फोनेटिक्स शिकवत असताना आणि माझ्या TAG मध्ये उच्चार शिकवत असताना प्रत्येक वेळी मला माझे संभाषण सुधारण्याची संधी मिळते. आधी मला इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास नव्हता पण मी जेव्हा-जेव्हा संधी मिळल तेव्या जाणीवपूर्वक इंग्रजी बोलण्याचा प्रयत्न करतो. माझ्या TAG मध्ये मी जास्तीत जास्त वेळ इंग्रजी बोलते आणि एकादा शब्द अडला तर दुसरी भाषा वापरतो. मी नेहमी साधे सोपे इंग्रजी वापरतो जेणेकरून माझ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी सुचना समजतील. जर शिक्षक इंग्रजी बोलत नसेल तर विद्यार्थी देखील इंग्रजी बोलणार नाहीत!

**अझहर मोहम्मद** (शिक्षक)

**शाळा –** नगर परिषद स्कूल नंबर १४ (उर्दू माध्यम)

**क्लस्टर –** नगर पालिका नंदुरबार

**ब्लॉक –** नंदूरबार,

**जिल्हा –** नंदूरबार

# मी एक पाठच्या बाकावरचा शिक्षक होतो.

**पुंडलिक देशमुख** हे गेली १० वर्षे शिकवत आहेत. ते सध्या इयत्ता तिसरी व चौथीच्या वर्गांना शिकवतात आणि गडचिरोली जिल्ह्यातील TAG मध्ये सहभागी होतात.

**पुंडलिक** यांचे विद्यार्थी आणि त्यांच्या अनुभवाबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी कृपया पान क्रमांक ८४ वर जा.

या उपक्रमाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी कृपया पान क्रमांक ९१ वर जा.



**हावभावांसहित गाणे सादरीकरण्याच्या उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग.**

### तेजसमध्ये सहभागी होण्यासाठी

TAG बैठकांमध्ये सहभागी होण्यापूर्वी मी एक बॅक-बेन्च शिक्षक होतो. माझे शिकवणे कृतीशून्य होते. माझ्यात आत्मविश्वास नव्हता. याचे कारण म्हणजे मला अजिबात नीट इंग्रजी बोलता येत नव्हते. मी पारंपारिक पद्धतीने शिकवायचो. २०१६ साली मला तेजस आणि TAG बैठकांबद्दल समजले. त्यामध्ये सहभागी व्हायला लागल्यापासून मी हळूहळू शिकवण्यामध्ये विशेष रस घेऊ लागलो आणि आधीपेक्षा वेगळ्या तंत्राने इंग्रजी शिकवू लागलो.

### TAGs मध्ये मी काय शिकलो

माझी भाषा कौशल्य आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी TAGs खूपच उपयुक्त ठरत आहे. माझा स्वतःचा शब्दसंग्रह, व्याकरण आणि बोलण्यातील अस्खलितपणा सुधारला आहे. माझा आत्मविश्वास एवढा वाढला आहे की मी **TAG** च्या फॅसिलिटेशनची संधी देखील स्वीकारली आहे. आता मी नाविन्यपूर्ण आणि विद्यार्थी केंद्री पद्धतीचा वापर करतो. या पद्धती

मी TAG मधून शिकलो. यांचा वापर केल्याने माझ्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी बोलण्याच्या आणि ऐकण्याच्या क्षमतेमध्ये सुधारणा होत आहेत.

TAG बैठकांमध्ये सहभागी झाल्यामुळे मी शिकवण्याविषयीचे माझे विचार मांडू शकतो. त्यावरी चर्चाकरण्यामध्ये भाग धेऊ शकतो आणि माझ्या धड्याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करू शकतो.

**तेजसनंतर**

मी गडचिरोलीमध्ये एका मराठी माध्यमाच्या शाळेत इयत्ता तिसरी आणि चौथीच्या वर्गात शिकवतो. मी माझ्या विद्यार्थ्यांसाठी एक क्लब सुरू केला आहे. ज्यामध्ये आम्ही इंग्रजीमध्ये खेळ खेळतो. मी पालकांना नियमितपणे भेटतो. युट्युब चॅनेलवर माझ्या वर्गातील उपक्रमांचे व्हिडीओज अपलोड करून पालकांना त्यामध्ये सहभागी करून घेतो.

माझ्या विद्यार्थ्यांमध्ये अतिशय आवडती असलेली एक ॲक्टिव्हिटी म्हणजे स्लॅप द बोर्ड / वॉल. मी ही ॲक्टिव्हिटी TAG मध्ये शिकलो. अगदी सुरवाथीला मी विद्यार्थ्यांना चित्रे काढण्यात आणि तक्ते तयार करण्यात मदत केली. आता ही फळे व भाज्यांची चित्रे वगाच्या भिंतीवर लावलेली आहेत. मी



**उपक्रम सुरू करण्यापूर्वी सूचना देताना**




**स्लॅप द बोर्ड यामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी**

फळांची किंवा भाज्यांची नावे पुकारतो आणि मुले धावत त्या चित्रापाशी जातात व त्यावर हात ठेवतात. फळ्यावर शब्द लिहून त्तासोबत देखील हा उपक्रम करतो. हा उपक्रम खूपच सोपा आहे. पण यातून अतिशय मजेशीर पद्धतीने विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढत जातो.

माझ्या वर्गात सर्व विद्यार्थी, अगदी मागील बाकांवरील विद्यार्थी देखील अशा उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होतात व त्याचा पुरेपूर आनंद घेतात. आता माझे विद्यार्थी काही प्रमाणात स्वतःला व्यक्त करू शकतात. ते आपपल्या गतीने उपक्रम पूर्ण करतात. आता त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण जाला आहे आणि त्यांना इंग्रजीची भीती वाटत नाही. हेच मी माज्या स्वतःबद्दल देखील म्हणू शकतो याचा मला आनंद आहे!

**पुंडलिक देशमुख** (शिक्षक)

**शाळा –** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुवर्णनगर

**क्लस्टर –** वर्धा, ब्लॉक – आरमोरी

**जिल्हा –** गडचिरोली

# सहभाग आणि सहकाऱ्यांकडून सहकार्यासाठी संवाद पद्धती

**दीपाली देशमुख** या गेली १२ वर्षे शिकवत आहेत. सध्या त्या अमरावती जिल्हयात इयत्ता तिसरीला शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल दीपाली यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

या उपक्रमाविषयी अधिक माहिती मिळण्यासाठी कृपया पान क्रमांक ९१ वर जा.




विद्यार्थ्यांना नवीन शिक्षण शिकविताना

## संवादाला प्रोत्साहन

TAGs मध्ये मला शिकायला मिळालेली एक अतिशय महत्वाची बाब म्हणजे विद्यार्थ्यांना एकमेकांच्या सहकार्याने काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारच्या संवाद पद्धतीचा वापर. आता मी चर्चा, नाटिका, प्रश्न सोडविणे आणि प्रतिसाद अशा उपक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या जोड्या किंवा गट तयार करते. ही कामे मनोरंजक पद्धतीने व्हावीत यासाठी गटांना ऐतिहासिक व्यक्तींची नावे देते, जसे सावित्रीबाई फुले. ज्यामुलांना गोष्टी समजून घ्यायला थोडा जास्त वेळ लागतो त्यांच्यासाठी जोड्या आणि गटांमध्ये काम करणे उपयुक्त ठरते. जोड्या करताना मी हुशार आणि थोडे कमी हुशार, ज्यांना थोड्या मदतीची गरज असते अशा विद्यार्थांच्या जोड्या करते जेव्हा मित्र किंवा मैत्रीण एखादे काम समजावून सांगते तेव्हा ते विद्यार्थ्यांना सोपे वाटते. संपूर्ण वर्गाला एकाच पातळीवर आणणे माझ्यासाठी देखील सोपे बनते. हळूहळू बुजरे विद्यार्थी धीट बनले आहेत. वर्गासमार बोलण्यासाठी, नाटिका सादर करण्यासाठी ते स्वतःहून पुढे येतात.



उत्तर देण्याची आपली वेळ येण्यासाठी वाट पाहणारी विद्यार्थिनी

## संवादाची प्रसिद्ध पद्धत

ओनियन रिंग या उपक्रमाचे माझ्या वर्गाला अनुसरून तयार केलेले स्वरूप मी नियमितपणे वापरत असते. हे मी TAG मध्ये शिकले आणि मला हे खूप आवडते. यामध्ये विद्यार्थी एकात एक अशी दोन वर्तुळे तयार करतात आणि मीत्यांना सूचना देते. या सूचना इंग्रजीतून असतात. सूचना मुलांना समजल्या आहेत अथवा नाही हे त्यांच्या मातृभाषेतून विचारून तपासते. समजा मी त्यांना फळांची किंवा फुलांची नावे शिकवत असेन तर मी संगीत सूरू करते. एक वर्तुळ डावीकडे तर दुसरे वर्तुळ उजवीकडे सरकायला सुरवात करते. जेव्हा संगीत थांबते तेव्हा विद्यार्थी आपल्या समोर उभ्या असलेल्या दुसऱ्या विद्यार्थ्याला फळाचे किंवा फुलांचे नाव विचारतात. ज्या जोडीचे काम पूर्ण होते ती जोडी हात वर करते व विजेता ठरते.

ओनियन रिंगचा आणखी एक प्रकार म्हणजे विद्यार्थी दोन सरळ रांगांमध्ये (वर्तुळ नाही) एकमेकांकडे तोंड करून उभे राहतात. एका रांगेतील विद्यार्थी एका वसद्तूचे नाव घेतो तर दुसऱ्या रांगेतील त्याच्या समोरच्या विद्यार्थ्याला त्या वस्तूशी संबधित विशेषण बोलायचे असते. उदाहरणार्थ, Sun-bright, flower-red इत्यादी. ज्या जोडीचे काम आधी पूर्ण होते ती जोडी हात वर करते व विजेता ठरते.

## अधिक जास्त आत्मविश्वास

तेजसमध्ये सहभागी होण्याच्या आधी मी इंग्रजी जास्त बोलत नसे. चुका होतील याची मला भिती वाटे. पण आता मी TAGs मध्ये माझ्या सहकाऱ्यांसोबत इंग्रजी बोलते. चुका होतील याचे दडपण माझ्यावर नसते. मला कळून चुकले आहे की, जितके जास्त इंग्रजी मी बोलेन आणि जितका जास्त सराव करेन तितका जास्त आत्मविश्वास आणि अस्खलितपणा वाढेल. तसेच मी माझ्या विद्यार्थ्यांसोबत सोपे इंग्रजी वापरते, जेणेकरून त्यांचाही आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.




विद्यार्थ्यांना प्रश्न विचारताना

**दीपाली देशमुख** (शिक्षिका)

**शाळा** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तळवेल

**क्लस्टर** – जवळा

**ब्लॉक** – चांदूरबाजार, **जिल्हा** – अमरावती

# बहुभाषिक वर्गातील विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढविणे.

**कल्याणी पंडित** या गेली सात वर्षे शिकवत आहेत. त्या बीड जिल्ह्यात मराठी माध्यमाच्या शाळेत इयत्ता पहिली व तिसरीच्या वर्गांना शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल कल्याणी यांचे मनोगत ऐकण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

कल्याणी त्यांच्या वर्गात उपक्रम करत असताना पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८७ वर जा.



वस्तूंचा वापर करून गोष्ट सांगताना

**तेजसमुळे आत्मविश्वास वाढला.**

TAGs च्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये मला जरा संकोच वाटायचा. पण नंतर मी प्रत्येक कार्यक्रमात भाग घेण्यास सुरुवात केली. माझा आत्मविश्वास वाढू लागला. वर्गात आणि TAG बैठकांमध्ये आत्मविश्वासाने बोलणे, हावभावातून नवीन शब्द समजावून सांगणे मला तितकेसे जमत नव्हते. तेजस प्रकल्पामध्ये मी अनेक नवनवीन उपक्रम शिकत आहे. माझ्या वर्गामध्ये त्यांचा वापर करूनवर्गातल शिक्षण मुलांसाठी आनंददायी व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे.

**बहुभाषिक शब्दसंग्रह विकसित करणे.**

बहुभाषिक वातावरणात अनेक भाषांमधील शब्दसंग्रह वाढविणारे उपक्रम घेतल्याने विद्यार्थ्यांचे भाष नैपुण्य वाढते. हे करण्यासाठी TAG मध्ये मी जे शिकले त्याची मला खूप मदत झाली. मराठीमध्ये शब्द साखळी वापरून विद्यार्थी sugar-tea-hot यासारख्या साखळ्या तयार करतात. ते इंग्रजी स्पेलिंग शिकतात, उच्चार शिकाता आणि मराठीमध्ये त्याचा अर्थ शिकतात. यामुळे शब्द त्यांच्या लक्षात राहतात. काही महिने हे केल्यानंतर मुलांकडे कमीत कमी ३० शब्द असतात जे ते नियमितपणे वापरतात. माझे विद्यार्थी हे उपक्रम करत असतानाचे व्हिडीओ माझ्या युट्युब चॅनेलवर अपलोड करते, बैठकांमध्ये WhatsApp ग्रुपमध्ये शेअर करते. मला यातून सकारात्मक प्रतिसाद मिळतो. TAG बैठकांमद्ये होणारे रिफ्लेक्शन व नियोजनाचे फलित म्हणजे हा उपक्रम आहे.

**पालकांसोबत अधिक धनिष्ठ संबंध**

जेव्हापासून मी माझ्या वर्गातील उपक्रमांचे व्हिडिओ युट्युबवर शेअर करण्यास सुरुवात केली तेव्हापासून पालकांना त्यांची मुलांची प्रगती कशी सुरु आहे ते पाहता येऊ लागले आहे. यामुळे त्यांच्यासोबत धनिष्ठ संबंध तयार झाले आहेत. पालक खूप चांगले सहकार्य करतात. काही पालकांकडे स्मार्ट फोन्स नाहीत, ते इतर पालकांच्या स्मार्ट फोन्सवर व्हिडीओ बघतात. यामुळे पालकांमध्ये आपापसात देखील चांगले संबंध निर्माण झाले आहेत. सर्व मुले चांगली शिकत आहेत आणि त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे हे पाहून त्यांना आनंद होतो.

**कल्याणी पंडित** (शिक्षिका)

**शाळा –** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,कासारी

**क्लस्टर –** अस्थी नंबर १

**ब्लॉक –** अस्थी, **जिल्हा –** बीड

# इंग्रजी बोलण्याच्या खेळांमधून आत्मविश्वास आणि अस्खलितपणा वाढला.

**स्वाती सवाई** या गेली १८ वर्षे शिकवत आहेत. सध्या त्या अमरावती जिल्ह्यामध्ये एका शाळेत इयत्ता सातवीच्या वर्गाला शिकवतात.

तेजस आणि त्याच्या प्रभावाबद्दल स्वाती यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी कृपया हा क्यूआर कोड स्कॅन करा.

स्वाती यांचे विद्यार्थी व त्यांच्या अनुभवांबद्दल वाचण्यासाठी कृपया पान क्रमांक ८३ वर जा. या उपक्रमाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी पान क्रमांक ९१ वर जा. स्वाती त्यांच्या वर्गामध्ये उपक्रम करत असताना पाहण्यासाठी कृपया पान क्रमांक ८७ वर जा.

**विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी व्हिडीओजचा वापर.**

बैठकांमध्ये मी जे उपक्रम आणि खेळ शिकले त्यांचा वापर मी माझ्या इंग्रजीच्या धड्यांमध्ये करते. त्याचे व्हिडीओ करून ते युट्युब चॅनेलवर अपलोड करते. जेव्हा पालक आणि इतर शिक्षक हे व्हिडिओ पाहतात. ते माझ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करतात. आधीच्या आणि आताच्या व्हिडीओजची तुलना केली तर माझ्या विद्यार्थ्यांनी किती प्रगती केली आहे ते देखील समजून येते. यामुळे विद्यार्थ्यांच्या सहभागाला प्रोत्साहन मिळते. मुले या सर्व उपक्रमांचा खूप आनंद घेतात.

**एकत्रितपणे तर्क करणे, वर्णन करणे आणि शिकणे.**

माझ्या TAG मध्ये मी मिस्ट्रि बॅग हा उपक्रम शिकले आणि माझ्या विद्यार्थ्यांना त्याची माहिती दिली. एका बॅगमध्ये पाण्याची बाटली. जेवणाचा डबा, पेन, पेन्सिल, संत्रे, सफरचंद व वांगे अशा वस्तू ठेवल्या. मग मी एकेक वस्तू बाहेर काढत गेले, मुलांना त्यांचा रंग, आकार, उपयोग असे वर्णन करण्यास सांगितले. पुन्हा त्यांनाच त्या वस्तूंचे वर्णन करण्यास सांगितले. हळूहळू मुलांना मजा वाटू लागली.TAG WhatsApp ग्रुपवर मी याचा व्हिडीओ शेअर करला. अनेक सहकाऱ्यांनी माझ्या प्रयत्नांचे कौतुक केले.TAG मध्ये सहभागी असलेल्या माझ्याच शाळेतील अजून दोन शिक्षकांनी



**गोष्टींमधील पात्रांची ओळख करून देताना.**

आपापल्या वर्गात हा उपक्रम केला. माझ्यासाठी हे खूपच प्रोत्साहक ठरले.

आधी माझ्यामध्ये आत्मविश्वास नव्हता पण तेजस प्रकल्पात सहभागी झाल्यापासून माझा आत्मविश्वास वाढला आहे. जेव्हा लोक आमच्या धड्यांचे निरीक्षण करण्यासाठी येतात तेव्हा देखील विद्यार्थी खूप उत्साही असतात, इंग्रजी बोलायला उत्सुक असतात.

**स्वाती सवाई** (शिक्षिका)

**शाळा –** नगर परिषद शाळा क्रमांक ८ यशवंत नगर

**क्लस्टर –** मोर्शी, ब्लॉक – मोर्शी

**जिल्हा –** अमरावती



# पालक

या विभागांमध्ये तेजसबद्दल पालकांचे अनुभव व त्याची मते यांचा समावेश करण्यात आला आहे. मुलांच्या इंग्रजी भाषा कौशल्यांवर या नवीन शिक्षण पद्धतीचा कसा प्रभाव पडला आहे. वर्गामध्ये त्यामुळे कसे बदल घडून आले आहेत त्याबद्दल पालकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. या सर्व मुलाखती आधी मराठीमध्ये घेण्यात आल्या होत्या आणि नंतर त्यांचा इंग्रजी अनुवाद करण्यात आला.

## इंग्रजी वातावरण तयार करणे

पालक : सुभाष सोमदे

विद्यार्थी : आदिती सोमदे
– इयत्ता पाचवी

(औरंगाबादच्या प्रियांका दळवी यांची विद्यार्थिनी)

माझ्या मुलीच्या आदितीच्या बाबतीत इंग्रजीमध्ये लक्षणीय सुधारणा घडून आली आहे. आता ती तिच्या मित्रमैत्रिणींसोबत आणि भावंडासोबत इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करते. Water, door, eating यासारखे इंग्रजी शब्द ती वापरते. वाक्ये जुळवण्याचा प्रयत्न करते. कधीकधी जेव्हा जेवणानंतर आम्ही शतपावलीसाठी बाहेर जायला निघतो तेव्हा ती माझा हात पकडून म्हणते – 'Let's go for a walk,' तिचे शिक्षक तिला ज्याप्रकारे इंग्रजी शिकवत आहेत ते पाहून मला खूप आनंद होतो. मी खूपदा शाळेत जातो आणि मला दिसते की दळवी मॅडम काही न काहीतरी उपक्रम घेण्यात व्यस्त असतात. एकदा मी पाहिले की त्या मुलांना बोलक्या बाहुल्यांसोबत बोलायला सांगत होत्या. मला वाटले की त्या मुलांना थोडी मजामस्ती करू देत आहेत. पण जेव्हा आदिती घरी आली तेव्हा तिच्याकडून मला समजले की खरे तर त्या मुलांकडून इंग्रजी संभाषणाचा सराव करून घेत होत्या. इंग्रजी भाषा शिकता येईल असे कोणतेही वातावरण उपलब्ध नसलेल्या आदितीसारख्या मुलांसाठी ही खूप मोठी उपयुक्त बाब आहे.

## मी इंग्रजी शिकतो आहे !

पालक : निर्गुण सोमदे

विद्यार्थी : ऋतू सोमदे
– इयत्ता चौथी

(औरंगाबादच्या प्रियांका दळवी यांची विद्यार्थिनी)

माझी मुलगी ऋतू खूप हुशार आहे आणि शाळेच्या परीक्षांमध्ये ती नेहमी पहिला क्रमांक पटकावते. इंग्रजी बोलायची मात्र तिला फार भीती वाटत असे. पण इंग्रजीचा अभ्यास आणि इंग्रजीचा वापर याबाबतीत ऋतूमध्ये खूप मोठा बदल घडून येत आहे असे हल्ली माझ्या लक्षात येत आहे.

आमच्या शेतात उगवणाऱ्या सर्व भाज्या, फळे, कडधान्ये यांची इंग्रजी नावे ऋतूला येतात. काहीवेळा ती मला त्याबद्दल सांगत असते. बटाट्याची भाजी असे म्हणण्याऐवजी ती I want to eat potatoes for lunch today असे म्हणते. तिच्यामुळे मी देखील इंग्रजी शिकायला सुरुवात केली आहे. जेणेकरुन मी तिच्यासोबत बोलू शकेन. मी शब्दांचे पुस्तक आणले आहे व नवनवीन शब्द शिकण्याचा मी परोपरीने प्रयत्न करत असतो. मला खात्री आहे की एके दिवशी मी माझ्या मुलीसोबत इंग्रजीत बोलेन आणि तिला आश्चर्याचा सुखद धक्का देईन.

## इंग्रजी शिकण्यासाठी समान संधी

पालक : सतीश सोमदे

विद्यार्थी : ऋतुजा सोमदे
– इयत्ता पाचवी

(औरंगाबादच्या प्रियांका दळवी यांची विद्यार्थिनी)

माझी पत्नी आणि मी काही फार शिकलेलो नाही. पण ऋतुजाने अभ्यासात उत्तम प्रगती करावी, अस्खलितपणे इंग्रजी बोलावे असे आम्हाला नेहमी वाटायचे. उत्तम इंग्रजी येत असेल तर प्रगतीच्या अनेक वाटा आपल्यासाठी खुल्या होऊ शकतात. असे मला वाटते. ऋतुजाला एका जिल्हा परिषद शाळेमध्ये दाखल करताना सुरुवातीला मी साशंक होतो पण माझी सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी लक्षात घेत त्यावेळी हाच एक व्यवहार्य पर्याय माझ्यासमोर होता. पण आता जेव्हा मी आमच्या भागातील सेमी इंग्लिश किंवा खाजगी शाळांमध्ये जाणारी मुले पाहतो तेव्हा मला जाणवते की माझी मुलगी त्यांच्यापेक्षा उत्तम इंग्रजी बोलते. खाजगी शाळेत जाणाऱ्या इतर मुलांच्या तुलनेने ऋतुजाला तिच्या शाळेमध्ये इंग्रजी बोलण्याच्या कितीतरी जास्त संधी दिल्या जातात. त्यामुळे आता मला माझ्या निर्णयाचा आनंद होतो. मला असे वाटते की तेजससारख्या प्रकल्पांनी जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना पाठिंबा देत राहिले पाहिजे जेणेकरून ऋतुजासारख्या विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल.

## इंग्रजीचा आत्मविश्वास !

पालक : रेखा धवाले

विद्यार्थी : वेदांती धवाले
– इयत्ता सातवी

(अमरावतीगून सचिन इंझळकर यांची विद्यार्थिनी)

माझ्या मुलीचे इंग्रजी खूप छान सुधारले आहे. ती आता तिच्या मित्रमैत्रिणी आणि भावंडासोबत इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करते. मी सुद्धा इंग्रजीमध्ये बोलावे यासाठी ती सारखी मला आग्रह करत असते. पण मला ते जमत नाही! एकदा मी बाजारातून घरी परत आले तर कोणतरी आमच्या घरात इंग्रजी बोलत असल्याचा आवाज ऐकू आला. मला वाटले की कोणीतरी शहरातून आले असेल. म्हणून मी उत्सुकतेने घरात डोकावते तर वेदांती आरशासमोर उभी राहून शाळेतील एका कार्यक्रमासाठी सराव करत होती.

## माझी मुलगी मला इंग्रजी शिकवते.

पालक : अर्चना लवंगे

विद्यार्थी : ईश्वरी लवंगे
– इयत्ता आठवी

(अमरावतीहून सचिन इंझळकर यांची विद्यार्थिनी)

माझी मुलगी ईश्वरी खूप मन लावून अभ्यास करते आणि परीक्षामध्ये तिने चांगले यश मिजळवले आहे. माझे पती आणि मी काही फार शिकू शकलो नाही. त्यामुळे ईश्वरीला उत्तम शिक्षण तिच्या भविष्यात पाया भक्कम करावा असे आम्हाला वाटते. आर्थिक परिस्थितीनुसार आम्हाला तिला जिल्हा परिषद शाळेत घालणेच परवडण्यासारखे होते. पण आज जेव्हा आम्ही तिला इंग्रजी बोलताना ऐकतो तेव्हा आम्हाला तिचा आणि आमच्या निर्णयाचा खूप अभिमान वाटतो.

भाज्या (tomato, potato, cauliflower, drumstick) आणि मसाले (turmeric, cloves) यांची इंग्रजी नावे ईश्वरी मला शिकवते. ती नावे मी तिच्यामागून म्हणावीत असा तिचा आग्रह असतो. मी वस्तू ओळखू शकते आहे का हे ती प्रश्न विचारून तपासते. संध्याकाळी घरी परतल्यावर ती तिच्या शाळेतील इतर मैत्रिणीसोबत इंग्रजी बोलण्याचा सराव करते... या मुली एका मैत्रिणीच्या घरी जमून इंग्रजीत मुलाखती घेतात. कधीकधी त्या असा प्रसंग रचतात की त्या कोणी प्रसिद्ध व्यक्ती आहेत. तर कधीकधी एखादी घटना घडली आहे अशी कल्पना करतात. मला खात्री आहेकी तिला असेच मार्गदर्शन मिळत राहिले तर माझी मुलगी इंग्रजी खूप चांगले शिकू शकेल आणि अस्खलितपणे बोलू शकेल.

## भाऊ एकमेकांना सरावात मदत करतात

पालक : हेमंत जगताप

विद्यार्थी : संकेत जगताप व
सार्थक जगताप
– इयत्ता चौथी

(अमरावतीहून सचिन इंझळकर यांचे विद्यार्थी)

संकेत आणि सार्थक हे माझे मुलगे जरी लहान असले तरी हा भाषा शिकण्याचा त्याच्यामध्ये निर्माण झालेला उत्साह खूप मोठा आहे. ते नियमितपणे इंग्रजीत बोलतात, प्रश्न विचारतात आणि कविता म्हणणे, पुस्तके वाचणे यामध्ये एकमेकांची मदत करतात. माझे शिक्षण मराठीतून झाले आहे. मला काही शब्द व वाक्ये समजतात पण मी इंग्रजीतून संभाषण करू शकत नाही. आता मला एखादा शब्द येत नसेल तर माझी मुले मदत करतात. हल्लीच मी त्यांना इंग्रजी अजून जास्त सुधारावे यासाठी शिकवणी जाण्यासाठी सुचवले तेव्हा त्यांनी सांगितले की त्यांचे शिक्षक खूप छान शिकवतात त्यामुळे मुलांना शिकवणीची गरजच नाही.

## प्रशिक्षण शिक्षक परिवर्तन घडवून आणतात.

पालक : शरद दोड

विद्यार्थी : जानेश्वरी दोड
– इयत्ता सातवी

(अमरावतीहून स्वाती सवाई यांची विद्यार्थिनी)

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा कसा असेल याबद्दल मला साशंकता होती. माझी इच्छा होती की माझ्या मुलीने अस्खलितपणे इंग्रजी बोलावे. त्यामुळे मी ज्ञानेश्वरीला एका जवळच्या खाजगी शाळेत घातले. वर्षभरानंतर माझ्या असे लक्षात आले की माझ्या मुलीचे इंग्रजी काही खास सुधारलेले नाही. ती घरी साधे साधे इंग्रजी शब्दसुद्धा वापरायला उत्सुक नसायची. पण आता ती ते करते आणि आता ती एका जिल्हा परिषद शाळेत शिकते आहे. माझ्या असे लक्षात आले की या ठिकाणी शिक्षक आमच्या भागातील इतर खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या तुलनेत जास्त प्रशिक्षित आहेत. मला खात्री आहे की, स्वाती सवाई यांच्यासारख्या सिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या मुलीची इंग्रजी संवाद कौशल्ये सुधारतील, ती पुढे जाऊन एखाद्या महानगरात स्थिर नोकरी करू शकेल.

## शब्द संग्रह निर्माण करणे

पालक : बाबासाहेब चवनक

विद्यार्थीनी : देवयानी चवनके
– इयत्ता चौथी

(नाशिकहून समीर देवडे यांची विद्यार्थीनी)

शाळेमध्ये देवयानी ज्याप्रकारे इंग्रजी शिकते आहे ते पाहून मला खूप समाधान वाटते. ती स्वतःची ओळख करून देऊ शकते. कुटुंबाबद्दल सांगू शकते, शाळेबद्दल काही सध्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते. इंग्रजीचा सराव ती खूप गंभीरपणे करते. आजूबाजूच्या नेहमीच्या गोष्टींबद्दलचे सोपे शब्द काढून त्यांचा संग्रह ती करत आहे. तिला गाणी बोलायला आवडतात आणि हावभावांवर आधारित गाणी देखील ती ऐकते. कधीकधी ती माझ्या फोनवर इंग्रजी बालगाणी देखील ऐकत असते.

मला खात्री आहे की शिक्षण पूर्ण होईस्तोवर ती अस्खलितपणे इंग्रजी बोलू शकेल आणि याचे संपूर्ण श्रेय तिच्या शिक्षकांचे आहे !

## आम्हाला आमच्या मुलीचा अभिमान वाटतो

पालक : प्रकाश राऊत

विद्यार्थीनी : यशस्वी राऊत
– इयत्ता तिसरी

(गडचिरोलीहून पुंडलिक देशमुख यांची विद्यार्थिनी)

माझी मुलगी यशस्वी अतिशय हुशार आणि खूप अभ्यासू आहे. ती कविता म्हणते, दोन किंवा तीन अक्षरांचे शब्द तिला येतात आणि इंग्रजीमध्ये वाक्ये बनवण्याचा देखील ती प्रयत्न करते. आम्ही अशिक्षित आहोत. ती इंग्रजीमध्ये काय बोलते खरेतर आम्हाला समजत नाही. आमच्या मुलीच्या इंग्रजीमध्ये सुधारणा व्हावी यासाठी तिचे शिक्षक जी मेहनत घेत आहेत त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत !

## इंग्रजी वाचन आणि संभाषण

पालक : ईश्वर सयाम
विद्यार्थी : मयूर सयाम
– इयत्ता दुसरी

(गडचिरोलीहून पुंडलिक देशमुख यांचा विद्यार्थी)

मयूरला त्याच्या आजूबाजूच्या नेहमीच्या गोष्टींची इंग्रजी नावे माहिती झाली आहेत. लोकांसोबत बोलताना तो काही साधी वाक्ये वापरू शकतो. तो त्याच्या भावंडांच्या पुस्तकांमधून छोट्या गोष्टी वाचण्याचा प्रयत्न करतो. प्राणी, फळे, फुले आणि भाज्या यांची नावे सागतो.

मला खात्री आहे की मयूरला त्याच्या शिक्षकांकडून आता जसा पाठिंबा आणि मार्गदर्शन मिळत आहे तसेच कायम मिळत राहिले तर तो इंग्रजी उत्तम प्रकारे संभाषण करेल.

# परिशिष्ट

# युट्युब व्हिडीओची यादी

शिक्षक व TAB Coordinators नी त्यांच्या युट्युब चॅनेलवर अपलोड केलेल्या व्हिडीओजची ही यादी आहे. यामध्ये शिक्षकांनी आपापल्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषा नैपुण्ये विकसित व्हावीत यासाठी केलेले विविध उपक्रम पाहता येतील.

| शिक्षकाचे नाव | व्हिडिओची लिंक आणि क्यूआर कोड | व्हिडीओचे थोडक्यात वर्णन |
|---|---|---|
| ज्ञानेश्वर गुरुकर | Http:bit.ly/2RE3FXV | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी एक मजेशीर गाणे बोलत बोलत शब्दांचा सराव करत आहेत. शरीराच्या विविध भागांची नावे शिकत आहेत. जे शब्द मुलांना शिकवायचे आहेत त्यांचा समावेश गाण्यामध्ये करून हावभाव आणि चाल यामार्फत शिक्षक मुलांनी या उपक्रमात सहभागी व्हावेत यासाठी प्रोत्साहन देत आहेत. |
| ज्ञानेश्वर गुरुकर<br>कलेटिव्ह नाउन्स | Http:bit.ly/2FEO0977 | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी फ्लॅशकार्डसचा वापर करून एका मजेशीर उपक्रमातून कलेक्टिव्ह नाउन्सचा सराव करत आहेत. प्रत्येक कलेक्टिव्ह नाउन आणि त्याच्याशी जुळणारा योग्य शब्द यांच्या जोड्या जुळवणे आणि नंतर ते पुन्हा पुन्हा करणे यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रांकडून उत्तरे मिळवायची आणि सर्वांनी मिळून सराव करायचा अशी पद्धत वापरून शिक्षक जास्तीत जास्त मुलांना यामध्ये सहभागी करून घेत आहेत. |
| जया इंगे<br>इंग्लिश सॅटर्डे+बुगी वूगी गाणे | Http:bit.ly/2TT0DeY | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी शनिवारी होणाऱ्या परिपाठामध्ये इंग्रजीमध्ये बोलत आहेत. त्यानंतर मुले एक गाणे हावभावांसहित बोलतात. यामध्ये ते इंग्रजीत दिल्या जाणाऱ्या साध्या सूचनांचे पालन करतात. मुलांची इंग्रजी ऐकण्याची कौशल्ये वाढवीत यासाठी एक मजेशीर आणि हावभावांसहित करता येईल असे गाणे वापरले आहे. मुलांना एका वर्तुळात उभे करून स्वतः सगळे हावभाव करून दाखवून शिक्षिका सर्व मुलांना यामध्ये सहभागी करून घेत आहेत. |

| शिक्षकाचे नाव | व्हिडिओची लिंक आणि क्यूआर कोड | व्हिडीओचे थोडक्यात वर्णन |
|---|---|---|
| कल्याणी पंडित<br>इजी इंग्लिश<br>भाषा शिक्षण<br>खेळ<br>– फॅमिली ट्री | Http:bit.ly/2Rzhygh | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी एक कुटुंबवृक्षाचा वापर करून त्यांच्या कुटुंबाचे वर्णन करत आहेत. ही कुटुंबवृक्षाची आकृती मुलांनी काढली आहे. त्याबद्दल काही प्रश्न इंग्रजीमध्ये विचारून शिक्षक मुलांचे मार्गदर्शन करत आहेत. मुलांनी जोड्या-जोड्यांनी कामे करावीत यासाठी शिक्षिकेने ओनियन रिंग उपक्रमाचा वापर केला आहे. इंग्रजीमध्ये काही सोपी वाक्ये वापरून विद्यार्थी भाषेचे ज्ञान वाढवत आहेत. |
| स्वाती सवाई<br>स्लॅप द बोर्ड | Http:bit.ly/2HipBAT | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी My English Book-6 या पुस्तकातून शब्दांच्या सराव करत आहेत. शिक्षिकेने मुलांच्या दोन टीम्स केल्या आहेत आणि एका मुलाला गुण लिहिण्यासाठी व हा उपक्रम करून घेण्यासाठी नियुक्त केले आहे. शिक्षिका धड्यातील शब्द पुकारतात, मुले शब्द ओळखतात आणि फळ्यावर त्या शब्दाला हात लावतात. संपूर्ण खेळ अतिशय उत्साहात घेऊन मुलांचा संपूर्ण खेळ अतिशय उत्साहात घेऊन मुलांचा संपूर्ण सहभाग यामध्ये राहील हे शिक्षिका पाहतात. |
| समीर देवडे<br>चेन ड्रिल | Http:bit.ly/2RT0P×C | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेचे विद्यार्थी काही विशिष्ट भाषा संरचना शिकत आहेत – `What's your name', 'my name is ..... ' what's your father's name', 'my father's name is...', इत्यादी. विद्यार्थी एक वर्तुळ करून बसतात आणि इंग्रजीमध्ये प्रश्न विचारतात व उत्तरे देतात. सर्व मुलांना सहभागी करून घेण्यासाठी शिक्षक चेन ड्रिलचा वापर करतात. |
| निशा सोनावणे<br>गेसिंग गेम | Http:bit.<br>ly/2RFyamVd | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेचे शिक्षक शब्द व त्यांचे वर्णन यांचा सराव करतात. त्यासाठी एक मजेशीर उपक्रम वापरण्यात आला आहे. शिक्षक एका गोष्टीचे वर्णन करतात, विद्यार्थी ते ऐकतात आणि शब्द काय असेल त्याचा तर्क लावतात. ऐकून समजून घेणे, वर्णन आणि शब्द यांच्या जोड्या जुळवणे यावर विशेष भर देण्यात आला आहे. |

| **शिक्षकाचे नाव** | **व्हिडिओची लिंक आणि क्यूआर कोड** | **व्हिडीओचे थोडक्यात वर्णन** |
|---|---|---|
| प्रशांत शिंदे | Http:bit.ly/2RycY/W | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी प्रश्न आणि उत्तर संरचनेचा सराव करत आहेत. असे प्रश्न आहेत. यासाठी ते चेन ड्रिल उपक्रम करत आहेत. फळांचा संदर्भ घेऊन शिक्षक उपक्रम आखून देतात. सूचना देतात आणि नंतर मुले तो उपक्रम करतात. |
| खाज मोईनोद्दीन | Http:bit.ly/2CyRaDa | या व्हिडिओमध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थी मूकाभिनय आणि हावभाव यांचा वापर करून क्रियापदांचा सराव करत आहेत. एक विद्यार्थी हावभाव करतो व दुसरा विद्यार्थी क्रियापद ओळखतो. उदाहरणार्थ Rahul is singing हावभाव आणि मूकाभिनय मुलांनाच करायला लावून शिक्षक त्यांच्या सहभागाला प्रोत्साहन देत आहेत आणि वर्ग विद्यार्थीकेंद्री बनवत आहेत. |

TAG संरचने बद्दल माहिती देण्यासाठी तसेच ट्विटर आणि WhatsApp कसे वापरावे यासाठी पुढील युट्युब व्हिडीओज शेअर करण्यात आले होते.

| शिक्षकाचे नाव | व्हिडिओची लिंक आणि क्यूआर कोड | व्हिडीओचे थोडक्यात वर्णन |
|---|---|---|
| ब्रिटिश कॉन्सिल वेस्ट इंडिया टीम<br>तेजसमधील टीचर ॲक्टिव्हिटी ग्रुप्स TAGs | Http:bit.ly/2ARoF2V | तेजसमधील सर्वात महत्त्वाची नाविन्यपूर्ण बाब म्हणजे TAG चा एक भाग म्हणून शिक्षक महिन्यातून एकदा भेटतात आणि त्यांच्या सीपीडी अर्थात कंटिन्यूइंग प्रोफेशनल डेव्हलपमेंट अर्थात सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी विविध स्त्रोतांचा वापर करतात. यामुळे त्यांना त्यांच्या वर्गातील शिकवण्यामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यात मदत मिळते. या फिल्ममधे TAGs या संकल्पनेची आणि TAG बैठकांच्या संरचनेची माहिती दिली आहे. |

| शिक्षकाचे नाव | व्हिडिओची लिंक आणि क्यूआर कोड | व्हिडीओचे थोडक्यात वर्णन |
|---|---|---|
| सुयोग दीक्षित<br><br>ट्विटर चॅटमध्ये कसे सहभागी व्हावे | Http:bit.ly/2DhWhZo | या व्हिडिओमध्ये सुयोग दीक्षित हे #Tejas4E या ट्वीटर चॅट मध्ये सहभागी होण्याविषयी या विषयी संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगत आहेत. ट्विटरला लॉग इन कसे करावे, #Tejas4E चा शोध कसा घ्यावा, नवीन ट्विट्स कसे शोधावे, ट्विट्स कसे शोधावे, ट्विट्सना प्रतिसाद कसा द्यावा ते या व्हिडिशोमध्ये सांगितले आहे. तुम्ही या व्हिडिओमधील माहितीचा अवलंब करून #Tejas4E च्या दर महिन्याच्या ट्विटर चॅटमध्ये सहभागी होऊ शकतात. |

**शब्दावली**

| उपक्रम | लिंक | क्यूआर कोड |
|---|---|---|
| AARMS रिसर्च प्रोजेक्ट | Http:bit.ly/2AQrH7O | |
| ESA oअप्रोच | एंजेज स्टडी ॲक्टिवेट अप्रोच<br>Http:bit.ly/2VYwrRC<br><br>Http:bit.ly/2T31mKA | |

## शब्दावलीचे परिशिष्ट

| उपक्रम | लिंक | क्यूआर कोड |
|---|---|---|
| मल्टी-ग्रेड क्लासरूम्स | यामध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिक | इयत्तांचे विद्यार्थी एकाच वर्गात असतात. |
| पीपीपी अप्रोच | प्रेझेंट प्रॅक्टिस प्रोड्युस<br>Http:bit.ly/2FzMPTE<br>Http:bit.ly/2FGubJ3 | |
| तेजस सिम्पोसियम | २०१८ साली तेजस सुरु झाल्यानंतर दुसऱ्या वर्षी हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यामध्ये SARPs TAG Coordinators व शिक्षक सहभागी झाले होते. आपल्याला मिळालेली शिकवण, उपाययोजना इतरांसोबत शेअर करण्याची तसेच चाचणी प्रकल्पामध्ये नऊ जिल्ह्यांमध्ये वर्गातील शिकवणे आणि शिकणे यामध्ये सुधारणा घडवून आणण्यात मेहनतीने आणि निष्ठेने काम केल्याबद्दल हितधारकांचे आभार मानण्याची ही संधी होती. | |
| तेजस ट्रेनिंग | SARPs TAG Coordinators यांनी ब्रिटिश कौन्सिलने आयोजित केलेले प्रशिक्षण घेतले आहे व अनेक ऑनलाईन कोर्सेसचाही त्यांनी लाभ घेतला आहे. | |

## उपक्रमांचे परिशिष्ट

| उपक्रम | लिंक | क्यूआर कोड |
|---|---|---|
| बॉल गेम | http://bit.ly/2FEQtuR | |
| चेज प्लेसेस | http://bit.ly/2DhvvQZ | |
| चेन ड्रिल | http://bit.ly/2DheuWZ | |
| | http://bit.ly/2svUt97 | |
| | http://bit.ly/2RB1RyP | |
| चायनीज व्हिस्पर्स | http://bit.ly/2U1Ri4V | |

## उपक्रमांचे परिशिष्ट

| उपक्रम | लिंक | क्यूआर कोड |
|---|---|---|
| जिगसॉ रिडिंग | http://bit.ly/2TXAJ9U | |
| | http://bit.ly/2swqYnJ | |
| मिस्ट्री बॅग | http://bit.ly/2RRq97k | |
| रियॉलिया | http://bit.ly/2szhfx2 | |
| | http://bit.ly/2T1gEzI | |
| ओनियन रिंग | http://bit.ly/2RyHhiI | |

## उपक्रमांचे परिशिष्ट

| उपक्रम | लिंक | क्यूआर कोड |
|---|---|---|
| प्लॅनिंग | http://bit.ly/2TghcS8 | |
| रोल प्ले | http://bit.ly/2szh5FF | |
| रोल द डायस | http://bit.ly/2S1mEvb | |
| स्लॅप द बोर्ड/वॉल किंवा रन अँड टच | http://bit.ly/2RyHhil | |
| स्नो बॉल | http://bit.ly/2DiAEby | |
| फळ्याचा वापर कसा करावा | http://bit.ly/2Mgu9J7 | |

## उपक्रमांचे परिशिष्ट

| उपक्रम | लिंक | क्यूआर कोड |
|---|---|---|
| फ्लॅशकार्डसचा वापर | http://bit.ly/2VYZbJX | |
| | http://bit.ly/2VXXX1P | |
| डिक्शनरी वापरणे | http://bit.ly/2W9ukL0 | |
| वर्ल्ड लॅडर रेस | http://bit.ly/2Cua5hU | |

## शब्दांच्या संक्षिप्त रूपांचे अर्थ

| | |
|---|---|
| एआयएनईटी | ऑल इंडिया नेटवर्क ऑफ इंग्लिश टीचर्स |
| बीआरपी | ब्लॉक रिसोर्स पर्सन |
| सीपीडी | कंटिन्यूइंग प्रोफेशनल डेव्हलपमेंट |
| डीआयईसीपीडी | डिस्ट्रिक्ट इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन अँड कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट |
| ईएलटी | इंग्लिश लॅग्वेज टीचिंग |
| ईएसए | इंग्लिश सब्जेक्ट असिस्टन्ट |
| एचओडी | हेड ऑफ डिपार्टमेंट |
| आयसीटी | इन्फॉर्मशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी |
| केपी | केंद्र प्रमुख |
| एमओओसी | मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्स |
| पीएलएन | पर्सनल लर्निग नेटवर्क |
| आरएए | रिजनल अकॅडेमिक रिसोस पर्सन |
| एस इ एन | स्पेशल एज्युकेशन नीड्स |
| एसआयई | स्टेट इन्स्टिटयूट ऑफ इंग्लिश |
| टीएजी | टीचर ऍक्टिव्हिटी ग्रुप |
| | |

# NOTES